बुक स्ट्रक आणि अर्थ मराठी प्रस्तुत

मार्च ते मे 2020 [redacted]

संपादक: निमिष सोनार

# आरंभ

नव्या साहित्य युगाचा

वर्ष तिसरे, एकूण अंक 14 वा




## तरुण विचारांचे
त्रैमासिक

**आरंभ त्रैमासिक हा अर्थ मराठी आणि बुक स्ट्रक यांचा संयुक्त उपक्रम आहे.**

**संस्थापक:** आभेषक ठमके, डोंबिवली

**संपादक:** निमिष सोनार, पुणे

**सह-संपादक:** मैत्रेयी पंडित, नाशिक

**कार्यकारी संपादक:** आशिष कर्ले, पनवेल

**सल्लागार:**
अभिषेक ठमके डोंबिवली ,
अक्षर प्रभू देसाई, कॅलिफोर्निया
सिद्धेश प्रभुगावकर, पुणे

**मुद्रित शोधक:**
मीना झाल्टे, औरंगाबाद
विश्वास पाटील, टिटवाळा
वंदना मत्रे, नवी मुंबई

**व्यंगचित्र विभाग:**
सिद्धेश देवधर, गोवा

**विशेष सल्लागार:**
सविता कारंजकर, सातारा

**कव्हर डिझाईन:**
अश्विनी मिस्त्री, मुंबई

**PDF आवृत्ती:**
निमिष सोनार

**पत्रकारिता विभाग:**
वैष्णवी कारंजकर, पुणे

**मोबाईल ॲप आवृत्ती:**
सिद्धेश प्रभुगावकर

**ईमेल:** aarambhmasik@gmail.com

**फेसबुक पेज:** https://www.facebook.com/aarambhmagazine

**बुक स्ट्रक :**https://www.facebook.com/groups/bookstruck/

**<u>सूचना:</u>** या अंकासाठी कुणाला स्वयंसेवक म्हणून काम करायचे असल्यास तसेच या अंकात जाहिरात द्यायची असल्यास आरंभच्या ईमेल आयडीवर संपर्क/चौकशी करावी. **या अंकातील लेखकांनी व्यक्त केलेल्या प्रत्येक मताशी आरंभ टीम सहमत असेलच असे नाही.** आरंभ त्रैमासिक असल्याने **पुढील अंक जून महिन्यात** प्रकाशित होईल याची नोंद घ्यावी.

# अनुक्रमणिका


संपादकीय (निमिष सोनार)....4

संपादकीय (मैत्रेयी पंडित)....5

बातम्यांच्या जगात – वैष्णवी कारंजकर....6

|| मराठी राजभाषा दिन विशेष लेख ||....8

अमेरिकेतील मराठी माणूस – नीला पाटणकर....8

मातृभाषा म्हणजे केवळ संवादाचे माध्यम नव्हे! – आशिष कर्ले....13

|| मुखपृष्ठ कथा – चित्रपट जगत ||....16

शॉर्ट फिल्म (अॅरेंज्ड मॅरेज): लग्नाकडे नेणारा एक सुंदर प्रवास - मिलिंद कोलटकर....16

रात्रींबद्दलची गोष्ट! – अमृता देसर्डा....21

अंतरद्वंद्व: नाटक परीक्षण - अमृता देसर्डा....23

नागराज मंजुळे: माणूसपण बहाल करणारी दृष्टी - निखील शेलार....28

द विचर: पोलंडचा महानायक ! – अक्षर प्रभु देसाई....32

टोलकेन आणि मिडल अर्थ, लॉर्ड ऑफ द रिंग्स , हॉबिट इत्यादी – अक्षर प्रभु देसाई....35

|| प्रवासवर्णन ||....39

हम्पी: एका साम्राज्याची अखेर – अजित मुठे....39

गाथा गुलशनाबादची - मैत्रेयी पंडित....43

मिस बुम्बुम: ब्राझीलमधील अनोखी सौंदर्य स्पर्धा - सुलक्षणा वऱ्हाडकर....47

|| लेख विभाग ||....50

माई: एक सिंधुदुर्ग – किरण दहिवदकर....50

स्वा. वि.दा. सावरकर: एक धगधगते यज्ञकुंड – वंदना मत्रे....59

सकारात्मक विचार - सविता कारंजकर....62

मायमाखली नजर – प्रसाद वाखारे....65

आमची माती, आमची मिसळ - नवनीत सोनार....67

आम्ही मैत्रिणी - अनुष्का मेहेर....69

एक स्त्री – प्रिया भांबुरे....72

वृध्दाश्रम: गरज की अपरिहार्यता – नीला पाटणकर....73

|| कथा ||....75

आगंतुक – सविता कारंजकर ....................75
|| कविता विभाग || ....................79
तरीही माझं जीवन सुखाचं होतं – अविनाश हळबे ....................79
भाव अंतरीचा – छाया पवार ....................84
स्वप्नीच्या फुला – योगेश खालकर ....................85
आई कुठे काय करते ? – विलास गायकवाड ....................86
सून माझी लाडाची – नीला पाटणकर ....................87
शोध – मंगल बिरारी ....................88
लिखाणाचे सूत्र – दिपाली साळेकर / खामकर ....................89
सुख – भरत उपासनी ....................90
|| आरंभचे लेखक आणि आरंभच्या टीमचा परिचय || ....................91

## संपादकीय (निमिष सोनार)

नमस्कार वाचकहो! आरंभ त्रैमासिकाचा 2020 या वर्षातील पहिला अंक (मार्च ते मे) आणि एकूण सलग 14 वा अंक आपल्या हाती देतांना अतिशय आनंद होत आहे. अंक आपल्या हातात पडेपर्यंत 27 फेब्रुवारी हा मराठी भाषा दिन आपण साजरा केलेला असेल. परंतु, जगातील प्रत्येक मराठी माणसाने वर्षाचे सर्वच्या सर्व दिवस मराठी भाषेचा अभिमान बाळगून स्वत:च्या मातृभाषेच्या प्रगतीसाठी प्रयत्न केला पाहिजे, तरच मराठी भाषा टिकेल! "वाचाल तर वाचाल", असे म्हणून आपण वाचनाचे महत्व सांगतो त्याच धर्तीवर मी मराठी भाषेसाठी म्हणेन की, "वाचवाल तर वाचेल!" म्हणजे मराठी माणसांनो, तुम्ही सतत बोलून, लिहून, वाचून मराठी भाषा "वाचवाल" (हाच वारसा आपल्या पुढच्या पिढीकडेसुद्धा देत राहाल) तरच ती "वाचेल"!

आरंभ टीमचे मला नेहमी कौतुक वाटते. आपापल्या व्यक्तिगत, सामाजिक आणि व्यवसाय किंवा नोकरी यातून वेळ काढून ही टीम आरंभ अंक दर्जेदार व्हावा म्हणून सतत झटत असते. व्यक्तिगत कारणास्तव टीममधून काहीकाळ रजा घेतलेल्या सातारा येथील सविता कारंजकर या अंकापासून विशेष सल्लागार म्हणून परत आल्या आहेत तर आरंभ टीम मध्ये नवीन सदस्य म्हणून नवी मुंबई येथील वंदना मत्रे या प्रूफ रीडर टीम मध्ये सामील झाल्यात. तसेच, नाशिकच्या मैत्रेयी पंडित या सह-संपादक म्हणून आपल्या आरंभ कुटुंबात सामील झाल्यात. सविता यांची मुलगी वैष्णवी जी पुण्यात "मास्टर इन जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन" करते आहे तीही स्वेच्छेने आपल्या टीम मध्ये आलेली आहे! या अंकात तिने गेल्या तीन महिन्यांतील महत्वाच्या घडामोडींचे संकलन करून दिलेले आहे. सामान्य ज्ञानासाठी ते नक्कीच वाचकांना उपयोगी पडेल! कला दिग्दर्शन क्षेत्रातील अश्विनी मिस्त्री यांनी या अंकापासून कला विभाग सांभाळला आहे आणि या अंकाचे सुरेख असे मुखप्रुष्ठ त्यांनी तयार केले आहे. या अंकासाठी आपण एक अभिनव उपक्रम राबवला आहे तो असा की, वाचकांनी बघितलेल्या आणि त्यांना आवडलेल्या लघुपटाची कथा स्वत:च्या शब्दांत पटकथा स्वरूपात लिहायची आहे, ते आपल्याला या अंकात वाचायला मिळेलच तसेच एकूणच सिनेमा क्षेत्राशी संबंधित अनेक लेख या अंकात लेखकांनी पाठवले आहेत, त्याला साजेसेच त्यांनी हे मुखपृष्ठ बनवले आहे!!

एकूणच काय तर देश विदेशातील मराठी वाचकांत लोकप्रिय असलेले असे नव्या साहित्य युगाचा आरंभ करणारे हे आरंभ ई-मासिक आता तरुण विचारांचे त्रैमासिक झाले आहे आणि वाचकांना साद घालत आहे आणि घालत राहणार आहे की - "लिहिते व्हा आणि लिखाणातून वैचारिक बदल घडवा!" कारण जगातील कोणताही बदल हा आधी मनांतील विचारांत होतो आणि मग तो दृश्य स्वरूपात उमटतो!!

***निमिष सोनार, संपादक, आरंभ त्रैमासिक***
***(आरंभ... एका नव्या साहित्य युगाचा!)***

# संपादकीय (मैत्रेयी पंडित)

"अमृतातेहि पैजा जिंके" अशी थोरवी असणारी लाघवी मराठी भाषा! जिच्या संगाने दऱ्या-खोऱ्यातील शिळा जागतात असे वर्णन केले जाते त्या मातीत जन्माला येणे म्हणजे अहोभाग्यम्!! आज आरंभ त्रैमासिकाच्या निमित्ताने सहसंपादक म्हणून या अमृतवाणीची सेवा करण्याची संधी मला मिळते आहे हे वाचक मंडळींना कळवण्यात मला अत्यंत आनंद होत आहे.

नमस्कार, मी मैत्रेयी पंडित. मी नाशिकची रहिवासी असून इंजिनीअर आहे. आरंभच्या मार्च महिन्याच्या अंकापासून या वाचनप्रवासात तुमच्यात सामील झालेली नवीन सहप्रवासी! साहित्याचे माझ्यावर संस्कारच आहेत असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. कारण लेखन ही मला माझ्या कुटुंबाकडून मिळालेली देणगी आहे. लहानपणी बालकविता लिहिण्यापासून सुरू झालेला माझा लेखनप्रवास उत्तरोत्तर वाढत जाऊन आज या त्रैमासिकाच्या संपादनापर्यंत आलेला आहे. या आधी मी महाविद्यालयीन नियातकलीकासाठी दोन वर्षे काम केले आहे. त्याशिवाय वेगवेगळया वृत्तपत्रांमधून मी प्रासंगिक लेखन करते. आणि आवड म्हणून वैयक्तिक ब्लॉगदेखील लिहिते. माझ्या या आवडी जाणून घेऊन, निमिष सरांनी मला सहसंपादक म्हणून काम करण्याची संधी दिली याचा मला खूप आनंद आहे.

परदेशातूनही ज्या अंकाला भरघोस प्रतिसाद मिळतोय अशा इ-मॅगझीनचे सह-संपादन करणे ही मला माझ्या लेखनप्रवासातील एक मोठी संधी वाटते आहे. आणि या प्रवासात मला मिळालेली टीमही अत्यंत उत्साही आहे. आमच्यातील प्रत्येकजण आपल्या कार्यक्षेत्रातील जबाबदाऱ्या सांभाळून स्वयंस्फूर्तीने या अंकासाठी काम करतो. आणि विशेष गमतीची बाब म्हणजे आमच्यापैकी कोणीही एकमेकांना भेटलेले नाही, तरीही कामातील सुसूत्रता खूप छान आहे. आरंभच्या टीम सोबत काम करण्याचा हा माझा पहिलाच अनुभव आहे. त्यामुळे वाचकमित्रांसोबत ओळख करून घेणे इतकेच या संपादकीय मध्ये मला संयुक्तिक वाटते. नव्या तरुण विचारांच्या साहित्य युगाचा हा "आरंभ" आहे, आणि या व्यासपीठावर आपण दर अंकात नक्कीच भेटू अशी मी अपेक्षा करते. आपल्या अंकाविषयीच्या प्रतिक्रिया आणि सूचनांची मी आणि संपूर्ण आरंभ टीम प्रतीक्षा करत असतो आणि त्या अंमलात आणण्यासाठी सदैव तत्पर असू या आश्वासनासह इथे शब्दांना अल्पविराम देते; पण… तुम्ही मात्र वैचारिक बदलांसाठी आपल्या लेखणीला मनसोक्त लिहू द्या… लिहिते व्हा! आणि आरंभवर असेच भरभरून प्रेम करत रहा.

***मैत्रेयी पंडित, सहसंपादक, आरंभ त्रैमासिक***
***(आरंभ… एका नव्या साहित्य युगाचा!)***

# बातम्यांच्या जगात – वैष्णवी कारंजकर

*(गेल्या तीन महिन्यात घडलेल्या महत्वाच्या घटनांचा थोडक्यात आढावा)*

***डिसेंबर २०१९:***

*१) पुण्याचे जनरल मुकुंद नरवणे भारताचे २८ वे लष्करप्रमुख(भूदल)*

*२) स्वीडनची पर्यावरणवादी कार्यकर्ती ग्रेटा थनबर्गला 'टाईम' मासिकाकडून 'टाईम पर्सन ऑफ द इयर' चा बहुमान*

*३)रंगभूमीचा अनभिषिक्त नटसम्राट आणि सूर्य पाहिलेला माणूस डॉ. श्रीराम लागू काळाच्या पडद्याआड*

*४)महाराष्ट्राने नोंदवला संपूर्ण देशात सर्वाधिक 4443 स्टार्टअप्स सुरू करण्याचा विक्रम*

*५) तेलंगणातील डॉक्टर महिलेवर सामूहिक बलात्कार करून तिची हत्या करणारे आरोपी पोलीस चकमकीत ठार; चौकशीसाठी केंद्र सरकारकडून समितीची स्थापना*

*६)नागरिकत्व(दुरुस्ती)विधेयक, २०१९ लोकसभा व राज्यसभेत मंजूर; देशभरातून कायद्याला तीव्र विरोध*

*७) ई सिगारेट प्रतिबंध अधिनियम २०१९ देशभरात लागू*

*८) जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या QRSAM ( Quick Reaction surface to air missile) या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी*

*९) संयुक्त राष्ट्रसंघाची २५वी जागतिक हवामान बदल परिषद COP25 स्पेनमधील माद्रिद येथे संपन्न*

*१०) महाविकास आघाडी मंत्रिमंडळाचा विस्तार पूर्ण*

***जानेवारी २०२०:***

*१) मानाच्या पद्म पुरस्कारांची घोषणा; बीजमाता राहीबाई पोपेरे, पोपटराव पवार यांना पद्मश्री, मेरी कोमला पद्मविभूषण पुरस्कार*

*२) चीनमध्ये कोरोना विषाणूचा धुमाकूळ; जागतिक आरोग्य संघटनेकडून आणीबाणी घोषित*

*३) भारताच्या ७१ व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष जैर बोलसोनारो यांची भरातभेट*

*४) महाराष्ट्र सरकारकडून शिवभोजन योजनेला सुरुवात; १० रुपयात मिळणार पोटभर जेवण*

*५) भारतात केरळमध्ये कोरोना विषाणूचा पहिला बाधित सापडला; उपचार सुरू*

*६) महाराष्ट्र सरकारने सर्व शाळांत मराठीचे शिक्षण केले सक्तीचे*

*७) गुवाहाटीमध्ये खेलो इंडिया युथ गेम्सला सुरुवात*

*८) केंद्र सरकारकडून 'एक राष्ट्र, एक रेशनकार्ड' योजना महाराष्ट्रासह १२ राज्यात लागू*

***फेब्रुवारी २०२०:***

*१) दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाने मते 'झाडू'न मते घेतली; भारतीय जनता पक्षाचा जोरदार पराभव*
*२) कीर्तनकार इंदुरीकर महाराज वादग्रस्त वक्तव्यांमुळे अडचणीत; सामाजिक कार्यकर्त्या तृती देसाईंनी केली गुन्हा दाखल करण्याची मागणी*
*३) ९२व्या ऑस्कर पुरस्कारावर कोरियन 'पॅरासाईट'ची मोहोर; 'जोकर'नेही गाजवला सोहळा*
*४) सामाजिक कार्यकर्त्या व स्त्रीवादी लेखिका विद्या बाळ यांचे पुण्यात निधन*
*५) अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भारत दौऱ्यावर; गुजरातमधील मोटेरा स्टेडियमवर'नमस्ते ट्रम्प!'*
*६) उत्तर प्रदेशातील सोनभद्रमध्ये आढळल्या सोन्याच्या खाणी*
*७) 'सीमारहित भाषा' या थीमवर मातृभाषा दिवस देशभरात साजरा*
*८) नृत्य गोपाळ दास राम मंदिर ट्रस्टचे नवे चेअरमन*

# || मराठी राजभाषा दिन विशेष लेख ||

## अमेरिकेतील मराठी माणूस – नीला पाटणकर

उपजतच माणूस हा अनुकरण प्रिय असतो. मराठी माणसात दुसऱ्याला सामावून घेणे व आपण दुसऱ्यात सामावून जाण्याची वृत्ती जन्मजात असते.अर्थात किती सामावून घ्यायच व किती सामावून जायच हा तारतम्य भाव त्याच्यापाशी नक्कीच आहे. याच गुणांमुळे त्याची जिद्दीने येथल्या संस्कृतीशी जुळवून घेण्याची असाधारण प्रवृत्ती प्रकर्षाने दिसते. मराठी माणूस स्वाभिमानी तर आहेच पण नवीन तंत्रज्ञान शिकून त्यावर मात करण्या ची उमेद व मनोधारणाही त्याजपाशी आहे. मराठी माणूस म्हणजे दिलदार व्यक्तीमत्वाचा नमुना आहे. बुध्दी कौशल्याने एखादी गोष्ट ग्रहण करण्याचे चातुर्य त्याच्याकडे आहे. वरून कडक पण आंतून मधाळ, फणसासारखा गोड आहे.

“देश तसा वेष” हे मौल्यवान वाक्य लक्षात ठेऊन व परिस्थितीचे गांभीर्य ध्यानात घेऊन सामंजस्याने वागणारा आहे. एखादी गोष्ट पोटतिडकीने करण्याची वृत्ती मराठी माणसात दिसून येते. येथील राहणीमानानुसार नवरा बायको दोघांनाही कमाईसाठी घराबाहेर पडणे गरजेचे असते. अलबत संसाराचा भार दोघांच्याही खांद्यावर समसमान असतो. त्यामुळे बायकोच्या बरोबर पुरूषही तितकाच बाहेरील व घरातील जबाबदारीला हातभार लावत असतो.

जो माणूस स्वत:च्या देशात कांहीवेळा ताठ्याने राहतो तोच परदेशात दुसऱ्या मराठी माणसाशी दसपट जास्त जवळीक ठेवून आपुलकीने व आदरयुक्त वागतो आणि मदत करतो. त्यात आनंदच आहे. कदाचीत आपल्या माणसांच्या व पर्यायाने आपल्या देशाच्या आणि देशबांधवांच्या रितेपणाची जाणीव त्याला होत असावी.

येथील मराठी लोक घरगुती व सार्वजनिक स्तरावर भारतीय सण, परंपरा, दसरा, दिवाळी, गणपती साजरे करतात. लावणी, भारतीय संगीत, नृत्य, खाद्य पदार्थ, भारतीय वेशभूषा, ढोल-ताशा, दिंडी, जुन्या पारंपरिक गोष्टींचे आकर्षण मराठी माणसात ओतप्रोत भरलेलं आहे व त्याप्रमाणे सर्व येथे वेळेनुसार आवर्जून समारंभ आयोजित करून साजरे केले जातात. काही मोठ्या शहरांमध्ये मराठी मंडळ आहेत. तेथे काव्य वाचन, कथा वाचन, संगीत, मराठी पध्दतीचे भोजन ठेऊन कार्यक्रम केले जातात. हे सण एकोप्याने, आनंदाने साजरे होतात.

दर दोन वर्षांनी अखिल अमेरिकन मराठी मंडळांचे स्नेहसंमेलन होते. ते चार दिवस असते. तेव्हा सर्व अमेरिकेतील मराठी लोक या निमित्तानी एकत्र येतांना दिसतात. व्याख्यान, संगीत, भजन, लावणी, पुस्तकांचे प्रकाशन, नाटक, चित्रफित दाखविणे इ भरगच्च कार्यक्रम असतात. मराठमोळ भोजन, नास्ता यांची रेलचेल असते. भारतीय वस्तू, मौलीक पुस्तक, मासिक, कपडे, दाग दागिने इ.चे स्टॉल असतात.

अमेरिका खूप विस्तृत पसरलेली आहे. ठिकठिकाणी मोकळी जागा पाहुन अचंबा वाटतो. पण त्या जागेचा योग्य उपयोग करून घेतलेला दिसतो. सुंदर, सुबक नक्षीकाम केलेली मंदीर बांधून तो परिसर भाव भक्तीने भारावून प्रसन्न झालेला दिसतो. साहजीकच वातावरण भक्तिरसाला पोषक असते. लोकाच्या रहदारीने परीसर भरूनही अनेकविध देऊळे व देऊळांचे पावित्र्य ठेवले जाते. कदाचित कांहीवेळा अनावधानाने ते इतर ठिकाणी ठेवले जात नसावे. भक्तगण लांबून येत असल्याने प्रत्येक देवळाच्या ठिकाणी प्रसादाची व खाद्य पदार्थींची उत्तम व्यवस्था केलेली असते.कुठेही अस्वच्छता,गलीच्छपणा दिसत नाही.शिस्त व स्वच्छता हे तिथले ब्रिद वाक्य आहे.कारण प्रत्येक गोष्ट कायद्याच्या तागडीतून तावून सुलाखून निघते.मनांत कुठेतरी कायद्या विषयी धास्ती असते.त्यामुळे मराठी माणूसही त्याचे उल्लंघन करत नाही.

येथील रीतीरिवाज संस्कृतीचे मराठी माणूस अनुकरण करून अमंलात आणतांना दिसतो. मराठी मंडळातर्फे भारतातून कलाकार बोलवून नाटक व संगीताचे,नृत्यांचे प्रयोग केले जातात.तसेच येथील मराठी लोक स्वत: नाटक,नृत्य बसवून सादर करतात. गाणी, निबंध, रांगोळी, चित्रकला, पेंटींग इ.च्या स्पर्धा लहानापासून मोठ्यांपर्यंत घेतल्या जातात व हौसेखातर प्रोत्साहनयुक्त बक्षीसाचे नियोजन केले जाते. मराठी लोक भेटल्यामुळे ओळखी होतात. गाठीभेटी वाढतात. विचारांची देवाण-घेवाण होते. अडीअडचणीवर उपाय योजना आखली जाते. जेणेकरून मराठीपण व मराठी संस्कृती जतन व्हावी हा सबळ हेतू असतो. मराठी भाषा आत्मसात करून कशी टिकून राहील हे प्रयत्नपूर्वक मेहनतीने पाहीले जाते.

आजारपणात, लग्नकार्यात एक मराठी माणूस आपल्यासह मित्र, मैत्रिणीला हिरिरीने मदतीला पुढे धावून येताना दिसतात. सुशिक्षित लोक धार्मिक विधी शिकून लग्न लावणे, सत्यनारायण पुजा सांगणे हे विधी हौसेखातर आवडीने घरोघरी जाऊन करतात. त्यांना सन्मानाने वागवून मैत्रीचे बंध घट्ट केले जातात.

कांही ठिकाणी घरगुती मराठी व संस्कृतचे वर्ग घेतात. तिथे मराठी मुळाक्षर, अंक लिहीणे, वाचणे काव्य प्रकार, गाणी, म्हणी, वाक्प्रचार,अभंग याची तोंडओळख करून देण्याचा कसोशीने प्रयत्न केला जातो. कलेचे सादरी करण्याचे प्रयोग केले जातात.त्यातूनच त्याला स्पर्धेचे रूप देऊन बालगोपाल व पालकांना सामील करून घेण्यांत येते.त्यातून नवीन उर्मी,उर्जा मिळते.त्याच्या आकर्षणाने मुलांना कलावर्गात पाठविण्यांत येते. भरतनाट्यम व कथ्थक नृत्य क्लास,संगीत क्लासला मुले जातात.तेथे नृत्य व संगीताच्या स्पर्धा घेऊन बक्षीस देतात.तरूण वर्ग गाण्याचे ग्रुप बनवून आठवड्यातून एकदा एकत्र येऊन गाण्याच्या मैफीली करतात. अशा मैफीलीला श्रोता वर्ग आवर्जून हजेरी लावतो.

अमेरिकन लायब्ररीत भारतीय नावाजलेले कवि, लेखकांची उत्तम मराठी पुस्तक, मासिक बऱ्याच वेळेला दिसतात. त्यासाठी वेगळे दालन असते. लावणी नृत्य प्रकारा पद्दल अमेरिकन लोकांना फार विलक्षण उत्सुकता असते.ते शिकण्याची इच्छा प्रदर्शित करतात. काहींनी ती अवगतही केलेय. मराठी मुलं, मुली पण हा नृत्य प्रकार करतात. मराठी खाद्यपदार्थ व रेसिपी यांच जितक मराठी लोकांना अपरूप आहे तितकंच येथील अमेरिकनांना आहे. त्यामुळे मराठी पारंपारिक पदार्थ येथे सर्वत्र मुबलक मिळण्याची रेस्टॉरंट आहेत

वडा-पाव, कांदा-भजी हिरव्या मिरचीसह, आनंदाने आस्वाद घेतांना लोक दिसतात. याचे मालक मराठी किंवा भारतीय असतात.

येथे मराठी व भारतीयांनी, भारतीय वस्तूंची दुकानं थाटलेली दिसतात. त्यामुळे भाज्या, आइसक्रीम मराठमोळया लोणची, पापड, पापड्यांपासून ते काजू कतली, बाकरवडीपर्यंत सर्व भारतीय वस्तूंची उपलब्धता असते.

वर उल्लेख केल्याप्रमाणे मराठी भाषा जिवंत राहण्यासाठी क्लासेसची सोय असली तरी निदान मुले सोळा वर्षाची हई पर्यंत खाजगी वाहनांतून इच्छित स्थळी नेऊन सोडण्याचे काम पालकांनाच करावे लागते.कारण तेथे बस,ट्रेन सारखी वाहन सर्रास उपलब्ध नसतात.लहान मुले स्वतंत्रपणे बाहेर जाऊं शकत नाहीत. कांही शहरात सार्वजनिक वाहनांची तुरळक सोय आहे. आई-वडील अगर आजी-आजोबा त्याच्या कामाच्या व्यापात दिवसभर व्यस्त असतात. मुलांसाठी तेवढा वेळ द्यायला त्यांच्या जवळ वेळ नसतो. तरी ओढाताण करून बरेच लोक वेळेचं नियमन करून हेतू साध्य करण्याची धडपड करत असतात.पुढे मुलांचा अभ्यास वाढल्यावर त्यांनाही ते करण शक्य होत नाही. येथे मदतीला मनुष्य बळ नसल्याने प्रत्येक काम स्वत:लाच करावे लागते. येथील जीवनशैली शारीरिक व मानसिक कष्टाची आहे.त्यामुळे आठवड्यातील पाच दिवस घाण्याला बांधलेल्या बैला सारखी येथील लोकांची अवस्था असते.त्यामुळे शारिरीक उर्जा उत्साह कमी होऊन माणूस थकलेला असतो.

बहुतेक ठिकाणी घराघरात माता-पिता,आजी-आजोबा मराठीच बोलतात.ते समजून त्याच उत्तर मात्र मुलं इंग्रजीतून देतात. प्रत्येक शब्द, म्हणी, वाक्प्रचा त्यांना अर्थ कळत असतो.त्यांना त्याचा वापर कुठे करायचा हे ही समजत असत. एखाद्या मराठी शब्दाचा किंवा म्हणी, वाकप्रचा आपण जर त्यांना अर्थ विचारला तर अचून सविस्तर अर्थ मात्र ते आपल्याला इंग्रजीतूनच सांगतात.

पहिलं मुल जन्माला आल्यानंतर घरातील मराठी भाषा ऐकून व्यवस्थित साधारण तीन वर्षा पर्यंत छान मराठी बोलत. एकदां ते डेकेयर मधे गेल की हळुहळु इंग्रजी बोलायला लागत व थोड्या कालावधीत पूर्ण इंग्रजी बोलायला लागते. ते पुन्हा मागे वळुन पहात नाही.नंतर त्याचे शब्द कानावर पडुन दुसरे मुल अनुकरण करून प्रथम इंग्रजी शब्द बोलते. व थोड्याच कालावधीत पूर्ण इंग्रजी वाक्य बोलू लागते.तेव्हां त्याने मराठी बोलण्याचा प्रश्नच येत नाही. परंतु घरात मराठी आपसात बोललं गेल्यामुळे त्याला मराठी कानावर पडल्याने मराठीच आकलन झालेल दिसत व समजत पण असतं हेही नसे थोडके असे बोलण्याची वेळ आई-वडिलांवर येते.

आपण विचार केला तर त्यांच्या दृष्टिकोनातून ते बरोबर आहे.एकदां घराच्या बाहेर पडल्यावर शाळा, कॉलेज, टीचर, समाजात वावरणे, स्कूल बस, मित्रांमधे ते वावरतांना संभाषण कसे करणार? कानावर पडणारे शब्द इंग्रजीच असतात ना? शिक्षण इंग्रजीतून मिळत असत. तस नाही केले तर त्यांचे संभाषणच खुंटेल सर्वांशी!! पेपर लिहीताना द्विधा मनस्थिति होईल. समाजात वावरण कठीण होऊन जाईल. त्याकरीता प्रामुख्याने घरांतील

सरावाने मराठी भाषा जीवीत ठेवण्यास मदत होईल. त्याकरीता पालकांनी पुढाकार घ्यायला हवा. तेवढा पुरेसा वेळ घोटवून घ्यायला पालकांना नसतो.

येथे येऊन स्थायिक झालेल्यांना स्वत:च्या कर्तुत्वावर व स्वबळावर स्वत:ला शाबीत करायच असत.त्याकरीता मेहनत करणे ओघाने आलेच,स्पर्धा परीक्षांना सामोर जाव लागते.तेव्हां कुठे ते स्वत:च्या हिंमतीवर येथे पाय रोवून तग धरून उभे राहुं शकतात.कित्येक मराठी व्यक्ती संशोधन करून उच्चपदस्थ झाल्यात कांही मराठी बांधवांनी येथे येऊन स्वत:चे स्वतंत्र व्यवसाय सुरू करून ते यशस्वी रीत्या करत आहेत.त्यांचे कौतुक करावे तितके थोडे आहे.तरीपण कांही अंशी अशा वेळी इतर गोष्टींकडे मनांत असूनही लक्ष देण होत नाही.

मुलांच्या जीभेला इंग्रजी उच्चारांचे वळण लागले की मराठी उच्चार करायला त्यांना कठीण जाते. उदा.ळ,र,ज,छ,ज्ञ मूळाक्षरे बोलणं जमत नाही. ती घोटवून घ्यायला वेळे अभावी व इथल्या जीवनशैली मुळे पालकांना जमत नाही. तरीपण खूप प्रमाणात पालक मेहनत घेतांना दिसतात.परंतु सर्वांना ते शक्य होत नाही. मराठीतील आदरार्थी शब्द बोलण्यांत गडबड होते. तसेच बोलण्याच्या गती मध्ये गोंधळ होतो. संभाषण करतांना पुढचा शब्द आठवून वाक्य पटकन जुळवायला वेळ लागतो. तेच इंग्रजी वाक्य ते झटकन बोलून जातात व चुकले तर हसं होईल याची त्यांना लाज वाटते म्हणून मराठीतून उत्तर द्यायला आणि बोलायला ते कचरतात.

हे सगळं त्यांना इथली संस्कृती सांभाळून करावे लागते.इकडचे सण,हवामान वागणे,बोलणे,रीती पाळुन करणे म्हणजे तारेवरची कसरत असते.मराठी माणूस इर्षेने धडपड करत असतो.पोषक वातावरण निर्मिती करण्याचा आटोकाट प्रयत्न करत असतो.तीस,चाळीस वर्षा पलीकडे जे लोक येथे स्थायिक झाले. त्यांना मराठीचा अभिमान आहे.पण प्रश्न आहे,पुढे येणाऱ्या पिढीचा,ते हे मराठीपण,मराठी वाग्ड:मय,संगीत कला,नाट्य,खाद्य संस्कृती टिकवूं शकतील कां? याची खात्री देता येत नाही.

तरी मराठी माणसाच्या रक्तात जिद्द आहे. पुढील पिढी माघार न घेतां आपला झेंडा व “मराठी बाणा” देशोदेशी फडकवेल अशी आशा करू या.

कदाचित आपले सणवार रीतीभाती ते साजरे करतीलही, पण पूर्वापार चालत आलेल्या पारंपरिक पध्दतीने करतीलच अस नाही. ते त्यांच्या सोयी प्रमाणे करतील. त्या मागे त्यांची भावना व मानसिकता काय आणि कशी असेल हे सांगता येण कठीण आहे.

मी ते पुढील ओळीतून विषद करते! पहा तर कसं वाटतय!!

आहे आमुचा मराठी बाणा, मराठी साठी धरतो वाणा
वावरात पिकवितो दाणा, श्रम आमुचे सकलांनी जाणा ॥

शेतात राबून पैशाची वाण, मनांत माणूसकीची खाण
घरादाराला देतो आम्हीं दाणा, कुणी कांहीही म्हणा ॥

जीवाला जीव देत राहतो ताठ, थोपटु नका आमुची पाठ
कुणी आम्हां उगा हाणा, वाकणार नाही आमुचा कणा ॥

सर्वांना देतो मदतीचा हात, ह्याच आमुच्या मराठी खूणा
शूरवीर आम्हीं मराठा मावळा, काढतो देशासाठी फणा ॥

देवाला आम्हीं मनात ठेवतो, करतो साजरे मराठी सण
प्रेमळ भाव आमुच्या रक्तात, हेच आमुचे मराठी पण ॥

मोडू पण वाकणार नाही,आहोत आम्हीं हाडाचे दांड
अन् देहाने बलदंड, थोपटतो ईर्षेने आम्हीं बाहुदंड ॥

# मातृभाषा म्हणजे केवळ संवादाचे माध्यम नव्हे! – आशिष कर्ले

काही लोक भाषेची व्याख्या ही भाषा म्हणजे केवळ एक संवादाचं माध्यम आहे अशी करतात. माझ्या मते ही व्याख्या केवळ तेव्हा लागू पडेल जेव्हा ती भाषा ही मातृभाषा सोडून इतर कोणतीतरी भाषा असेल!

जेव्हा विषय मातृभाषेचा येतो तेव्हा ती संवादाच्या माध्यमातूनही खूप अधिक काहीतरी असते की संवादाचे माध्यम एवढ्या तोडक्या व्याख्येत समाविष्ट करता येणार नाही, जसं तुमची आई ती तुमचा पहिला गुरू असते तसेच तुमची मातृभाषा ही तुमचे पहिले गोड बोबडे बोल असते, तुम्हाला ज्ञान प्राप्त करून देण्यासाठी,आपल्या संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी, लोकांशी संपर्क साधण्यासाठी, आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी, स्वतःच्या भावना व्यक्त करण्यासाठी ईश्वराने आईकडून दिलेली अमूल्य भेट म्हणजेच मातृभाषा असते.

कित्येक शास्त्रज्ञांचे देखील असे मत आहे की स्वतःच्या मातृभाषेत व्यक्तीची आकलनक्षमता इतर भाषांहून अधिक असते आणि याचे जिवंत उदाहरण म्हणजे आज जगातील सर्व देशात जरी इंग्रजी भाषेला अवास्तव महत्त्व दिले जात असलं तरी कित्येक असे देश आहेत की ते स्वतःची भाषा आजही जपतात जसे की जपान,स्पेन,रशिया,चीन...

मग असे असताना आपणच आपल्या भाषेला का कमी लेखतो? आपल्या भाषेतील जर तुम्ही साहित्य पाहिले तर कधीच आपल्या भाषेला महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही ठेवलेले संपूर्ण जगाचा विचार केलेला आहे या मराठीत!

"माझ्या मराठीची बोलू कौतुके, परी अमृतातेही पैजा जिंके" असे सांगत ज्ञानेश्वरांनी आपल्या मराठीला अमृतापेक्षा ही महत्व दिला आहे.संत ज्ञानेश्वरांनी पसायदानामध्ये विश्व कल्याणाचा विचार मांडलेला आहे, संत नामदेवांनी त्यांच्या अभंगातून "नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी " असा संदेश दिला आहे.

हजारो वर्षांची परंपरा असलेली आपली मायबोली मराठी जी भारतातील मोजक्याच भाषांप्रमाणे प्रमाणे अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होण्यास पात्र असणारी भाषा आहे. आज कुठेतरी आपल्याच लोकांचा चुकीचा समज तो म्हणजे मराठी अभ्युदयाचे साधन नाही, मराठीचा आग्रह न करणे यामुळे कित्येक सेवा मराठीत मिळत नाही.

मला इतर कुठल्याही भाषेचा द्वेष करायचा नाही कारण जशी माझी मातृभाषा मराठी आहे त्याचप्रकारे त्या इतरही भाषा कोणाच्या ना कोणाच्या तरी मातृभाषा आहेत आणि इतर भाषांचा द्वेष करणे असा संस्कार आमच्या मायबोली मराठीने आमच्यावर कधीच केलेला नाही! पण जेव्हा त्या भाषा या माझ्या मायबोलीच्या विकासात अडथळा ठरत असतील, मराठी भाषेला पर्याय बनू पाहत असतील तर अशावेळी त्या भाषांना केलेला विरोध हा त्या दुसऱ्या भाषेचा निश्चितच द्वेष नाही.

जेव्हा केंव्हा मराठीमध्ये बोलण्याचा आग्रहाचा विषय येतो किंवा बऱ्याच जणांना असं वाटतं की मराठीचा आग्रह हा केवळ अहंकार आहे, पण हा अहंकार नाही! हा आपल्या मातृभाषेचा अभिमान आहे, स्वाभिमान आहे तिच्या ऋणांप्रती खारीचा वाटा आहे कृतज्ञता आहे...

आज महाराष्ट्रात केंद्र सरकार द्वारे राबवले जाणारे त्रिभाषा सूत्र हे केवळ नावाला त्रिभाषा सूत्र आहे तिथे कित्येकदा मराठी भाषेला डावलले जाते! आणि केवळ सरकारी योजना नव्हे तर कित्येक खाजगी सेवा पुरवणाऱ्या लोकांचा असा समज झाला आहे की महाराष्ट्रातील लोकांना हिंदी समजत म्हणजे इथे मराठीत सेवा देण्याची आवश्यकता नाही! आणि यापुढे दोन पावले जाऊन आपलेच मराठी लोक समोरचा व्यक्ती मराठी आहे की मी मराठी आहे हे न जाणून घेता हिंदीत सुरुवात करतो. जरी समोरची व्यक्ती मराठी नसली तरी आपण मराठीतच सुरुवात करायला हवी. हिंदीमध्ये बोलून आपण त्यांची सोय का करतो हेच मला समजत नाही. जर तुम्ही त्यांच्याशी हिंदीत बोलाल तर ते मराठी भाषा का शिकत आणि मग आपली भाषा कशी टिकेल आणि कशी वाढेल? त्यामुळे स्वतःच्याच राज्यात पाहुणे बनू नका महाराष्ट्रात मराठीतच बोला!

यासाठी एकच गोष्ट करा... सर्व ठिकाणी मराठीचा आग्रह धरा!!

डिस्कव्हरी नॅशनल जॉग्रफि या बाबतीतही तसंच आहे! हिस्टरी टीव्ही 18 ने यापूर्वी मराठी भाषेचा पर्याय दिला होता परंतु दुर्दैवाची गोष्ट ही की म्हणावा तितका प्रेक्षक वर्ग न लाभल्याने मराठी डबिंग बंद झाले... कित्येक असे डीटीएच ऑपरेटर आहेत त्यांची सिस्टिम लँग्वेज मध्ये कन्नड तेलुगू हिंदी अशा भाषा आहेत परंतु मराठी भाषा नाहीत याचं कारण आपण मराठीचा न धरलेला आग्रह... यासंदर्भात मी एकदा तक्रार केली असता मला समोरून उत्तर आले होते की हिंदी भाषा आहे ना समोरचा बोलणारा मराठी भाषिक होता! हिंदी आहे पण मराठी नाही ना जोपर्यंत आपण फक्त आणि फक्त मराठीच असा आग्रह धरणार नाही तोपर्यंत ते तो पर्याय उपलब्ध करून देणार नाहीत... म्हणून आपण सर्वच क्षेत्रात मराठीचा आग्रह धरला पाहिजे.

लोकमान्य टिळकांनी या आधीच सांगितलं होतं की जोपर्यंत भाषा आहे व्यवहारात शिक्षणात आणि व्यापारात येणार नाही तोपर्यंत भाषेचा विकास होणार नाही आणि या सर्व क्षेत्रात मराठी भाषा येण्यासाठी भाषेच्या अग्रहा शिवाय दुसरा पर्याय नाही...

विविध बँका संस्था कंपन्या यांची माहिती पत्रक माहिती पुस्तके की आपण मराठीत मागितली पाहिजे...

जर आपण ती मराठीत मागितली नाहीत तर ती मराठीत कशी येतील आज तमिळ, तेलगू , कन्नड भाषा सर्व क्षेत्रात आहेत कारण त्या भाषिकांनी त्या भाषेचा आग्रह धरलेला आहे तसा! मग आपल्या मातृभाषेसाठी आपण का तसा आग्रह धरू नये... आपण जर इतर पर्यायांमध्ये समाधान मानलं तर आपल्या भाषेचा पर्याय आपल्याला मिळणारच नाही...

म्हणूनच सर्वच क्षेत्रात मराठीचा आग्रह धरा....

संदेश मराठीतच टाईप करा....

फोनवर बोलताना सुरुवात मराठीतून करा हॅलो नाही तर नमस्कार म्हणा...

बँका कंपन्या संस्था यांची माहिती पत्रके व माहिती पुस्तकाची मराठीतूनच मागणी करा....

(तुम्हाला जर मराठीतून माहिती मिळत नसेल अथवा माहितीपत्रक माहिती पुस्तक किंवा मराठीतून सुविधा मिळत नसेल तर थोडा वेळ काढून यांना लेखी तक्रार करा मग ती मेल द्वारे असेल किंवा पत्राद्वारे...)

तुम्ही जा कोणत्याही क्षेत्रात काम करतात त्यावर मराठीमध्ये साहित्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न करा...

बोलण्याची सुरुवात मराठीतूनच करा, स्वतःच्याच राज्यात पाहुणे बनू नका, महाराष्ट्रात मराठीतच बोला.

# || मुखपृष्ठ कथा – चित्रपट जगत ||

## शॉर्ट फिल्म (अँरेंज्ड मॅरेज): लग्नाकडे नेणारा एक सुंदर प्रवास - मिलिंद कोलटकर

"अँरेंज्ड मॅरेज". (Arranged Marriage). लघुपट.
**भाषा:** इंग्रजी. लांबी: १२ मिनिटे.
**निर्माता:** रफकट फिल्म्स (Roughcut Films)
**पटकथा आणि दिग्दर्शक:** नार्स क्रिष्णामाचारी (Nars Krishnamachari)
**छायाचित्रकार:** बिभू (Bibhu)
**पात्र:** एरीझ गँडडी (Areesz Ganddi) : अर्जुन, संस्कृती खेर : नेत्रा, अवंतिका शेट्टी : नेहा.
**उपलब्धता:** https://youtu.be/Z8X97OL06OY

**स्क्रिप्ट रुपांतर:**

*(लघुपट सुरु होतो तेंव्हा "फ्रेंच कट" दाढी असलेला आणि व्यवस्थित सुटाबुटात असलेला एक पुरुष रस्ता ओलांडून गाडीत बसताना दिसतो. यापुढे सुटाबुटातल्या या पुरुषाला **'सुपु'** हे विशेषण मी वापरणार आहे. आणि आपल्याला दोघांतला – स्त्री आणि पुरुष यांच्यातला - संवाद ऐकू येऊ लागतो)*

ते गप्पा मारता आहेत. पुरुषाचा वेश आता थोडा वेगळा आहे. वेषातला हा फरक आपल्याला जाणवेल इतका आहे.

ती गप्पांचे, प्रश्नोत्तरांचे सोपे पण पक्के नियम (ground rules) मांडते. जसे की एकूण वीस (आणि वीसच) प्रश्न ते एकमेकांना विचारातील. आणि प्रश्न 'खाजगी' नसतील. पुरुष 'खाजगी' आणि 'वैयक्तिक' प्रश्नातील भेद जाणून घेतो. वैयक्तिक प्रश्न चालतील. पण एखाद्या प्रश्नाला तीने उत्तर नाही दिलं की तो खाजगी होता हे समजेल असे ती स्पष्ट करते. तो गप्पांना सुरुवात करतो.

सुरुवात एकमेकांच्या व्यावसायिक माहितीच्या देवाणघेवाणीने होते. ती मनोवैज्ञानिक आहे, आणि तो ऑडीटर आहे हे कळते.

तोपर्यंत नोकर चहा आणतो. एक कप बिनदुधाचा, कोरा, 'डीप'वाला असतो तर दुसरा नेहमीसारखा. हा फरक कॅमेरा वरून दाखवतो. ठसवला जातो.

इथे 'सुपु' गाडीतून जातांना आणि घड्याळात पहात, थोडा चिंताग्रस्त. आणि वरच्या सारखंच दृष्य संपायच्या आत संवाद ऐकू येऊ लागतो. (यापुढे याला मी **दृसं** – 'दृष्य संपायच्या आत संगिताच्या पार्श्वभूमीवर पुढील संवाद ऐकू येणे' असे म्हणणार आहे.)

आता ते एकमेकांच्या 'खाण्या-पिण्या'च्या आवडीनिवडी जाणून घेत आहेत. रोज करावं लागलं नाहीतर ती 'स्वयंपाका'कडे थेरपी म्हणून पाहते हे सांगते. त्याला विचारता तो सांगतो की त्याला कॉफी आणि ती ही फक्त 'इंस्टंट' कॉफीच बनवता येते. ते त्यांच्या व्हेज-नॉनव्हेज पसंतीविषयी गप्पा मारतात. तो कधीकधी मांसभक्षण करतो आणि ती पक्की 'व्हेगन' आहे हे कळते.

गप्पा चित्रपट विषयावर वळतात. तिला हिंदी मसालापट, 'शहारुखचे तर फारच' आवडतात तर तो पक्का इंग्रजी चित्रपटांचा चाहता असतो. त्यांच्या आवडींतला भेद स्पष्ट होतो.

आणि पुन्हा 'सुपु' हातात वेष्टनीत भेटवस्तू घेऊन मॉल समोर रस्ता ओलांडताना दिसतो. वरीलप्रमाणे दृसं. आता ते पुस्तकांच्या आवडीनिवडी जाणून घेताहेत. पुढे ते दोघे एकमेकांची संगिताची आवड जाणून घेतात. तिला रेहमान, तर तर त्याला इंग्रजी 'टेक्नो' संगीत आवडते. इथेही ठसते ती त्यांच्या आवडीनिवडीतली भिन्नता.

यानंतर तो विचारतो की ती धार्मिक आहे का? ती हा प्रश्न 'खाजगी' आहे म्हणून टाळायचा प्रयत्न करते. My relationship with God is my buisness. ती म्हणते. या विषयावर त्याचं मत ऐकतांना तिचे स्मितहास्य, बट बाजूला करणे लोभस वाटते.

आणि पुन्हा 'सुपु' गाडीतून जातांना दिसतो. आता त्याच्या बाजूला आता एक मोठ्ठा पुष्पगुच्छ आहे. मागच्यासारखंच दृसं.

त्यांच्या गप्पा आता 'लैंगिकता' (sexual) विषयाकडे वळतात. तोच विचारतो. तिला ते फारच 'खाजगी' वाटतं. तो सांगतो की पुढे जन्मभर एकत्र राहायचं असेल तर ते जाणूनघेणे त्याला महत्वाचे वाटते. ती उत्तरते की त्याचे त्यालाच ते हुडकावे लागेल. आणि मग ती तोच प्रश्न त्याला विचारून बाजू पलटवते, अधिक जाणून घ्यायचा प्रयत्न करते तेंव्हा तो तिचाच 'खाजगी'चा बचाव वापरून सुटका करून घेतो. गप्पांचा प्रवास आता 'ड्रिंक्स'कडे वळतो. धूम्रपानावरही गप्पा होतात. आणि संभाषणातलं तिच्या चेहऱ्यावरच स्मित आपल्याही ओठावर येतं. संवाद मी मुद्दामच देत नाहीये. तो मुळातूनच अनुभवण्याजोगा आहे.

आता पुन्हा 'सुपु'. तो अजून गाडीतच आहे. परत दृसं.

ते एकमेकांना आयुष्यातल्या ध्येयांबद्दल विचारू लागतात. त्याची ध्येयं, महत्त्वाकांक्षा सहजसाध्य वाटल्याने ती टोकरते, तर तो म्हणतो: They evolve.

**पुढे ती एक महत्वाचा प्रश्न विचारते:** रस्त्यात मुलं एखाद्या मुलीची छेड काढतांना दिसली तर तो मधे पडेल का, त्या मुलांना थांबवेल का?

**तो सांगतो:** एकट्याने नाही, पण काहितरी फेकून मारेन आणि पळून जाईन.

**ती:** लग्नझाल्यावर हेच माझ्याबाबत घडलं तर?

**तो:** नक्की सांगता नाही येणार, पण अजून बरच काही फेकून मारेन. आरडाओरड करून माणसं जमवेन, मदत मागवेन.

*(तिचे प्रश्न आता अधिक टोकदार होतायत हे पुढच्या प्रश्नावरून जाणवतं. ती रस्त्यावरल्या भिकारी लहान मुलांबद्दल विचारते)*

**ती:** तू अशा मुलांना पाहून काय करतोस?

त्यालाही याची जाणीव होऊन तो तिला तसे विचारतो. पण तिच्या अबोल पण शारिरीक प्रतिसादानंतर तो काही उत्तर देतो. आता प्रश्न विचारण्याची त्याची पाळी आहे याची ती त्याला जाणीव करून देते.

पुन्हा 'सुपु'. काही क्षणात तो हातात ते प्रेझेंट, तो बुके, आणि त्याची अटॅची घेऊन गाडीतून उतरतांना आणि एका संकुलात शिरतांना दिसतो. दृसं.

आता संभाषणाची गाडी एकमेकांच्या आई-वडीलांकडे वळते. त्याचे आई-वडील लग्नानंतर त्याच्याबरोबरच राहतील हे ठरलेलं असते. तो तिला सुचवितो की तिचे आई-वडीलही त्यांच्याबरोबर राहू शकतात. इथे ती एकुलतीएक मुलगी आहे हे आपल्याला कळते. तिला ते पटत नाही.

**तो:** प्रयत्न केल्याशिवाय कसं समजणार?

पुन्हा एकदा तिचा तो अबोल शारिरीक प्रतिसाद.

ती घड्याळाकडे पहाते.

त्याला सुचवते की आपले वीस प्रश्न संपले आहेत. तो सांगतो की त्याने फक्त पंधराच मोजलेत. तिलाच अजून विचारायचे असल्यास त्याची तयारी दर्शवितो. ती त्याला स्पष्ट सांगते की आपल्यात काहीच समान नाही. आपण फक्त आपल्या आई-वडलांच्या इच्छेखातर भेटलोत. तो तिला पटवायचा प्रयत्न करतो की तेच तर चांगले आहे. नवीन विचारांना, अनुभवांना त्याला सामोरं जायचं असतं.

पुन्हा 'सुपु'. त्याच्या हातातल्या सगळ्या सरंजाम्यासह लिफ्टचे दार उघडतोय. दृसं. लिफ्टने वर येतो. या दरम्यान 'ती'चा आवाज आपल्या सांगतोय की तिला हे सारं नकोय. दृसं.

तो घराचा दरवाजा उघडण्यासाठी किल्ली काढतो. पण काही लक्षात आल्यावर बेल दाबतो.

आता दृसं मध्ये त्याचा आवाज सांगतो की: मला एकटे राहण्यापेक्षा भांडणे आवडतील.

दरवाजा उघडतो. कुणी नवीन मुलगी दरवाजा आतून उघडते.
फोनवर ती नवीन मुलगी कुणाशी बोलत असते ते ऐकू येते.
बोलतच त्याला ती नवीन मुलगी आत घेते.
पुन्हा पार्श्वभूमीवर त्यांचा आधीचा संवाद.
तो विचारतो: तूला कशाने दुखः होतं?

**ती:** कोणी माझा अनादर केला तर.

**तो:** तूला आनंद कशाने होतो?

**ती:** (तेच सुंदर हसू) अनेक गोष्टींनी.

त्या गोष्टी ती सांगते.

**त्यावर तो तिला विचारतो:** माझी ध्येयं सांगू?

**ती:** पण आपण यावर आधिच बोललोय.

**तो:** I told you they evolove. (तिच्या संमतीने) मला 'चॅट' खायला आवडेल, रहमान ऐकायला आवडेल आणि मी जिमला जाईन म्हणतो. ('चॅट'चा संदर्भ तिच्या खा.पी.च्या आवडीत आलेला असतो. विस्तारभयास्तव वर सगळंच दिलं नाही.)

पुढचं मिनिटभराचं काही इथे शब्दांत व्यक्त करण्यापलीकडे मस्त आहे!

तो सांगतो की इथे आला तेंव्हा तो तिच्याइतकाच गोंधळलेला होता. I am a simple heartful guy. I adapt when adpating is required. I cross the bridge when I get there.

तो अजून काही सांगतो. तिला ते आवडत असाव असं तिच्या चेहऱ्यावरून, देहबोलीतून जाणवत. ते पुन्हा भेटायचं ठरवतात. त्याच्या “मग, आईला सांगू का की मला माझी ‘चि.सौ.कां.’ भेटलीय?” यावर ती फक्त देहबोलीतून हसते. इथे इतकावेळ त्यांच्या, दोघांच्या चेहऱ्यावर असलेला थोडा कॅमेरा लांब जावून दोघांनाही दाखवतो.

पुन्हा मागचचं ती नवीन मुलगी बोलत दरवाजा उघडतांनाचं दृष्य. ती नवीन मुलगी फोनवर बोलतच त्याच्या हातातला बुके घेते. पण आता तो आता जातांना आपली मूळ नायिका त्याने तिच्यासाठी आणलेल्या ‘भेटी’बद्दल छेडते. क्षणभर काही म्हणते. तेवढ्यात ती नवीन मुलगी हातात वाईनबॉटल घेऊन तिथे येते. नायिकेला मिठीत घेऊन ‘Happy Anniversary’ म्हणते. आणिक काही बोलून रजा घेते. तिथून निघते.

आपले नायक नायिका एकमेकांना जवळ घेतात. आणि उमटते:
Over 90% of maariages in India are still arranged.
Less than 5% result in divorce.
श्रेयनामावली देऊन लघुपट संपतो.

**आता थोडंस माझं :**

हा लघुपट २०११मध्ये आला. मी आणि पत्नीने तो पहिल्यांदा २०१४मध्ये पाहिला. खूप भावला. आवडला. इतका की, मग तो अनेकांना - लग्न झालेल्या आणि होऊ घातलेल्यांना आग्रहाने दाखवला. आणि म्हणूनच ‘आरंभ’च्या माध्यमातून संधी मिळताच मी आपल्या समोर त्याची कहाणी घेऊन आलो आहे. युट्युबवर - https://youtu.be/Z8X97OL06OY वर साडेपाच लाखांहून अधिक लोकांनी तो पाहिलाय.

एक चालक (ड्रायव्हर), नोकर आणि शेवटच्या मिनिटभरात आलेली ती नवीन मुलगी सोडल्यास पूर्ण लघुपटभर फक्त ‘तो’ आणि ‘ती’च आहेत. सुपु सोडल्यास बहुतेक दृष्य ‘तो’ आणि ‘ती’च्यावर केंद्रित आहेत. कॅमेरा त्यांच्या चेहऱ्यावर खिळून आहे. आणि म्हणूनच तिचे ते गोड हास्य. असे म्हणतात की नायिकेची – संस्कृती खेरची – कारकिर्द या लघुपटाने बहरली. ती निर्माता-दिग्दर्शकांच्या नजरेत आली.

# रात्रींबद्दलची गोष्ट! – अमृता देसर्डा

*(लेखिका आटपाडी नाईट्स या मराठी चित्रपटाबद्दल लिहित आहेत)*

'तुझ्याच्यांनं व्हईल का?' हा प्रश्न वश्याला उर्फ वसंताला सगळेच जण विचारतात. त्याच्या पुरुषपणावर शंका घेतात, कारण का तर तो किडकिडीत आहे.

पुरुष कसा असावा? किंवा नवरा कसा असला पाहिजे या संकल्पना भारतीय समाज मनात इतक्या खोलवर रुजलेल्या आहेत की त्या तोडून टाकणं अजूनही जमलेलं नाही.

तीच गोष्टी स्त्रियांच्या बाबतीत. स्त्री जर जाड असेल किंवा दिसायला काळी किंवा सुंदर नसेल तर लग्नाच्या बाजारात तिचा कसा निभाव लागणार? तिला मुले कशी होणार हा प्रश्न अनेकजण विचारत राहतात.

ही समस्या किंवा प्रश्न हा काही फक्त आजच्या पिढीचाच नाही. तर तो खूप आधीपासून चिघळत आलेला आहे. 'आटपाडी नाईट्स' या सिनेमाच्या माध्यमातून तो पुन्हा उपस्थित झाला आहे. आणि मराठी बोलणाऱ्या, ऐकणाऱ्या,पाहणाऱ्या माणसांसाठी तो खुलेपणाने बोलायला भाग पाडतो असं म्हणायला हरकत नाही.

वसंताची आई आपल्या लग्न झालेल्या मुलाला जवळ घेते, त्याच्या गालावरून हात फिरवते त्याचे पापे घेते तेव्हा मनाला दिलासा मिळतो. स्वतःच्या बारीकपणाचा न्यूनगंड असलेला आपला मुलगा चांगला आहे हे वारंवार तिच्या कृतीतून दाखवून देते. कुटुंबाचा संवादाचा पूल असलेली ही आई खूपच महत्वाची वाटते.

प्रत्येक कुटुंबातला कर्ता पुरुष हा उत्तमच असला पाहिजे, त्याने घराण्याचा वंश पुढे नेला पाहिजे, आणि एक मर्द म्हणून बाईला कायम खुश ठेवलं पाहिजे या ज्या अपेक्षा आपल्या मनात असतात त्याचं प्रारूप म्हणजे वसंताचे वडील. घरात धाक दाखवत जगणारा, आणि नेमक्या अवघड वेळी मुग गिळून गप्प बसणारा बाप आज अनेक घरांमध्ये दिसतो.

खाटमोडे कुटुंब हे त्या अर्थाने संवादी वाटलं. पण एका बाजूने पारंपारिक गोष्टींच्या स्वाधीन असलेलं देखील वाटलं. लग्न झाल्यावरची वसंत आणि प्रियाची पहिली रात्र. पहाट झाली तरी खाटेचा येणारा आवाज, घरातल्या माणसांची त्यावरून होणारी कुजबुज आणि माडीवर चाललेला धुमाकूळ एकीकडे हसवतो आणि एकीकडे अंतर्मुख करून सोडतो.

पुरुषाने पहिल्या रात्री चांगला परफॉरमन्स दिला पाहिजे, तो जर खूपच चांगला दिला तरीही आश्चर्य आणि नाही दिला तरीही आश्चर्य. या एका गोष्टीमुळे वैवाहिक जीवन कसं सुरुळीत होतं, आणि ते जर झालं नाही, तर काय होतं हे पाहण्यासाठी हा सिनेमा एकदातरी पाहिला पाहिजे.

लैंगिक शिक्षण मुळात काय आणि त्याच्या अज्ञानाचा परिणाम हा समाजजीवनावर कसा होतो या गोष्टींकडे कधीच गांभीर्याने पाहिले जात नाही.

मित्र जेव्हा चोरून तसली सीडी पाहतात, आणि त्यातून स्वतःचे समाधान करतात, तेव्हा त्यांनी जे पाहिले त्यातून लैंगिक शिक्षण झाले असा एक समज जनरली रूढ होतो. पण त्यातून मनात अनेक समज- गैरसमज निर्माण होतात. पाहिलेले जेव्हा प्रत्यक्ष सत्यात आणायचा प्रयत्न माणूस करतो तेव्हा मात्र त्याचा भ्रमनिरास होतो.

कुठल्याही नात्यात संवाद आणि गप्पा या गोष्टी जर झाल्या नाही तर, त्या नात्याचे भावनिक, शारीरिक, मानसिक पदर हे खुलत नाहीत. प्रत्येक गोष्टीला योग्य वेळ यावी लागते असा जो एक विचार आहे त्याचा जर आपण विचार केला तर मानवी नात्यांच्या बाबतीत तितका वेळ द्यावा लागतो. मुख्यतः स्त्री-पुरुष नात्यामध्ये पुरेसा एकमेकांना वेळ द्यावा लागतो हे ही या सिनेमातून अप्रत्यक्षरीत्या सांगितले आहे.

मला वाटतं, स्त्रियांना जशी आदराची, प्रतिष्ठेची आणि समजून घेण्याची गरज आहे, तशीच पुरुषांच्या बाबतीत पण थोडी जास्त गरजेची आहे. पुरुषाने त्याचं पुरुषत्व हे बेडवर आणि घराच्या बाहेर सतत सिद्ध करून दाखवायचं आणि त्यातून एक कर्ता पुरुष म्हणून जी प्रतिमा जगवत ठेवायची ही जी अपेक्षा आहे त्यातून आपण त्याच्याकडे केवळ एक माणूस म्हणून बघत नाही असेच वाटते.

या सिनेमाच्या निमित्ताने आजच्या समाजाच्या न बोलल्या गेलेल्या आणि लपवून ठेवलेल्या प्रश्नांवरचा पडदा थोडा हलला असं म्हणायला हरकत नाही. हा पडदा पूर्ण दूर होवून, स्त्री-आणि पुरुष मैत्रीच्या नात्यात खुले होवून एकमेकांना समजून घेवून स्वतःचे लैंगिक आयुष्य निरामय आणि आनंदी पद्धतीने जगायला लागतील अशी आशा करते.

# अंतरद्वंद्व: नाटक परीक्षण - अमृता देसर्डा

स्वतःच्या नवऱ्याची मनात असलेली भक्कम प्रतिमा तशीच राहावी म्हणून स्वतःशी झगडणारी मंदोदरी खरी की, अशोक वनात रामाच्या नावाचा जप करत अश्रू ढळणारी सीता खरी? किंवा स्वतःला आवडेल आणि भावेल तो पुरुष उपभोगणारी आणि तरीही अस्वस्थ राहणारी शूर्पा खरी? हे तीन प्रश्न मला 'महाराष्ट्र राज्य हौशी नाट्यस्पर्धेतील' 'अंतरद्वंद्व' हे दोन अंकी नाटक पाहून पडले. या तीन बायकांच्या मनोविश्वाचा खेळ अलौकिक वाटला. या स्त्रिया रामायणातल्या पात्र असल्या तरी आपल्या आजूबाजूला आजही आहेत. त्यापैकीच मी एक आहे, किंबहुना माझ्यातही एक शूर्पा दडली आहे, एक सीता दडली आहे आणि अर्थात मंदोदरी देखील आहे. माझ्यात म्हणण्यापेक्षा आजूबाजूला असणाऱ्या स्त्रियांमध्ये या तिघी दडल्या आहेत असे वाटत राहते.

रावणाने रंभा आणि वेदवतीवर केलेली बळजबरी ही आजच्या युगात होणाऱ्या भीषण बलात्कारासारखीच वाटली. वासनेचे हे अनाकलनीय कांड माणसाच्या आयुष्याचे मातेरे करते, मग तो माणूस लंकाधिपती रावण असो, किंवा आत्ताच्या नुकत्याच घडलेल्या प्रियांका रेड्डीच्या बलात्काराच्या घटनेचे उदाहरण असो. काळ बदलतो, माणसे बदलतात, पण मानवी वृत्ती बदलत नाहीत. रामायण, महाभारत यांसारखे साहित्य हे काळ कितीही पुढे गेला तरीही टिकून आहे याची साक्ष पदोपदी हे नाटक पाहिल्यावर होते.

सत्ता आणि स्त्री या दोन गोष्टी पुरुषाने जर मिळवल्या तरच त्याचा पुरुषार्थ सिद्ध होतो हा विचार त्याला काय काय करायला लावतो हे या नाटकात खूपच प्रभावीपणे मांडला आहे. यातला सध्या असलेला सत्तेचा सिद्धांत आत्ताच्या काळाला किती चपखल लागू होतो हे महाराष्ट्राच्या चालू राजकारणाच्या सत्तेच्या घडामोडीतून दिसून येतेच हे काही सांगायला नको.

या नाटकातला अजून एक मुद्दा जो आत्मपरीक्षण करायला भाग पाडतो तो म्हणजे मंदोदरी आणि सीता या दोघींचे पातिव्रत्य. सीतेच्या बाबतीत तिचा पती राम हा तिच्याशी एकनिष्ठ. पण मंदोदरीचा रावण हा स्त्रीलंपट. तरीही आपला पती हा एक चांगला माणूस आहे, आणि तो असा आहे यात त्याचा दोष नाही, तर इतर व्यक्तींच्या मुळेच तो असे वागतो याचे समर्थन करणारी आणि स्वतःच्या डोळयांनी नवऱ्याला इतर स्त्रियांच्या कुशीत पाहणारी मंदोदरी ही अंगावर काटा आणते.

ही व्यक्तिरेखा म्हणजे स्त्रीच्या भावविश्वाला एकीकडे झाकोळून ठेवणारी आणि दुसरीकडे आदर्श गृहिणी, पत्नी म्हणून स्वतःचा समझोता करणारी मंदोदरी मनाचा तळ ढवळून टाकते. विसंगतीने परिपूर्ण असलेल्या या जगण्यात मानवी हतबलता, आत्मीयता, आणि प्रिय व्यक्तीबद्दल वाटणारे पराकोटीचे प्रेम अधोरेखित करते.

सगळयात बंडखोर आणि स्वैर असूनही अस्वस्थ असलेली शूर्पा अर्थात शूर्पनखा ही व्यक्तिरेखा नाटकातला सगळयात महत्वाचा केंद्रबिंदू वाटला. तिचे आणि तिच्या वहिनीचे संवाद, तिच्या भावाबद्दल वाटणारी असूया,

प्रेम, द्वेष या भावना, रामाबद्दल वाटणारे आकर्षण, गेलेल्या पतीबद्दल वाटणारे दुःख, सीता आणि मंदोदरी या दोघींच्या पतीनिष्ठेच्या संकल्पनेबद्दल असलेला तिटकारा या सगळयाच गोष्टी खूप विचार करायला प्रवृत्त करतात.

शूर्पा ही स्त्रीच्या मनातल्या प्रामाणिक उघड्या आणि स्वैर भावनांचे प्रतिक वाटली. अगदी स्वतःसाठी खरीखुरी आणि प्रामाणिकपणे जगणारी, आणि जसे आहे तसे वागणारी आणि व्यक्त होणारी स्त्री वाटली. माणसाच्या मनात चालणारा कल्लोळ आणि त्यातून घडणारे नाट्य म्हणजे रामायण. हे आजही एक आदर्श आणि दैवी असलेले साहित्य या दोन अंकी नाटकातून नव्या दृष्टीकोनातून बघायला मिळाले याचे समाधान वाटले. मानवी मनाचा हा द्वंद्व दिसतो तितका सोपा नाही, आणि वाटतो तितका अवघड पण नाही.

पण नाटकाच्या माध्यमातून तो व्यक्त होण्याचा उत्तम प्रयत्न झाला असे तरी नक्कीच वाटत आहे. प्रदीप रत्नाकर आणि जगदीश पवार या दोघांचे खूप आभार. एक चांगली कलाकृती पाहायला मिळाली.

# २०२०: नवीन सिनेमे, नवीन शक्यता, नवीन आशा - निखील शेलार

दादासाहेब फाळके या मराठमोठ्या माणसाने राजा हरिश्चंद्र हा भारतातील पहिला चित्रपट १९१३ स प्रदर्शित केला. त्यावेळी कोणीच असा विचार केला नसेल की हे रोपटे एकदिवस महावृक्षाचे रूप घेईल. आज भारतात हिंदी, इंग्लिश, मराठी आणि आदी प्रादेशिक भाषेत सुमारे दोन हजार सेन्सॉर संमत चित्रपट प्रदर्शित होतात. यात आपले मराठी चित्रपट सुद्धा मागे नाहीत. व्ही. शांताराम, भालजी पेंढारकर यासारख्या दिग्दर्शकांनी जुना सुवर्ण काळ गाजवला. पण नव्वद दशकानंतर तोच तोच थिल्लरपणा मराठी चित्रपटात दिसू लागला आणि मराठी प्रेक्षकांनी मराठी चित्रपटाकडे पाठ दाखवली. हा मंदीचा काळ असाच चालू असताना संदीप सावंत नावाच्या नवोदित दिग्दर्शकाने श्वास नावाच्या चित्रपटाने मराठी चित्रपट सृष्टीसाठी नवीन दृष्टी दिली. मराठी चित्रपटांनी अक्षरशः कात टाकली. नवीन दिग्दर्शक, नवीन कलाकार, नवीन तंत्रज्ञ या सगळ्यांनी चाकोरी बाहेरचे सिनेमे बनवायला सुरुवात केली आणि परिणामी मराठी प्रेक्षक पुन्हा चित्रपट गृहाकडे वळू लागला. २०१९ ला तब्बल १२० मराठी सेन्सॉर संमत सिनेमे प्रदर्शित झाले. हे वर्ष मराठी चित्रपटासाठी संमिश्र प्रतिसादाचे ठरले. २०२० सुद्धा नवीन चित्रपट, नवीन कल्पना, नवीन प्रयोग, नवीन चेहरे घेऊन येत आहे. त्यावर एक छोटासा दृष्टिक्षेप टाकू या.

२०२० च्याच पहिल्या आठवड्यात झी सिनेमा हा समीर विद्वांस दिग्दर्शित आणि क्षितिज पटवर्धन लिखित धुरळा हा सिनेमा घेऊन आला. मल्टीस्टारर असलेला या चित्रपटाला चांगला वेलकम आणि उत्तम प्रतिसाद प्रेक्षकांनी देऊन नवीन वर्षाला चांगली सुरवात झाली. जानेवारीच्याच दुसऱ्या आठवड्यात तान्हाजी हा ओम राऊत दिग्दर्शित हिंदी चित्रपट प्रदर्शित झाला. हा चित्रपट हिंदी असला तरी यात खूप मराठी कलाकारांची हजेरी होती. या मराठमोळ्या आणि शिवकालीन अजरामर कथेला पूर्ण भारतात उत्तम प्रतिसाद भेटतोय. हा पण एका बाजूने मराठीचा विजय म्हणावा लागेल. तसा हा चित्रपट मराठीत डब होऊन सुद्धा प्रदर्शित झाला आहे.

सैराटच्या आर्चीचा म्हणजे रिंकू राजगुरू अभिनित मेकअप चित्रपट लवकरच प्रदर्शित होईल. यात तिच्याबरोबर सहअभिनेता चिन्मय उदगीरकर असेल. मराठी चित्रपटातील परफेक्शनिस्ट म्हणून प्रचलित असलेला सुबोध भावेचा भयभीत हा चित्रपट फेब्रुवारीच्याच शेवटच्या आठवड्यात येईल. हा चित्रपट प्रेक्षकांना नक्कीच भयभीत करून मनोरंजन करेल अशी चित्रपट वर्तुळात चर्चा आहे. मराठी चित्रपटात म्हणे कथा, संहिता

हेच सिनेमाचे खरे हिरो असतात. त्याच वाक्याला खरा ठरवणारा म्होरक्या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकाची मने जिंकत आहे. ही गावातील जातपात, शाळा या विषयावर भाष्य करणारी, चित्रपट महोत्सवात गाजलेली कथा फेब्रुवारीत प्रेक्षकाच्या भेटीस येईल. नेहा पेंडसे आणि सिद्धार्थ मेनन अभिनित जून नावाचा चित्रपट यावर्षी प्रदर्शित होईल. जितेंद्र जोशी अभिनित असलेला चोरीचा मामला हा चित्रपट सुद्धा यावर्षी रिलीज होईल. अनिकेत विश्वासराव आणि सिद्धार्थ जाधव यांचा जागो मोहन प्यारे हा चित्रपट प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी वर्णी लावेल.

हिंदी आणि प्रादेशिक चित्रपटात सध्या बायोपिक या पिकाची चलती आहे. वसंतराव देशपांडे यांच्या जीवनावर चित्रपट बनविण्याचे शिवधनुष्य निपुण धर्माधिकारी या वयाने कमी पण हुशार अशा दिग्दर्शकाने उचलले आहे. या आधी धप्पा, बापजन्म असे दोन चित्रपट निपुणचे रिलीज झाले आहेत. धप्पा साठी निपुणला नर्गिस दत्त राष्ट्रीय एकात्मतेचा राष्ट्रीय पुरस्कार भेटला आहे. तान्हाजीच्या यशानंतर बाजीप्रभू देशपांडे या लढवय्या मावळ्याकडे लक्ष जात आहे. फर्जद आणि फत्तेशिकस्त या चित्रपटाच्या यशानंतर दिगपाल लांजेकर या दिग्दर्शकाने जंग जौहर या चित्रपटाची घोषणा केली आहे. यात बाजीप्रभू देशपांडे यांचे महवाचे पात्र असेल. हा चित्रपट जून २०२० मध्ये भेटीस येईल. या विषयात अजुन तिढा निर्माण झाला जेव्हा अभिजित देशपांडे यांनी पावनखिंड या चित्रपटाची घोषणा केली. पावनखिंड म्हणजे पुन्हा बाजीप्रभू देशपांडे चा इतिहास जागा होईल. अभिजित देशपांडे यांनी दोन वर्षांपूर्वी "आणि काशिनाथ घाणेकर" असा यशस्वी चित्रपट दिला होता. अशा प्रकारे दोन निष्णात दिग्दर्शक बाजीप्रभूवर चित्रपट बनवत आहेत.

२०२० मधले अजुन एक आकर्षण की स्वयं बिग बी अमिताभ बच्चन मराठी चित्रपटात दिसणार आहेत. मिलिंद लेले हा दिग्दर्शक अे बी आणि सी डी हा चित्रपट साकार करतोय. यात अमिताभजी, विक्रम गोखले, सुबोध भावे आणि सायली संजीव दिसणार आहेत. ही सायली संजीव म्हणजे काहे दिया परदेस या डेली सोप मधली गौरी. या सायली संजीव साठी हे वर्ष फार महत्त्वाचे आहे. हेमंत ढोमे दिग्दर्शित सातारचा सलमान मध्ये ती दिसेल तसेच गोष्ट एका पैठणीची यात ती लीड रोलमध्ये दिसेल. अशा प्रकारे हे वर्ष छोट्या पडद्यावरून मोठ्या पडद्यावर प्रवेश करण्यासाठी आश्वासक आहे.

मन फकिरा या चित्रपटात सुव्रत जोशी आणि अंजली पाटील ही नवी कोरी जोडी दिसेल. गेल्या वर्षी प्रथमेश परब हा कलाकार टकाटक चित्रपट घेऊन आला होता. यंदा तो टल्ली चित्रपट घेऊन येतोय. तसेच २०२०

मध्ये काळ हा भयपट येतोय. तत्ताड असे विचित्र नाव असणारा चित्रपट येतोय. वेगळी वाट, विकून टाक, ये रे ये रे पावसा, अनन्या, बलोच, दाह, एकदा काय झाले यासारखे नवनवीन कल्पनेने नटलेले चित्रपट आपले नशीब आजमावण्यासाठी येतील. असाच एक दिवस सैराट आला होता आणि १०० करोडच्या घरात व्यवसाय करत गौरविला गेला. अशीच स्वप्ने पाहत पाहत अनेक निर्माते, दिग्दर्शक, कलाकार आपले विषय घेऊन येत असतात. काय कुणास ठाऊक नवा सैराट आपली वाट पाहत असेल २०२० मध्ये.

अशा प्रकारे नवीन वर्ष हे नवीन संकल्पना घेऊन येत आहे. पण मराठी प्रेक्षकांनी सुद्धा मराठी चित्रपट हे चित्रपट गृहात जाऊन पाहिले पाहिजे. संध्याकाळी मराठी डेली सोप मध्ये गुंतत चाललेला मराठी प्रेक्षकांनी चित्रपट गृहात जाऊन या चित्रपटांना प्रतिसाद दिला पाहिजे. केरळमध्ये मल्याळम चित्रपटाचे बजेट २० करोड असते. पण त्याचे पब्लिसिटीचे बजेट त्या तुलनेत फार कमी असते. कारण त्या प्रेक्षकांना फक्त सांगावे लागते की नवीन चित्रपट येतोय. तो चांगला की वाईट हे प्रेक्षक येऊन चित्रपटगृहात ठरवतात. असे मुबलक वातावरण महाराष्ट्रात तयार करण्याची गरज आहे. नवीन चित्रपट हा टीव्ही वर येईल तेव्हाच मी पाहीन ही पळवाट बंद केली पाहिजे. चित्रपट चालले तर नवीन रक्त या मराठी चित्रपटात आपले उपजीविकेचे साधन शोधून याकडे वळतील आणि आपल्याला उतम्मोत्तम चित्रपट भेटतील. चला तर मग नवी  वर्षी नवीन संकल्प करून मराठी चित्रपटांना प्रतिसाद देऊन त्याचा गौरव करू या.

# नागराज मंजुळे: माणूसपण बहाल करणारी दृष्टी - निखील शेलार

एकदा सुनील गावसकर यांनी एका पुस्तकांची प्रस्तावना लिहिली होती की, सचिन तेंडूलकरने मिडलक्लास लोकांना काय दिले? तर जो त्याने पैसा कमावला त्याचा मध्यम वर्गियांना काहीच उपयोग नाही, त्याने जी इतकी शतके मारली त्याचा मध्यम वर्गीयांना काहीच उपयोग नाही. त्याला जो सर्व जगात मान सन्मान भेटला त्याचा मध्यम वर्गीयांना काहीच उपयोग नाही. मग जे सचिनने तेवीस वर्षात केले त्याचा सामान्य माणसासाठी काहीच उपयोग नाही का? तर या प्रश्नांचे उत्तर आहे की "उपयोग आहे". सामान्य कुटुंबात जन्माला येऊन सुद्धा आपण एक दिवस हिमालयाचे उत्तुंग शिखर माऊंट एव्हरेस्ट सर करू शकतो हा विश्वास आणि यशाचे उंच शिखर गाठून सुद्धा आपले पाय जमीनीत घट्ट रोवून ठेवावे हा संस्कार ज्या माणसाने बहुजन समाजाला दिला तो सचिन रमेश तेंडुलकर आहे. या एका परिच्छेदात सुनील गावसकर यांनी सचिनचा गौरव केला होता.

माझ्या सारख्या ८० च्या दशकात जन्मलेल्या मुलांनी सचिनची कारकीर्द पूर्ण पाहिली. तो जरी वयाने मोठा असला तरी तो बहुधा समवयिन आहे असा भास व्हायचा. तरी माझे वय आणि सचिनचा खेळ एकत्र बहरत होते. सचिन रिटायर्ड झाला आणि अनेकासाठी क्रिकेट पाहण्यासाठी जे प्रमुख कारण होते तेच रिटायर्ड झाल्यासारखे वाटले. विराट किंवा रोहित हे उत्तम खेळाडू असले तरी तो सचिनचा फिल या सचिन वेड्या प्रेक्षकांना येत नव्हता. बहुतेक जनरेशन गॅप हा काही प्रकार आहे तो आडवा येत असावा. पण सचिन रिटायर्ड झाल्यावर फार मोठी पोकळी निर्माण झाली. हे ८० च्याच दशकात जन्मलेले आता वयाने ३५ - ४० च्या घरात येऊन पोहचले होते. यांना समवयींन असा, सामान्य कुटुंबात जन्माला आलेला कोणी, पण असामान्य कर्तृत्व असलेला कोणी मिळू शकतो का असा प्रश्न मला पडू लागला.

सैराट रिलीज होऊन एव्हाना तीन वर्ष उलटली. सैराट...म्हणजे १०० करोड बिझिनेस करणारा एकमेव मराठी चित्रपट. इतकं घवघवीत यशाचे शिखर गाठून सुद्धा आपला साधेपण न सोडता आपले पाय जमिनीवर ठेवणारा नागराज मंजुळेमध्ये मला तो सचिनचा फिल येऊ लागला. त्याचा विचार करता करता त्याच्यासाठी प्रेम दिवसागणिक वाढतच गेले. अमिताभ बच्चन अभिनित आणि नागराज मंजुळे दिग्दर्शित झुंड चित्रपट प्रदर्शनाच्या वाटेवर असताना नागराजवर दृष्टीक्षेप टाकणारा हा छोटासा प्रयत्न.

नागराजचा जन्म सोलापूर जिल्ह्यातील, करमाळा तालुक्यातील, जेऊर या गावी वडार समाजातील एका कुटुंबात १९७७ रोजी झाला. नागराजचे वडील दगड, खडी फोडण्याचे काम करत होते. नागराजचे वडील पोपटराव याचे मोठे भाऊ बाबूराव यांना मुल नव्हते. तेव्हा पोपटरावांनी दिलेल्या वचनाप्रमाणे तीन महिन्याचा आपला मोठा मुलगा नागराज याला बाबूरावाच्या झोळीत टाकला. म्हणून नागराज जेव्हा आपला कविता संग्रह प्रकाशित करतो त्यास आपले नाव "नागराज बाबूराव मंजुळे" देतो तर चित्रपट प्रदर्शित करतो त्यास आपले नाव "नागराज पोपटराव मंजुळे" देतो.

नागराज म्हणतो की तो दहावीला असताना त्यास वजाबाकी सुद्धा येत नव्हती पण तो चित्र, रांगोळी सुंदर काढत होता. कॅरम सुद्धा चांगला खेळत होता. पण त्याला हे सुंदर विषय अवगत होते त्याच्या परीक्षा शाळेत होत नव्हत्या तर ज्या विषयाची त्याला किळस वाटत असे त्याच्या शाळेत परीक्षा होत असे. परिणामी तो दहावीत नापास झाला. दहावीच्याच सुट्टीत त्याला वाचनाची आवड जडली. ही आवड इतकी जडली की तो वर्तमानपत्रे, पुस्तके, लायब्ररी वाचून पालथ्या घातल्या. मग त्याने हळूहळू शालेय पुस्तकांचा अभ्यास केला. एक त्याच्या मित्राने त्याला गणितात मदत केली.

कधीही पाठ न करता येणारा गणित विषयातील काही गणिते, प्रमेय त्याने तोंडपाठ केली आणि तो कसाबसा दहावी पास झाला. पुढे त्याने सोलापूर जिल्ह्यात तो पदवी झाला. पुढे पुण्याला जाऊन मराठी विषयात त्याने एम ए  केले. नंतर एम फिल पूर्ण केले. नगर जिल्ह्यात मास कम्युनिकेशन चा दोन वर्षाचा कोर्स करताना अभ्यासाचा भाग म्हणून त्याने पिस्तुल्या ही लघुकथा लिहली आणि शूट केली. त्यास नागराज मंजुळेस आणि बाल कलाकार सूरज पवार यांना राष्ट्रीय पुरस्कार भेटला. या लघुकथेत जाती धर्माची मक्तेदारी असलेल्या समाजात एक चिमुरड्यास शिक्षणाची आवड असून सुद्धा त्याला काय अडथळे, समस्या येतात याच सुंदर, पण कमीत कमी दृश्यात सुंदर प्रदर्शन केले. या लघुकथेमुळे कला क्षेत्रात लोकांना नागराज माहिती होऊ लागला.

नागराजने मग चित्रपटाचा मार्ग हेरला. फॅन्ड्री विषय लिहिताना त्याची भाषा मराठी असावी की ग्रामीण बोली भाषा असावी यापासून वाद होते. पण नागराज आपल्या बोली भाषेवर अटळ होता. फॅन्ड्री या शब्दाचा अर्थ आहे डुक्कर. ही कथा खालच्या एका वर्गातील डुक्कर पकडणाऱ्या कुटुंबाची आहे. यात वरचा वर्ग आणि खालचा वर्ग हा वाद आहे, खालच्या वर्गातील समस्या आहेत. खालच्या वर्गातील मुलांचे वरच्या वर्गातील मुलींशी एकतर्फी प्रेम आहे. या चित्रपटाचा शेवट सगळया प्रेक्षकाच्या डोळयाच्या कडा ओल्या करतात.

चित्रपटातील तथाकथित कुटुंब जेव्हा एक डुक्कर पकडत होते. तेव्हा पूर्ण गाव हा तमाशा निर्लज्जपणे पाहत होता. शेवटी जेव्हा तो डुक्कर हाताशी लागणार असे वाटले होते तितक्याच बाजूच्या शाळेत राष्ट्रगीत सुरू होते. खालच्या वर्गातील त्या कुटुंबाची ओढाताण होत असून सुद्धा राष्ट्रगीताच्या सन्मानासाठी ते कुटुंब डुक्कर न पकडता ताठ उभे राहते. कारण राष्ट्रगीत बोलताना येणारा शहारा हा कोणाची जातपात विचारत नाही तर प्रत्येक देशभक्त व्यक्तीच्या अंगावर हा शहारा येतो. जात पात यासारख्या प्रकाराला सुरुंग लावणारा हा चित्रपट होता. २०१४ साली फॅन्ड्री प्रदर्शित झाला आणि महाराष्ट्राला एक उत्तम दिग्दर्शक भेटला.

२००९ साली नागराजने एक संहिता लिहिली होती. ती वर्क होणार नाही असे वाटून त्याने ही संहिता बाजूला ठेवली. पण फॅन्ड्रीच्या यशाने तो आधी चेपावलेला आत्मविश्वास पुन्हा उचल खाऊ लागला. २०१३ साली या चित्रपटाची कास्ट आणि लोकेशन निवड सुरू झाली. सर्व काही परफेक्ट असावे असा नागराजचा आग्रह होता. सर्व नागराज आणि टीमच्या अथक परिश्रमाने हा चित्रपट २०१६ साली प्रदर्शित झाला. तो चित्रपट म्हणजे आपला सैराट होय. या चित्रपटातनंतर सर्वाचे जीवन बदलले. मग नागराज असो किंवा आर्ची परशा असो किंवा अजय अतुल चे संगीत असो. सर्व काही विलक्षण होते. सैराटच्या संगीताने बहुजन समाजाला भुरळ घातली. सैराट जितका चांगला चित्रपट होता तितकीच सैराट बनविण्यासाठी लागलेली मेहनत वाखण्याजोगी होती.

पुढे ही मेहनत लोकांना समजावी म्हणून "सैराटच्या नावानं चांगभलं" नावाने गार्गी कुलकर्णी हिने लघुकथा लोकाच्या समोर आणली. १०० करोड कमावणारा एकमेव मराठी चित्रपट म्हणजे सैराट होय. २००९ साली चित्रपट विषयी कोणतेही बॅकग्राऊंड नसलेल्या एका इसमाने हे स्वप्न पाहिले आणि मराठी चित्रपट सृष्टीस नवी दृष्टी दिली.

नागराजने नाळ नावाचा चित्रपट निर्माता म्हणून प्रदर्शित केला. यात त्याने एक महत्त्वाची भूमिका सुद्धा केली. हा यशस्वी चित्रपटसुद्धा प्रेक्षकांना टिव्हीवरील फुकट मनोरंजन सोडून चित्रपटगृहाकडे घेऊन आला. नागराजने "उन्हाच्या कटाविरुद्ध" हा कविता संग्रह लिहला आहे. "पावसाचा निंबंध" ही लघुकथा बनविली आहे. पिस्तुल्यापासून व्हाया सैराट ते नाळ पर्यंत नागराजला राष्ट्रीय पुरस्कार सह अनेक पारितोषिके, अनेक मान सन्मान भेटले. पण या मातीतल्या माणसाची मती काही भ्रष्ट झाली नाही. त्याच्या हातांनी काही अहंकारास शिवले नाही.

ज्याची मुळे या मातीत घट्ट रुळली आहेत तो नागराज आता झुंड हा त्याचा पहिला हिंदी चित्रपट घेऊन येत आहे. लहानपणी चोरी करून ज्या बच्चन साहेबांचे त्याने चित्रपट पाहिले. त्या बिग बी बरोबर चित्रपट करणे म्हणजे मानाचा तुरा होय. ही कथा एका विजय बारसे नावाच्या नागपूर स्थित क्रिडा प्रशिक्षकाची आहे. विजय बारसे यांनी कितीतरी झोपडपट्टीमधील मुलांना फुटबॉलसाठी प्रवृत्त केले. अमली पदार्थ आणि निरनिराळ्या व्यसनाच्या आहारी गेलेल्या झोपडपट्टीतील तरुणांना त्यांनी खेळाचा मार्ग दाखवून त्यांचे पुनवर्सन केले. बिग बी च्या आवाजात जेव्हा हे स्वर ऐकू येतात की "सर, ईसे झुंड नाही तो टीम बोलीये"...तेव्हा हे कळून चुकते की पुन्हा ही आपल्या मातीतील कथा आहे. ही कथा संघर्षाची आहे. ही कथा बुराई पे सच्चाईचा विजय आहे. अशा या निश्चयाच्या कथेला, संघर्षाच्या कथेला पूर्ण जगात उदंड प्रतिसाद भेटू दे ही ईश्वर चरणी प्रार्थना.

पूर्वी राजा हा फक्त राणीच्या पोटातून जन्म घेत होता. राजाचाच मुलगा राजा होऊन सिंहासनाधीष होत असे. पण आता राजा राणीच्या पोटातून नव्हे तर मतदारांच्या पेटीतून जन्मतो. त्याचप्रमाणे आता कलेच्या क्षेत्रात कर्तुत्वाची मक्तेदारी आता फक्त खान, कपूर आदी आडनावात राहिली नाही. ही कला झिरपत झिरपत बहुजन समाजाच्या हातात आली आहे. ही कला जितकी ग्रामीण भागात रुळेल, ही कला जितकी गरीब, भटक्या जमाती मध्ये पाझरेल तितकीच ती आपले प्रचंड रूप धारण करून समाजासमोर, प्रेक्षकांसमोर उत्कृष्ट रूप धारण करेल. त्याचेच उदाहरण म्हणजे छोट्याशा खेड्यात जन्मलेले नागराज मंजुळेसारखी वल्ली. अशी उदाहरणच आपल्या काळजात हात घालून मानवी स्पंदनाची आठवण करून देत माणूसपण बहाल करतात. हेच उद्याचा नवीन भारत बनविण्यासाठी नक्कीच कारणीभूत ठरेल.

# द विचर: पोलंडचा महानायक ! – अक्षर प्रभु देसाई

*(कल्पनारम्य कथांची माहिती देणारी ही लेखमाला या अंकापासून सुरु करत आहोत. त्याचा हा पहिला भाग!)*

आरंभ मासिकांत आपण वाचकांना अतिशय नाविन्यपूर्ण असे लेख वाचायला मिळतात. ह्या लेखांत आम्ही विदेशी भाषांतील सुप्रसिद्ध कल्पनारम्य कथांचा वेध घेणार आहोत. मराठी भाषेंत फेंटासि म्हणजे रम्य कथा इतर भाषांच्या तुलनेत जास्त नाहीत. नाथ माधवांचा वीरधवल हि कदाचित मराठीतील सर्वाधिक लोकप्रिय अशी रम्यकथा होती. आम्हा भारतीयांना पण रम्यकथानची गरज सुद्धा नव्हती कारण आमच्या धर्मातील बहुतेक पुस्तके कल्पनाविलासाने नटलेली आहेत. मृत्युंजय सारख्या कादंबरींना जर आम्ही निव्वळ साहित्य प्रकार म्हणून पहिले तर त्या सुद्धा रम्यकथाच ठरतील.

आजच्या लेखांत आम्ही माहिती करून घेणार आहोत पोलिश भाषेतील अतिशय सुप्रसिद्ध अश्या पुस्तक मालिकांची ज्यांना लोक "विचर" म्हणून ओळखतात. १९९३ मध्ये अलेक्सएण्डर सॅपकोविस्की ह्या लेखकाने हे पहिले पुस्तक लिहिले आणि ते संपूर्ण युरोप मध्ये तुफान लोकप्रिय झाले. त्यांत २०१३ पर्यंत ह्या महाकथेची एकूण ८ पुस्तके प्रकाशित झाली. २०१६ मध्ये विचर ३ नावाची गेम सुद्धा निर्माण करण्यात आली आणि आज पर्यंत जगांतील सर्वाधिक लोकप्रिय गेम पैकी ती एक आहे. गेम ची लोकप्रियता पाहून नेटफ्लिक्स ने विचर ह्या नावाने मालिका सुद्धा बनवली आहे जी ह्या २० डिसेंबर ला प्रकाशित होईल. ह्यांत विचर नायकाचा रोल सुपरमॅन चा अभिनेता हेन्री कवील करणार आहे.

ही कथा एका काल्पनिक दुनियेत घडते. ह्या काल्पनिक दुनियेत सर्वांत प्रथम एल्फ येतात. एल्फ हि एक काल्पनिक प्रजाती आहे. आमच्या हिंदू धर्मांत ज्यांना आम्ही गंधर्व म्हणतो त्याच प्रकारची. एल्फ अतिशय सुंदर दिसतात. त्यांना गायन नृत्य इत्यादी येते पण त्याच वेळी हे लोक जवळ जवळ अमर सुद्धा असतात. एल्फ लोकांना जादू विद्या सुद्धा येते. एल्फ शिवाय ह्या दुनियेत बुटके आणि राक्षस म्हणजे (गनोम) सुद्धा असतात. बुटके आणि एल्फ ह्यांचे प्रचंड मोठे युद्ध होते ज्यांत एल्फ चा विजय होतो. बुटके लोक अवजारे बनवण्यात वकगबगार असतात ते डोंगरांत पळून जातात आणि तिथे डोंगर खणून गुप्त गुफा बनवून त्यांत राहतात. एल्फ लोक सुपीक जमीन आणि जंगलावर आपला कब्जा करतात.

मानवांचे आगमन कथेच्या कलमांच्या सुमारे ५०० वर्षे आधी होते. मानव आधी येऊन एल्फ कडून जादू वगैरे शिकून घेतात आणि नंतर एल्फ लोकांवर उलटून त्यांचा पराभव करतात. कथेच्या सुरवातीला ह्या दुनियेत दक्षिणेला नीलफगर्दीअन्स ह्यांचे राज्य आहे तर उत्तरेला विविध उत्तरीय राजांचे राज्य आहे. समुद्रांतील बेटांवर चाच्यांचे राज्य आहे. नीलफ राजाचे आणि ह्या उत्तरेच्या राजांचे वारंवार युद्ध होत असते. संपूर्ण कथेंत ह्या दोन्ही पक्षांत २ महायुद्धे होतात.

पण आता विचर हा प्रकार काय आहे ? ह्या काल्पनिक दुनियेत अनेक प्रकारच्या जादुई गोष्टी आहेत. विविध राक्षस, भुते, महाभयानक जनावरे, चेटकिणी, हडळ, ब्राह्मसमंध इत्यादी ह्या दुनियेत सोकाळली आहेत. अत्यंत प्राचीन अश्या ह्या गोष्टी असून मानवांना ह्या सर्वांची प्रचंड भीती वाटते. ज्या एल्फ लोकांना ह्या सर्वांची माहिती होती ते बहुतेक करून मारले गेले आहेत किंवा अज्ञातवासांत आहेत. ह्या दुनियेत येऊन ५०० वर्षे झाली तरी मानवाने अजून ह्या सर्व अतींद्रिय आणि पारलौकिक शक्तीवर विजय प्राप्त केला नाही.

ह्या दुनियेत मेज म्हणजे पुरुष तांत्रिक आहेत आणि सॉसेरेस म्हणजे स्त्री तांत्रिक आहेत. ह्यातील काही विद्वान तंत्रिकांनी मंत्रशक्तीने मानवी जनुकांत बदल कसा करायचा ह्यांचे ज्ञान संपादन केले आणि एक शाळा स्थापन केली. ह्या शाळेंत ते अनाथ किंवा आई वडिलांनी सोडून दिलेल्या मुलांना घेत असत आणि त्यांच्यावर मंत्रप्रयोग करून त्यांना साधारण मानवापासून शक्तिशाली अश्या "विचर" ह्या प्रजातींत बदलत असत. फक्त पुरुष मुलेच विचर बनू शकतात. विचर बनण्यासाठी अतिशय खडतर असे शिक्षण घ्यावे लागते. मंत्रसिद्धी शिवाय विचर ला प्राणि जगत, भूत जगत आणि वनस्पती जगताबद्दल इत्यंभूत माहिती शिकावी लागत असे. त्याशिवाय घोडेस्वारी, शस्त्र प्रयोग आणि इतर खडतर असे शारिरीक व्यायाम सुद्धा करावे लागत असत. बहुतेक मुलांचा ह्या शिक्षणाच्या दरम्यान मृत्यू होत असे. ह्या शिक्षणामुळे विचर लोकांच्या जनुकांत बदल होऊन त्यांना अनेक सिद्धी प्राप्त होतात. कुत्र्याप्रमाणे तीक्ष्ण घाणेंद्रिये, गरुडा प्रमाणे नजर, संमोहन शक्ती, इत्यादी. पण ह्याचा एक परिणाम म्हणून विचर लोकांना भावना अजिबात नसतात त्याच प्रमाणे विचर मुलांना जन्म देण्यास असमर्थ असतात. त्याच प्रमाणे विचर हे कधी म्हातारे होत नाहीत. बहुतेक विचर ४० वर्षांचे वाटतात. ह्या वयांत ते तरुण तसेच प्रगल्भ वाटतात.

कथेच्या ९० वर्षे आधी अनेक पारलौकिक शक्तींनी ह्या शाळेवर हल्ला केला आणि सर्व तंत्रिकांना आणि जवळ जवळ सर्व विचर ना मारून टाकले. ह्या हल्ल्यांत फक्त ४ विचर वाचले आणि सर्व तंत्रिकांचा मृत्यू झाला. त्यामुळे आणखीन नवीन विचर निर्माण होण्याचा मार्ग सुद्धा बंद झाला.

आमच्या कथेचा नायक आहे विचर गेराल्ट ऑफ रिव्हिआ. गेराल्ट १०६ वर्षांचा आहे पण आपल्या शक्तीमुळे तो फक्त ४० वर्षांचा वाटतो. गेराल्ट संपूर्ण दुनियेत फिरून विविध शक्तींशी लढून त्यांच्या नायनाट करतो. चेटकिणी, हडळ, भूतानी ग्रस्त अशी घरे, पाण्यातील भुते इत्यादी शक्तींना मारण्यासाठी लोक त्याला पैसे देतात. हे पैसे गेराल्ट नंतर विविध सुंदर वेश्या, दारू तसेच आपल्या साठी हत्यारे इत्यादींवर खर्च करतो. विचर लोकांचे केस आणि डोळ्याचे रंग हे इतर माणसा प्रमाणे असत नाहीत म्हणून सामान्य माणूस त्यांना घाबरतात. अनेक राज्यांत जादू करण्यावर बंदी असते इथे त्यांना विचर लोक आवडत नाहीत. एल्फ लोकांना सुद्धा विचर आवडत नाहीत. त्यामुळे नाईलाज म्हणून विचर ला लोक काम देत असले तरी त्यांच्यावर प्रेम आणि आपुलकी कोणीही दाखवत नाही.

विचर गेराल्ट चे दोन मित्र आहेत. एक आणि मानव कवी दांडेलीन. दांडेलीन हा सुंदर आवाजाचा शीघ्र कवी आहे. तो आपल्या बोलण्याने कुणालाही भुरळ पडतो आणि कुठलीही ललना त्याला सहज वश होते. दांडेलीन गेराल्ट च्या अनेक साहसावर कथा कविता लिहितो. त्यामुळे गेराल्ट सर्व दुनियेत प्रसिद्ध झाला आहे. गेराल्ट चा बुटका मित्र आहे झोलतान. हा प्रचंड शक्तिशाली बुटका आहे आणि अनेक वेळा विविध साहसांत गेराल्ट ला मदत करतो.

गेराल्ट चे आयुष्य बदलणारी एक घटना घटते. सिरी हि लहान मुलगी गेराल्ट च्या आयुष्यांत येते आणि भावना नसलेल्या ह्या विचर ला तिच्यावर एका पित्याप्रमाणे प्रेम जडते. सिरी एक राजकन्या असते पण गेराल्टच्या सानिध्यांत येऊन ती सुद्धा एक पहिली स्त्री विचर बनते. ह्या दोन्ही विचर च्या आयुष्यांत अनेक संकटे येतात आणि आपल्या परीने दोन्ही त्यांचा सामना करतात. सिरी च्या जन्माचे रहस्य, तिचा गेराल्ट शी असलेला संबंध आणि येनेफर नावाची सुंदर सोसरेस ह्याच्या बद्धल अनेक उलगडे ह्या कथेत येतात.

अर्थात सर्वच कथा सांगून रसभंग करण्याचा माझा इरादा नाही. पण मूळ कथानका बरोबर ह्या कथेंत अनेक छोट्या कथा सुद्धा आहेत. गेराल्ट एखाद्या डिटेक्टिव्ह प्रमाणे विविध अतींद्रिय शक्तींची रहस्ये शोधून काढतो. कधी कधी तो निर्दय पणे त्यांचा संहार करतो तर कधी कधी तो दया सुद्धा दाखवतो. कधी कधी शक्ती इतक्या शक्तिशाली असतात कि त्याला हार पत्करावी लागते. तर कधी कधी कुठल्याही राक्षसापेक्षा अधिक क्रूरता दाखवणार्या मानवाशी सुद्धा त्याला लढावे लागते.

गेराल्ट ऑफ रिव्हिया ची साहसे कदाचित मराठीत अजून उपलब्ध झाली नाहीत परंतु ह्या पुस्तकांची तुफान लोकप्रियता लक्षांत घेता लवकरच ती मराठी सुद्धा उपलब्ध होतील ह्यांत मला शंका नाही.

पोलिश भाषेतील ह्या कथेने सर्व जगावर आपले गारुड केले आहे. हि एक अतिशय स्तुत्य गोष्ट आहे. जगांतील सुमारे ५ कोटी लोक पोलिश भाषा बोलतात. त्याच्या तुलनेत सुमारे ९ कोटी लोक मराठी भाषा बोलतात. मराठी भाषेतून सुद्धा असे दर्जेदार साहित्य निर्माण व्हावे आणि संपूर्ण जगात ते प्रसिद्ध व्हावे अशी आशा करण्यास हरकत नाही.

# टोलकेन आणि मिडल अर्थ, लॉर्ड ऑफ द रिंग्स , हॉबिट इत्यादी – अक्षर प्रभु देसाई

*(कल्पनारम्य कथांची माहिती देणाऱ्या लेखमालिकेतील हा दुसरा भाग)*

आजच्या लेखांत आपण जगांतील कदाचित सर्वांत प्रसिद्ध अश्या रम्यकथेची ओळख करून घेणार आहोत. JRR टोलकेन हे एक इंग्रज कवी, लेखक तसेच भाषाशास्त्राचे प्राध्यापक आणि संशोधक होते. त्यांचा जन्म १८९२ मध्ये झाला. आमच्या हिंदू पुराणांत एक कथा आहे कि विश्वामित्र ऋषींनी आपल्या तपोसामर्थ्यावर एक प्रतिसृष्टी रचली. त्याच प्रमाणे टोलकेन ह्यांनी सुद्धा एका प्रतिसृष्टीचे निर्माण केले. लॉर्ड ऑफ द रिंग्स हे चित्रपट कुणाला ठाऊक नाहीत ? ह्या चित्रपटांनी तुफान गर्दी तर खेचलीच पण मोठ्या पडद्यावर रम्यकथा कश्या भव्यपणे दाखवल्या जाऊ शकतात ह्याच्या कक्षा रुंदावल्या.

पण चित्रपटांच्या आधी सुद्धा टोलकेन ह्यांची पुस्तके अफाट लोकप्रिय होती. टोलकेन ह्यांच्या नंतर कित्येक सुंदर रम्यकथा निर्माण झाल्या. मार्टिन ह्यांचे गेम ऑफ थ्रोन्स (सोंग ऑफ आईस अँड फायर) , रोवलिंग ह्यांचे हॅरी पोट्टर, जेम्स रिगनी ह्यांचे व्हील ऑफ टाईम इत्यादी पण आज सुद्धा रम्यकथानचा विषय येतो तेंव्हा टोलकेन ह्यांचे स्थान सर्वांत वरचे आहे.

टोलकेन ह्यांच्या कथेबद्दल बोलायच्या आधी लेखक म्हणून त्यांची ओळख करून घेणे अत्यंत गरजेचे आहे. इतर लेखकाप्रमाणे टोलकेन ह्यांनी कादंबरी लिहायला घेतली नाही तर त्यांनी एक काल्पनिक विश्वच निर्माण केले. ह्या काल्पनिक विश्वाला एक अत्यंत संपन्न असा हजारो वर्षांचा इतिहास आहे, अनेक प्रकारच्या प्रजाती आहेतच पण त्या सर्वांच्या आपल्या भाषा आहेत आणि त्या भाषेतील साहित्य सुद्धा आहे. प्रत्यक्ष विश्वप्रमाणे भाषांच्या अनेक बोली आहेत आणि ह्या भाषा सुद्धा इतिहासाप्रमाणे बदलत गेल्या आहेत. प्रत्येक शहराला आपला एक इतिहास आहे, आपले एक मिथक आहे.

अश्या ह्या प्रचंड विश्वाला टोलकेन ह्यांनी मिडल अर्थ असे नाव दिले. मराठीत आपण त्याला मध्य धरा असे म्हणू. ४० वर्षे त्यांनी ह्यावर काम केले. लक्षांत घ्या कि हा काळांत संगणक नव्हता, इंटरनेट नव्हता त्यामुळे सर्व काम त्यांना स्वतःला करावे लागत होते. एखाद्या लिखाणात बदल करायचा तर सर्व पान पुन्हा टंकलिखित करावे लागत असे. त्याच वेळी टोलकेन ह्यांनी एलविष हि भाषा सुद्धा निर्माण केली. ह्या भाषेला स्वतःचा इतिहास होता त्याच वेळी अतिशय प्रगल्भ असे साहित्य सुद्धा त्या भाषेंत टोलकेन ह्यांनी निर्माण केले आणि ह्या भाषेतून कविता सुद्धा लिहिल्या. ह्या त्यांच्या प्रतिभेने त्या काळाचे सर्वच लेखक स्तंभित झाले होते. आज काल संगणकाच्या

मदतीने नवीन भाषा सहज निर्माण केल्या जाऊ शकतात पण अश्या भाषांतून कविता वगैरे लिहिणे आजकालच्या लेखकांना सुद्धा जड जाते.

१९१६ मध्ये ब्रिटन ने पहिल्या महायुद्धांत भाग घेतला. टोलकेन हे त्यावेळी कॉलेज मध्ये शिकत होते. त्यांनी युद्धांत भाग घेतला नाही आणि आपण कॉलेज मध्ये आहोत हि सबब दाखवून त्यांनी आर्मी मध्ये जाण्यापासून सरकारकडून सूट मिळवली. त्यांचा ह्या निर्णयाने त्यांच्या नातेवाईकांनी त्यांची बरीच टर उडवली. १९४१ आपल्या मुलाला टोलकेन ह्यांनी एक पत्र लिहिले त्यांत ते लिहितात कि त्या काळी बंदूक घेऊन हिंसा करण्याला लोक जास्त महत्व देत होते आणि कल्पनाशक्ती आणि लेखन प्रतिभेची किंमत त्या समाजाच्या नजरेत शून्य होती.

पण शेवटी टोलकेन ह्यांना आर्मी मध्ये जावेच लागले. आपल्या प्रिय पत्नीपासून दूर जाणे त्यांच्या साठी असह्य होतेच पण त्याच वेळी आपल्या मित्रांना युद्धांत मरताना पाहून त्यांचे कवी हृदय अत्यंत पीडित होत होते. त्या निरर्थक हिंसेनेच कदाचित त्यांना मिडल अर्थ निर्माण करण्याचे सुचले असावे पण टोलकेन ह्यांनी स्वतः ते कधीच मान्य केले नाही.

१९१९ मध्ये त्यांना आर्मीतून निवृत्त करण्यात आले. त्यांनी अनेक चकमकीत भाग घेतला होता आणि काही चकमकींत तर त्यांची संपूर्ण बटालियन खलास झाली होती. टोलकेन सुद्धा ह्या युद्धांत खात्रीशीर पणे मारले गेले असते पण त्यांची तब्येत बिघडल्याने त्यांना माघारी पाठवले गेले. आर्मीतील त्यांच्या अनुभवाबद्दल टोलकेन एक भावना विशेष करून व्यक्त करतात. आर्मीत भेदभाव नसतो, गरीब लोक आणि श्रीमंत लोक एकत्र एकाच तंबूत झोपतात आणि एकाच ध्वजाखाली लढतात, ह्यातून त्यांना अनेक नवीन अनुभव प्राप्त झाले.

टोलकेन ह्यांनी १९१४ मध्ये सिल्मारिलिओन ह्या त्यांच्या पुस्तकावर काम करायला सुरुवात केली. हे पुस्तक त्यांनी कधीच पूर्ण केले नाही, ४० वर्षानंतर त्यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मुलाने ते पूर्ण करून प्रकाशित केले.

सिल्मारिलिओन ह्या पुस्तकांत टोलकेन ह्यांनी इआ ह्या विश्वाची निर्मिती केली. इआ विश्वांत मिडल अर्थ हा पृथ्वी प्रमाणे एक लोक आहे त्याच प्रमाणे नुमिनॉर , वालिनॉर, बेलेरीण्ड हे लोक सुद्धा ह्या विश्वांत आहेत. इलुवतार नावाची एक शक्ती ह्या विश्वांतील सर्वांत मोठी दैवी शक्ती आहे. ह्या शक्तीने (ब्रम्हदेवाप्रमाणे) ऐनूर ह्या देवांची निर्मिती केली. ऐनूर मधील मेलकोर हा सर्वांत शक्तिशाली देव होता. ह्या देवाने इतर देवा पासून फारकत घेतली आणि इलुवतार विरुद्ध बंड पुकारले. इलुवतार प्रचंड शक्तिशाली असल्याने त्याला काहीही फरक पडला नाही. इलुवतार ने शेवटी आरडा नावाचा लोक निर्माण केला आणि सर्व येनूर ना ह्या विश्वांत जाण्याची संधी दिली.

येनूर देवांनी आरडा विश्वांत प्रवेश केला. ह्या देवांतील काही देव जे जास्त शक्तिशाली होते त्यांना वालार असे नाव पडले तर जे कमी शक्तिशाली देव होते त्यांना मायार असे नाव पडले. त्यांनी नवीन विश्वांत रचना करायला प्रारंभ केला पण वारंवार मेलकोर ह्या दुष्ट देवाने त्या रचनेचा संहार सुद्धा केला. शेवटी वालार नी वालिनॉर मध्ये जम बसवला आणि मेलकोर ला मिडल अर्थ मध्ये सोडून दिले. काही हजार वर्षांनी त्यांनी ताऱ्यांची निर्मिती केली आणि त्यामुळे एल्फ ह्या प्रजातीचा जन्म झाला. लॉर्ड ऑफ थे रिंग्स मध्ये दाखविल्या प्रमाणे एल्फ हे सुंदर, सोनेरी केसांचे अमर असे लोक आहेत. (एल्फ हि प्रजाती मूळ जर्मन संस्कृतीतील आहे. एल्फ ना संस्कृत भाषेंत ह्रीभू असे म्हणतात. ). एल्फ शक्तिशाली होते तसेच विद्वान आणि फार चांगले कलाकार होते. वालार नी शेवटी मेलकोर ला पकडून कैदेत टाकले नि सिमिलीरॉन नावाच्या तीन अत्यंत सुंदर अश्या ३ मोत्यांची निर्मिती केली. त्यामुळे सर्व जगाला प्रकाश मिळाला. मेलकोर ने सुद्धा माफी मागितली आणि त्याला वालार नि माफ केले. पण शेवटी तो उलटलाच. त्यांनी तिन्ही मोत्यांची चोरी केली आणि तो पळून गेला.

ह्यामुळे जगाला प्रकाश देण्यासाठी वालार देवांनी सूर्य आणि चंद्र निर्माण केला. आणि ह्याचा परिणाम म्हणून मानवांची निर्मिती झाली. ह्या विश्वाची तीन युगे आहेत. पहिल्या युगांत मेलकोर आणि वालार ह्यांची वरील कथा आहे.

दुसर्या युगांत मेलकोर चा शक्तिशाली नोकर सौरऊन ची कथा आहे. सौरऊन हा लॉर्ड ऑफ द रिंग्स मधील खलनायक. हा आपल्या कपटनीतीने मानवांना वालार देवांच्या विरुद्ध भडकावतो आणि त्यांच्यात युद्ध घडवून आणतो. देवांना ह्याचा इतका धक्का बसतो कि ते इलुवतार कडून मदतीची याचना करतात. इलुवतार त्यांचे ऐकून प्रचंड मोठा प्रलय घडवून आणतो ह्या प्रलयात सौरॉन ची सेने नष्ट होते आणि सौरॉन सुद्धा नष्ट होतो. पण एक मायर देव असल्याने तो निराकार रूपांत विश्वांत संचार करतो.

वालार देवांचे काही भक्त ह्या प्रलयात वाचतात ते गोंडोर ह्या मानवी साम्राज्याची स्थापना करतात. अर्थात हे सर्व थोडक्यांत झाले. प्रत्यक्ष कथेंत डझन वारी शहरे, खंड, युद्धे इत्यादी आहेत. सर्व राजांची संपूर्ण वंशावळी आहे, प्रेमकथा आहेत, ड्रॅगन्स आहेत, भुते, थरारकथा तसेच विस्मित करणाऱ्या गोष्टी आहेत. मी त्या सर्व इथे सांगू शकत नाही.

अश्या प्रकारे दुसर्या युगाचा अंत होतो.

तिसऱ्या युगांत लॉर्ड ऑफ थे रिंग्स आणि हॉबिट ची कथा घडते. लॉर्ड ऑफ द रिंग्स हे चित्रपट पाहण्यासारखे आहेत आणि त्यांची कथा इथे सांगून मी वाचकांचा रसभंग करणार नाही पण कथेची पार्शवभूमी इथे सांगितल्याने हे चित्रपट तुम्हाला जास्त आवडतील. ह्या चित्रपटांतील खलनाकाय सौरॉन आहे तरीसुद्धा आकार स्वरूपांत तो कुठेही दिसत नाही ह्याचे कारण तुम्हाला समजेल. सौरॉन खलनायक असला तरी सर्वांत

मोठा खलनायक नाही. रिंग मिळवण्याचा त्याचा मूळ उद्धेश हा आहे कि तो पाताळ लोकांतील आपला स्वामी मेलकोर ला सोडवू शकेल. मेलकोर ला कथेंत मोरगॉथ असे सुद्धा संबोधित केले आहे.

कथेंतील गंडाल्फ हा एक मायार म्हणजे कनिष्ठ देवता आहे. सरुमन हा सुद्धा एक मायार आहे. कथेच्या शेवटी गंडाल्फ, एल्फ आणि ४ हॉबीट्स हे वालार देवतांच्या शहरांत जातात.

इथे लक्षात घेतले पाहिजे कि इतकी प्रचंड कथा लिहून सुद्धा अनेक गोष्टी टोलकेन ह्यांनी गूढ ठेवल्या आहेत. इलुवतार हिंदू धर्मातील ब्रह्म प्रमाणे एक प्रचंड अज्ञात शक्ती आहे. त्यांच्या शक्तीला सीमा नाही. आरडा हे एक विश्व आहे ज्यांत ह्या सर्व गोष्टी घडतात. त्याशिवाय इतर विश्वे सुद्धा इलुवतार ह्यांनी निर्माण केली असू शकतात. आरडा विश्वांत सुद्धा मिडल अर्थ मध्ये अनेक गूढ गोष्टी आहेत ज्यांची माहिती खुद्द गंडाल्फ सारख्या महाविद्वान मायार देवतेला नाही.

लॉर्ड ऑफ द रिंग्ज मध्ये टॉम बोंबडील नावाचे एक गूढ पात्र आहे. कुठेतरी जंगलात खोलवर हा विचित्र माणूस राहतो. फ्रोडो आणि इतर हॉबिट्स ची तो मदत करतो. एल्फ राजा एलरोड च्या मते त्याच्या पूर्वजांनी सुद्धा टॉम ला एक पुरातन व्यक्तिमत्व म्हणून पहिले आहे. गंडाल्फ च्या मते टॉम मिडल अर्थ मधील सर्वांत जुनी व्यक्ती आहे. टॉम खुद्द स्वतःला सर्वांत जुनी व्यक्ती मानतो. एल्फ च्या निर्माणा आधी सुद्धा तो तिथे म्हणे होता. विक्षिप्त असला तरी त्याचे ज्ञान आणि शक्ती अफाट असते. फ्रोडो चे रिंग त्याच्या हातांत असले तरी रिंग चा काहीही परिणाम त्यावर होत नाही. गंडाल्फ च्या मते रिंग टॉम सुरक्षित पाने ठेवू शकतो पण त्याच्या विक्षिप्त पणा मुळे तो रिंग आठवणीने व्यवस्थित ठेवीलच ह्याची शाश्वती नाही. म्हणून शेवटी रिंग मॉरडोर मध्ये फेकून नष्ट करण्याचा निर्णय होतो.

टोलकेन ह्यांनी ज्या विश्वाची निर्मिती केली ते मानवी प्रतिभेचे आणि कल्पना शक्तीचे जबरदस्त उदाहरण आहे. ह्या विश्वाची कथा टोलकेन ह्यांनी सुमारे ८ विविध पुस्तके आणि शेकडो कवितेंचा माध्यमातून लोकांच्या पुढे ठेवली. काही कविता तर चक्क एलविष भाषेंत लिहिल्या गेल्या आहेत. टोलकेन हे आमच्या आधुनिक काळातील विश्वामित्राच आहेत असे आम्ही म्हणू शकतो.

# || प्रवासवर्णन ||

## हम्पी: एका साम्राज्याची अखेर – अजित मुठे

अंतर्गत उर्मीच्या हाका प्रत्येकाला येत असतात, मात्र त्याला कसा प्रतिसाद दयायचा हे प्रत्येकाला जमतेच असे नाही. शासकीय सेवेत असतांना कोणतीही आवड किंवा छंद " रजा नाही " या सबबीखाली टाळले जातात.

मात्र मी शासकीय सेवेत वर्ग- १ पदावर कार्यरत असुनही माझ्या अंतर्गत उर्मीला सकारात्मक प्रतिसाद देवुन माझा पर्यटनाचा विशेषतः बुलेटवर भारत भ्रमण करण्याचा छंद जोपासला आहे.

अलिबाग झाले, गोवा झाले, लडाख झाले, भुतान झाले आता विजयनगर साम्राज्याची राजधानी " हम्पी "येथे बुलेटवर जायचे असे ठरविले होते मात्र तो योग येत नव्हता. अखेर दहावीच्या गृपमधील नितिन(बंडया) तयार झाला आणि हम्पीला जाण्याची तयारी सुरु झाली. हा बंडया जयहिंद कॉलेज, धुळे येथे प्राध्यापक आहे. दहावीत असतांना तो, मी व राजुशिंदे " खो-खो " च्या टिममध्ये होतो व आम्ही सात मिनीटे खिंड लढवायचो.

यापूर्वी बुलेटवर ब-याच ठिकाणी गेलेली असल्याने मला ते नविन नव्हते. मात्र बंडया प्रथमच इतक्या दुर म्हणजे येवून जावून 1800 कि. मी. प्रवास करणार होता. संदीप व धनु यांनाही सोबत घ्यायचा विचार होता मात्र त्यांनी नकार दिला. संदीपने सांगितले कि. मी. सध्या बाहेरचे काहीच खात नाही. हि शोएब अख्तरचा फेकाड बॉलींग आहे आमच्या तेव्हाच लक्षातआले होते. कारण "कधीतरी घरीही जेवत जा" ! असे वहिनी त्याला सतत म्हणतात हे सर्वांना माहित होते. धन्याचा तर प्रश्नच नव्हता, कारण त्याने
फक्त संग्रहालयात ठेवण्यासाठीच घेतलेली आहे. त्याचप्रमाणे दहावीच्या मित्रांचेही तेच म्हणणे पडले की, जर तुम्ही यांना नेले तर तुम्ही जास्तीत जास्त सिन्नर पर्यंत पोहचू शकाल. मग त्यांना रद्दच केले.

अखेर हम्पीला जाण्याचा दिवस उजाडला. हम्पीच का? तर याआपल्या देशाला प्राचीन परंपरेचा वारसा लाभलेला आहे. विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे आणि शाळेत " पुढच्यास टप्पल व मागच्यास चप्पल " मारत-मारत देशाचा जबाबदार नागरिक होण्याच्या दृष्टीने घोकलेली प्रतिज्ञा मला या प्रवासादरम्यान आठवू लागलो.ऑफीसला असलेल्या दोन दिवसांच्या सुट्टीला जोडून तीन दिवसांची रजा घेतली. सकाळी हम्पीला जाण्यासाठी निघालो, नगर, करमाळा, टेंभुर्णीमार्गे सोलापूरला पोहचलो, आज जवळ-जवळ ४२५ ते ४५० किलोमीटर प्रवास झालेला होता.

सकाळी सोलापूर-विजापूर रस्त्याने प्रवास सुरु केला. विजापूरला " गोल घुमट " बघितला. विजापूर हे आदिलशाहीच्या काळातील राजधानीचे ठिकाण होते. या आदिलशहाला छत्रपती शिवाजी महाराजांनी "सळो कि पळो" करुन सोडले होते. अफझलखान याच विजापूर दरबाराचा सरदार, ज्याचा महाराजांनी वध केला.

विजापूरहून निघालो. रस्त्यात “अलमटटी धरण” बघितले. तिथे एकजण भेटले ते म्हणाले की, तुम्ही “कुडाळ-संगम” हे ठिकाणही बघा.

“कुडाळ-संगम” हे मलप्रभा नदीच्या काठावर असुन तेथे महात्मा बसवेश्वर यांची समाधी आहे. यासाठी बरेच खाली उतरुन जावे लागते. समाधीचे दर्शन घेतले आणि आता हम्पीकडे प्रवास सुरु झाला. आता बंडयाने बुलेट चालवायला घेतली होती. रस्त्याने एका ठिकाणी चहा प्यायला थांबलो, तिथे एक आयशर ट्रक चालविणारा भेटला. साळुंके हे पुण्याचे होते व विजमंडळातून सेवा निवृत्त झाले होते. त्यांच्याशी गप्पा मारल्या, त्यांना विचारले तुम्ही या वयात ट्रक चालवता तेही क्लिनर न घेता ते म्हणाले साहेब मला सवय झाली आहे. आणि घरी बायको-मुलांकडे पैशासाठी हात पसरण्यापेक्षा मी स्वत:च कमवितो हे महाराष्ट्रातल्या तरुण मुलांनी शिकले पाहिजे.

हॉस्पेटला पोहचलो आणि हॉटेलवाल्याला फोन लावला. त्यांनी सांगितले हॉटेल हॉस्पेटमध्ये नसुन तिथुन पुढे ३५ कि.मी. अंतरावर “तोरंगल” या ठिकाणी आहे. “गो-आयबी” या साईटवरुन बुकिंग केल्याचे दुष्परिणाम. हॉटेलला जायला निघालो तेवढयात एक मुलगा “करिज्मा” बाईकवरुन आला. त्याने आम्ही बाईकर असल्याचे ओळखले व म्हणाला जर तुम्ही गावातुन जाल तर तुम्हाला उशिर लागेल मी तुम्हाला हायवेपर्यंत सोडतो मग तुम्ही जा. आणि दुस-या राज्यातही माणुसकी अनुभवास आली. रात्री दहा वाजता हॉटेलवर पोहचलो. हॉटेलचे किचन बंद झालेले. मग काय बंडयाने हॉटेलच्या वेटरला सोबत घेतले आणि जेवण घेवून आला. आता उदया सकाळी हम्पीला जायचे.

सकाळी हम्पीला जायला निघालो. हम्पी ही विजयनगर साम्राज्याची राजधानी ! विजयनगर साम्राज्याची स्थापना १३३६ मध्ये हरिहर आाणि बुक्क या दोन भावांनी स्वामी विदयारण यांच्या मार्गदर्शना खाली केली. हॉस्पेट रस्त्याला जाताना उजव्या हाताला हॅम्पीला जाणारा रस्ता आहे. त्याकरिता हॉस्पेटला जायची आवश्यकता नाही. हम्पीला यायला एकरस्ता गंगानगरहुनही आहे. रस्त्यालाच “विजयनगर साम्राज्य की राजधानी मे आपका स्वागत है, कमलापूर” असा बोर्ड आहे. आता कमलापूर हे त्या काळातील छोट्याश्या खेड्याने गावाचे रुप धारण केले आहे.

प्राचिन हम्पीत अजुनही बरीचशी स्थळे अस्तित्वात अस्तित्वातआहेत. यात महत्वाची म्हणजे “विजय विठ्ठल मंदीर”, लोटस महाल, हत्ती शाळा, राणी महाल, हजार राम मंदीर, उगृ नरसिंह मंदीर, विरुपाक्ष मंदीर, हेमकुट्टा हिल, अंजनेय हनुमान मंदीर हे टेकडीवर असलेले मंदीर ही प्रसिध्द ठिकाणे आहे.

यातील “विजय विठ्ठल मंदीरात” खांबातुन सप्त सुरांचे आवाज येतात. २००८पर्यंत या मंदीरात सर्वांना जायला प्रवेश होता. मात्र आपल्या भारतीयांची प्रवृत्ती अशी कि, त्या खांबाचे हेरीटेज महत्व लक्षात न घेता त्याच्यावर मिळेल त्या वस्तूने मारायचे, नुकतेच बंगलोरच्या काही मुर्ख मुलांनी हम्पी येथील खांब पाडले आणि त्याचे व्हिडीओ अपलोड केले.

या विजय विठ्ठल मंदीरात प्राचीन दगडी रथ आहे. आपल्या लोकांनी त्याची ही चाके फिरवून-फिरवून खराब केली म्हणुन सिमेंटमध्ये आता पक्की केली आहेत.

आणि असेच लोक आपल्या देशात कशी शिस्त नाही? यावर भाषणे देतात.

“विजय विठ्ठल मंदिरातून” परत येतांना अनवाणी सहलीला आलेली लहान मुले भेटली. त्यांना बंडयाने सांगितले “माझ्या बरोबर पळा, कोण पुढे पळते? आणि त्यांनी रेस लावली. बंडया हा रनर आहे हे त्या मुलांना काय माहित!

त्यानंतर आम्ही त्या लहान मुलांना अननस/टरबूज खावू घातले. तेव्हा त्यांना झालेल्या आनंदाची तुलना कशाशीही करता येणार नाही.

हम्पी येथील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथे असलेल्या सर्व हत्तींच्या पुतळयांच्या सोंडा त्या काळातील मुस्लीम आक्रमकांनी तोडलेल्या आहेत. कारण काय तर मुस्लीम आक्रमकांना वाटायचे कि, या सोंडेत हिरे-मोती-सोने भरलेले आहे.

विजयनगर साम्राज्य हे भारतातील शक्तीमान राज्य होते. ते जवळ-जवळ संपुर्ण दक्षिण भारतात पसरलेले होते. या साम्राज्याचा सर्वात शक्तीशाली राजा कृष्णदेवराय होता, तो तुलव वंशातील होता. त्याच्या दरबारात तेनालीराम हा पंडित होता. या साम्राज्याची राजधानी हम्पी होती. हे अतिशय संपन्न शहर होते. या ठिकाणी उघड्यावर हिरे-मोती-सोने-चांदी याची खरेदी-विक्री होत असे. या ठिकाणी त्या काळातील दुमजली शॉपींग सेंटर होते, ज्याचे अवशेष आजही दिसून येतात.

विजयनगर साम्राज्याचा नाश मुस्लीम आक्रमणांमुळे झाला. बहामनी साम्राज्याचे तुकडे होवून त्यातुन पाच शाहया निर्माण झाल्यात. या शाहया आपापसातील लढायांसाठी विजयनगर साम्राज्याची मदत घेत असत. या शाहया मधील काही शाहयांच्या डोळयात विजयनगर साम्राज्य, त्याची सुबत्ता भरली. कृष्णदेवराया नंतर कोणीही कर्तबगार राजा या राज्यात झाला नाही त्याच्या नंतर या मुस्लीम सत्तांनी विजयनगरवर हल्ला केला. त्यात विजयनगर साम्राज्याचा पाडाव झाला. मुस्लीम सैन्य राजधानी हम्पीत घुसले व शहराचा विध्वंस केला.

हम्पी दर्शनानंतर आता पटटकल, ऐहोळ व बदामी तथा वातापी बघायचे ठरले. ऐहोळ, पट्टकल, बदामी येथे चालुक्य घराणे पाचव्या शतकापासून राज्य करीत होते. याच चालुक्य घराण्यातील पुलकेशी दुस-याने “सम्राट हर्षवर्धनाचा“ पराभव केला होता. या ठिकाणी सुध्दा कला व वास्तु शास्त्राचा नमुना असलेली मंदिरे व राजवाडे आहेत. ही तिन्हीही ठिकाणे त्या-त्या काळात राजधानीचे शहरे होती. ऐहोळ येथील दुर्गा देवी मंदीर, पटटकल येथील मंदिरे तर बदामी येथील गुंफा बघण्यासारख्या आहेत. याठिकाणी चालुक्य घराण्याचे राज्य होते. यातील ऐहोळ येथे चौथ्या शतकात, बदामी येथे पाचव्या शतकात तर पट्टकल येथे सातव्या व आठव्या शतकात चालुक्य घराण्याचे राज्य होते हे सर्व बघुन सोलापूरकडे निघालो. रात्री सोलापूरला पोहचलो.

सकाळी नाश्ता करुन सोलापूरलाहुन साडेनऊ वाजता निघालो. रस्त्यात अनगर असा बोर्ड दिसला म्हणुन ते अहमदनगरला जाण्याचा शॉर्टकट समजून गाडी घातली तर ते अनगर नावाचे गाव होते. तिथून कुर्डुवाडीला पोह्चलो. कुर्डुवाडीचे वैशिष्ट्य म्हणजे सकाळी पावणे अकरा वाजता तेथे रोज राष्ट्रगीत लाऊडस्पिकरवर लावले जाते, अशावेळी जो जिथे असेल तिथे उभा राहतो. हे बघुन थिएटरमध्ये राष्ट्रगीत लावले असतांना स्वत:ला हाय सोसायटीतील समजुन उभे न राहणारे व नंतर त्यांना इतरांनी केलेली मारहाण ही योग्यच होती असे वाटते. आता माढा, करमाळामार्गे नाशिककडे प्रवास सुरु केला. वाटेत माढा-करमाळा रस्त्यावर हॉटेलवर स्पेशल मेनू म्हणुन "बाजार आमटी" असा पदार्थ लिहीला होता. त्याचे कुतुहल वाटुन चौकशी केली तर अनेक डाळी एकत्र करुन बनविलेला आमटीचा प्रकार होता.

आता नगरमार्गे नाशिक कडे निघालो व संध्याकाळी सात वाजता नाशिकला पोह्चलो. म्हणजे फक्त दहा तासात आम्ही जवळ-जवळ ४२५ कि.मि. अंतर पार केले होते. अशा रितीने आमची बाईक टुर पुर्ण झाली. आता पुन्हा टुर कधी याचे प्लॅनिंग सुरु केले.

# गाथा गुलशनाबादची - मैत्रेयी पंडित

समुद्र मंथनातून जेव्हा अमृतकुंभ बाहेर आला तेव्हा देवांना प्रश्न पडला की, जर दानवांनी या अमृताचे प्राशन केले तर ते अमर होतील आणि अखिल विश्वाला सळो कि पळो करून सोडतील. तेव्हा हे टाळण्यासाठी देवांनी इंद्रपुत्र जयंत याला अमृतकुंभ घेऊन आकाशमार्गे पळून जाण्यास सांगितले. पण दानवांनी मात्र हा अमृतकुंभ मिळवण्यासाठी घनघोर युद्ध केल. या युद्धकाळात अमृतकुंभातील काही थेंब पृथ्वीवर सांडले. या सांडलेल्या अमृत थेंबानी पावन झालेली एक जागा म्हणजे; अमृतवाहिनी गोदावरीच्या तीरावर वसलेली टुमदार 'नाशिकनगरी'!

सत्ययुगात प्रभू श्रीरामचंद्रांच्या वास्तव्याने पुनीत झालेली 'पंचवटी' अन् द्वापारयुगात 'जनस्थान' म्हणून नामाभिधान लाभलेली पुण्यभूमी! साधारणतः ख्रिस्तपूर्व दिडशे वर्षांचा काळ असावा तो, जेव्हा भरतभूमीवरील सगळ्यात मोठी बाजारपेठ येथे उदयास आली होती. पुढे सातवाहन काळात इथले रेशीम युरोपीय देशांत प्रसिद्ध झाले आणि 'जनस्थान' या नावाचे खरेच सार्थक झाले. सुंदर अशी 'त्रिकंटक' नामक बौद्ध लेण्यांची या भूमीवर निर्मिती झाली ती याच सातवाहन काळात! 'त्रिकंटक'लेणी म्हणजे आजच्या काळातल्या 'पांडवलेणी' ! या पुण्यनगरीस फार मोठी अध्यात्मिक, तसेच कला-अविष्कारांची परिपूर्ण अशी परंपरा लाभली आहे. लक्ष्मणाने शूर्पणखेची नासिका कापली म्हणून पंचावातीचे पुढे 'नासिक' हे नाव उदयास आले अशी प्रसिद्ध आख्यायिका आहे. इथे असणारी फुलांची बाजारपेठ आजही प्रसिद्ध आहे. इ.स.१४८७ मध्ये मुघल साम्राज्याच्या अधिपत्याखाली याच फुलांच्या बाजारपेठेमुळे नासिकला 'गुलशनाबाद' म्हणजे फुलांचे शहर म्हटले जाऊ लागले. पुढे इ.स.१७०७ मध्ये मराठ्यांनी ही जागा काबीज केली आणि ती 'नाशिक' झाली.

इ.स.१७३८ साली रामकुंड परिसरात प्रसिद्ध कपालेश्वर मंदिराची बांधणी झाली. या मंदिराचे खास वैशिष्ट्य म्हणजे देशातील हे असे एकमेव शिवमंदिर आहे जेथे महादेवासमोर नंदी नाही. यामागे अनेक आख्यायिका आहेत. महादेवांना पापक्षालनासाठी रामकुंडात स्नान करण्याचा सल्ला नंदीने दिला होता. त्या अर्थाने नंदी महादेवाचा गुरु झाला आणि त्याच्या सन्मानार्थ नंदीची सेवा याठिकाणी महादेवांनी घेतली नाही. रामकुंड अध्यात्मिक दृष्ट्या अत्यंत महत्वपूर्ण परिसर आहे. उगमापासून पूर्व दिशेला वाहत येणारी गोदावरी या स्थळावर दक्षिणमुखी होते. यामुळे ती दक्षिण गंगा नावानेदेखील ओळखली जाते. देशातल्या प्रमुख नद्यांपैकी ती एक आहे. रामकुंड परिसरातील तिच्या अस्तित्वाला विशेष महत्व आहे, याचे कारण तिच्यात असणारी अस्थिविघटनाची शक्ती ! अस्थि विसर्जित करण्यासाठी अनेक वर्षांपासून आजतागायत लाखो लोक येऊन गेले असतील. मात्र गोदामाई रामकुंडात अस्थि विरघळून टाकण्याची किमया कशी करते हे रहस्य उलगडू शकलेले नाही आणि कधी अस्थिअवशेषही सापडलेले नाहीत !

याशिवाय सिंहस्थ कुंभमेळयाच्या काळात मोक्षप्राप्तीसाठी रामकुंडात शाहीस्नान करण्याच्या उद्देशाने दर बारा वर्षांनी लाखो लोक येऊन जातात.

याच परिसरात सुंदर नारायण मंदिर, दहीपूल, रामसेतू काळाराम मंदिर, सीतागुंफा, दुतोंड्या मारुती अशी प्रेक्षणीय आणि पौराणिक स्थाने आहेत. केवळ सिंहस्थ काळात उघडण्यात येणारे गंगा-गोदावरी माता मंदिरही रामकुंडावर आहे. याशिवाय आज नाशिक महानगरपालिकेचे चिन्ह असलेली नारोशंकर राजे बहाद्दर यांनी बांधलेली नरो सहकाराची घनता आणि रामेश्वर मंदिरही याच आवारात आहे. दुतोंड्या मारुती आणि नाशिककर यांचे एक अनोखे नाते आहे. अगदी पूर्वीपासून पावसाळयात पाऊस योग्य पडला याची खात्री द्यायला प्रत्येक नागरिकास दुतोंड्याची हमी हवी असते. त्याने एकदा नखशिखान्त आपल्या अंगाखांद्यावरून गोदामाईच्या पुरास जाऊ दिले म्हणजे वर्षभर पाण्याची चिंता मिटली अशी त्यामागे भावना असते.

याशिवाय नाशिकला तपोभूमीचे सामर्थ्य आहे. नाशिकच्या भूमीवर कपिलमुनींनी सिंहस्थ कुंभमेळयाच्या परंपरेला कावनाई येथे सुरुवात केली. या जागेला आज कपिलधारा असेही म्हणतात. शेगावच्या गजानन महाराजांनीदेखील कावनाई येथे बारा वर्षे तपश्चर्या केली. प्रभू रामचंद्रांच्या निस्सीम भक्त हनुमानाची जन्मभूमी अनाजानेरीची तर सानार्थ रामदासांची तपोभूमी टाकली येथील ! जिथे जीवनाचे ध्येय प्राप्त होऊन ज्ञानप्राप्ती झाली त्या ब्रह्मगिरीच्या पायथ्याशी श्री. निवृत्तीनाथांनी संजीवन समाधी घेतली. ब्रह्मगिरीच्या जंगलामध्ये मिळणारे रुद्राक्षाना मोठ्या प्रमाणात मागणी असते. याच ब्रह्मगिरीच्या पायथ्याशी असणारे त्र्यंबकेश्वर म्हणजे तर महाराष्ट्राची कशी अन् नाशिकचा स्वर्ग ! बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक मंदिर त्र्यंबकेश्वरी आहे. याशिवाय शास्त्रांच्या ज्ञानार्जनासाठी येथे असणाऱ्या संस्कृत पाठशाला व वेदशाळांमध्ये देशभरातून विद्यार्थी येतात. गोदावरीचा उगम ब्रह्मगिरीवरच झाला आहे. त्यामुळे सिंहस्थ कुंभमेळयात त्र्यंबकेश्वरच्या भूमीत, ब्रह्मगिरीच्या सावलीत पवित्र कुशावर्तात केलेले शाही स्नान जणू मोक्षप्राप्तीचा मार्ग खुला करून देते अशी भावना आहे.

ही झाली नाशिकची पौराणिक आणि आध्यात्मिक पार्श्वभूमी ! याशिवाय नाशिकला किंबहुना संपूर्ण जिल्ह्याला वीरत्वाचाही वारसा लाभला आहे. इ.स.१८५७च्या स्वातंत्र्य समरातील प्रमुख नायक तात्या टोपे यांची जन्मभूमी नाशिक जिल्ह्यातील येवल्याची. तसेच इंग्रजसरकारला आपल्या कृतीने आणि वक्तव्यांनी देशातच नव्हे तर परदेशातही पाळता भुई थोडी करणाऱ्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील भगूरचा. देशभक्तीचे बीज तरुण मनांमध्ये रुजवून त्यासाठी 'अभिनव भारत' म्हणजे तत्कालीन 'मित्रमेळा'ची स्थापना इ.स.१८९९ साली झाली ती याच तपोभूमीत. स्वातंत्र्याच्या अग्निकुंडात जॅक्सनच्या वधासाठी स्वतःच्या प्राणांची अवघ्या अठराव्या वर्षी आहुती देणारे हुतात्मा अनंत कान्हेरे याच तपोभूमीवरचे एक स्वातंत्र्ययोगी होत. स्वातंत्र्य, समता, बंधुतेसाठी अविरतपणे ज्यांनी आयुष्य वेचले त्या युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाच्या प्रत्येक घटकाला मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून सत्याग्रह केला तो नाशिकच्या काळाराम मंदिरात. अनेक ज्ञात-अज्ञात सामिधांची आहुती नाशिकनगरीने स्वातंत्र्य यज्ञास अर्पण केली अन् स्वराज्यप्राप्तीच्या तपश्चर्येत आपले सामर्थ्य सिध्द केले.

नाशिक महाराष्ट्रातील तिसऱ्या क्रमांकाचा सगळयात मोठा जिल्हा ! इ.स.१८६९ साली जिल्हा म्हणून मान्यता पावलेले नाशिक यंदा दीडशेव्या वर्ष्हात पदार्पण करत आहे. अनेक चढ-उतार व बदल पहिले या गुलाबी थंडीच्या जिल्ह्याने या काळात! नाशिकच्या अनोख्या भौगोलिक स्थानामुळे त्याला प्रतीमहाराष्ट्र असेही म्हटले जाते. याचे कारण म्हणजे नाशिकच्या पेठ-सुरगाणा आणि इगतपुरी तालुक्यांची भौगोलिकता कोकणाची आठवण

करून देते. तर पश्चिम महाराष्ट्राची छबी निफाड, सिन्नर, दिंडोरी, बागलाण प्रतिबिंबित करतात. याशिवाय उरलेली विदर्भाची दाहकता येवला, नांदगाव, चांदवड तालुके भरून काढतात. पूर्वेस असणारे दख्खनचे पठार अन् पश्चिमेकडील सह्याद्रीच्या पर्वतरांगा नाशिकच्या साजि-या रुपाला गुलाबी थंडीची लाली चढवतात. सह्याद्रीच्या पर्वतरांगांमधील सर्वोच्च कळसुबाई शिखर म्हणजे जणू नाशिकच्या मनाचा मुकुट ! नाशिकचा इगतपुरी तालुका याच कालासुबीच्या कुशीत वसला आहे. जागतिक कीर्तीचे 'धम्मागिरी' हे आंतरराष्ट्रीय विपश्यना केंद्राचे मुख्य विश्वविद्यालय याच ठिकाणी स्थापन केलेले आहे. अनेक हिंदी-मराठी चित्रपटांचे चित्रीकरण इगतपुरीच्या पठारांवर होते. याच चित्रपट सृष्टीची भारतीयांना ज्यांनी प्रथमतः निर्मिती करून दाखवली ते चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके हे देखील नाशिकच्या त्र्यंबकनगरीचे सुपुत्र! आधुनिक भारताच्या प्रगतीत योगदान देणारे एक महत्वपूर्ण व्यक्ती होते दादासाहेब!

पुढे स्वातंत्र्योत्तर काळातही नाशिकने आपली घोडदौड थांबवली नाही. देशातील आर्थिक चलनवलनासाठी वापरत येणाऱ्या नोटांचा छापखाना नाशिक येथे आहे. याशिवाय शासकीय कागदपत्रे आणि स्टँपपेपरचा कारखाना येथेच आहे. 'हिंदुस्थान एरोनॉटीक्स लिमिटेड' या भारतीय बनावटीच्या लढाऊ विमानांचा निर्मिती कारखाना नाशिक्जावाल्च ओझर येथे आहे. तर देशाच्या सिमाराक्षानास्ठी लागणारा शस्त्रसाठा नाशिकच्या देवळाली कॅम्प परिसरातील आर्टीलरी सेंटर येथे आहे. महाराष्ट्राची प्रसिद्ध पैठणी निर्मिती नाशिक जिल्ह्यातील येवाल्यातच होते. दिवाळीत काढल्या जाणाऱ्या मोठ्या रांगोळया आणि संक्रांतीचा पतंगोत्सव हि येथील आणखी दोन आकर्षणे ! भारतातील पहिले मातीचे गंगापूर धरण नाशिकमध्ये असून संपूर्ण नाशिकला त्यातूनच पाणीपुरवठा होतो. याशिवाय वैतरणा येथे असणारे स्वयंचलीत जलविद्युत केंद्र देखील वैशिष्ट्यपूर्ण आहे. देशासोबतच जागतिक स्तरावर आपले स्थान निर्माण करण्यात नाशिक मागे राहिलेले नाही.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरावरील विपश्यना विश्वविद्यालयाचे मुख्य केंद्र नाशिकच्या धम्मगिरी येथे इगतपुरी तालुक्यात आहे. जगभरातून लाखो लोक दरवर्षी विपश्यनेसाठी या ठिकाणी येतात. सटाणा तालुक्यापासून साधारणतः तीस किलोमीटर अंतरावर असणाऱ्या मांगीतुंगी येथे जैन तीर्थंकर ऋषभदेवांचा १०८ फुट उंचीचा जगातला सगळयात उंच पुतळा उभारण्यात आलेला असून २०१६ साली त्याची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. या सर्वांपलीकडे नाशिक प्रसिद्ध आहे ते कांदा, सोयाबीन व टोमॅटोच्या आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी; आणि त्याहीपेक्षा जास्त 'वाईन सीटी' म्हणून ओळख प्राप्त करून देणाऱ्या टपोऱ्या गोडगोड द्राक्षांसाठी ! देशाच्या आर्थिक उलाढालीत आज मोठा हिस्सा नाशिकच्या द्राक्ष आणि वाईनच्या व्यापाराचा आहे. प्रतिवर्षी दहा हजार टनांपेक्षा जास्त द्राक्ष उत्पादन होणाऱ्या नाशिकमध्ये देशातील ४६ पैकी २२ वाईनरीज स्थापन झाल्या आहेत. 'महाराष्ट्राचे कॅलीफोर्निया' म्हणून नावारूपास येणाऱ्या निफाड येथे 'विंचूर वाईन पार्क' नावाची खास वाईन निर्मितीची औद्योगिक वसाहत स्थापन करण्यात आलि आहे. इ.स.१९२५मध्ये रावसाहेब गायकवाड यांनी सुरु केलेली द्राक्षबाग लागवड आज जागतिक रूप धारण करत आहे हे जिल्ह्याच्या यशाचे द्योतकच नव्हे काय??

तर असा आहे जनस्थांच्या युरोपीय बाजारपेठेत रेशमाच्या प्रसिद्धीपासून सुरु होऊन वाईन सिटीच्या जागतिक बाजारपेठेतील अधिराज्य गाजवण्यापर्यंतचा प्रवास ! आध्यात्मिक, पौराणिक, आधुनिक अशा अनेक

प्रकारच्या वारसा लाभलेल्या या नाशिकनगरीत वास्तव्याचा मोह अनेकांना आवरला नाही. म्हणूनच पुरातन काळात अनेकांनी तपोभूमी म्हणून तर आधुनिक काळात अनेकांनी कर्मभूमी म्हणून नाशिकची निवड केली. सर्वांची मनोरथ नाशिकमध्ये नक्कीच पूर्ण झाले, यातच या भूमीचे लाघवीपण सामावले आहे. नाशिकची जनस्थान म्हणून असणारी ओळख अढळ रहावी म्हणून व मराठी साहित्य क्षेत्रात योगदानासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांनी मराठी साहित्यातील सर्वोच्च पुरस्कारांमध्ये गणल्या जाणाऱ्या 'जनस्थान पुरस्कार' सोहळयाची इ.स.१९९१साली सुरुवात केली. कुसुमाग्रज हे नाशिकचा अभिमान आहेत. आकाशातील एका ताऱ्याला त्यांच्या नावाचे वेगळे तेज आहे.

आज 'वाईन सीटी' म्हणून नवी ओळख उदयास येत असतानाच नाशिकची गुलशनाबाद ही ओळख पुसली जाऊ नये असा एक प्रयत्न यंदा जिल्ह्याच्या दीडशेव्या वर्षी झाला आहे. दुबईच्या मिराकाल गार्डनच्या धर्तीवर भारतातील पहिले फ्लॉवर पार्क नाशिकमध्ये उभे राहिले आहे. तब्बल आठ एकरच्या परिसरात उभारण्यात आलेल्या या पार्कमध्ये तीन लाखांपेक्षा जास्त नानाविध प्रकारच्या व रंगांच्या फुलांमध्ये साकारलेले पशु, पक्षी, राईड्स, खाऊगल्ली येथे आहेत. तर अशी आहे नाशिकनगरी... मंत्राभूमिकडून यांत्राभूमिकडे जाऊन तंत्रज्ञानात प्रगती करणारी ! रुद्राक्षाच्या पवित्र्यासह द्राक्षांचा गोडवा जपणारी, सर्वांच्या स्वागतास उत्सुक असणारी ! कधी येतंय मग प्रती-महाराष्ट्राच्या गुल्शानाबादमध्ये द्राक्ष खायला ?

# मिस बुम्बुम: ब्राझीलमधील अनोखी सौंदर्य स्पर्धा - सुलक्षणा वऱ्हाडकर

शरीराकडे संकोचूनच पाहण्याची सवय/संस्कार असलेल्या भारतीय मनाला न पेलवणारा 'ब्राझीलियन' आविष्कार. रिओमध्ये 'सिनोरिता' हा शब्द इतक्या वेळेस माझ्या कानावर पडला की मीसुद्धा अनोळखी स्त्रीला संबोधताना 'सिनोरिता पोर फावर (प्लीज)' म्हणायला लागले.

सिनोरिता म्हटले की उगीच झग्यासारखे सुळसुळीत पायघोळ फ्रॉक घालून कतरिनासारखे दिसण्याची गरज नसते हेसुद्धा इथेच समजले. म्हणजे बाईला हाक मारताना आपण जसे बाई, ताई किंवा मॅडम म्हणतो तसेच इथे 'सिनोरिता' म्हणतात. दुसरा एक लोकप्रिय शब्द म्हणजे 'दोन्ना'. म्हणजे दोन्ना करोलिना, दोन्ना इझाबेला, दोन्ना सुलक्षणा. अर्थात माझ्या अवघड नावाचे इथे दोन्ना सुला हे सोपे रूपांतर होते. मीही मनातल्या मनात हे नाव नाशिकच्या जगप्रसिद्ध वाइनच्या गावाशी नाते जोडते म्हणून खूश असते.

लग्न झालेल्या मध्यमवयीन स्त्रियांना त्यांच्या नावापुढे दोन्ना हे प्रिफिक्स लावले जाते. ते अतिशय प्रचलित आहे. एकदा एका ब्राझीलियन मैत्रिणीच्या घरी गेले असता तिच्या किचनमध्ये हातरुमालांवर सात वारांची नावे भरतकाम केलेली दिसली. अगदी पायपुसणोसुद्धा हाताने बनवलेले.

शाळेत स्पोर्ट्स टीचर असलेली ही मैत्रीण तशी टॉम बॉय. तिच्याकडे तिच्या चार मुलांना सांभाळण्यासाठी पूर्णवेळ सेविका. ही मैत्रीण एकतर शाळेत किंवा जिममध्ये जास्त. घरी असली की मुलांना, नव-याला आणि कुत्र्याला बरोबर घेऊन समुद्रकिना-यावर. तिला हे सर्व करायला वेळ कधी मिळतो, माहीत नाही. मी आश्चर्य व्यक्त करीत तिला तसे म्हटले.

त्यावर ती म्हणाली, तिची आई 'मुल्हेर प्रिन्दादा' होती. म्हणजे आपण मराठीत जिला गृहकृत्यदक्ष म्हणतो अशी. घराची, नव-याची, मुलांची काळजी करणारी, घर सजविणारी, गिफ्टेड वूमन. अशा स्त्रिया बायको म्हणून चांगल्या असतात. आजच्या काळात मात्र त्या थोडय़ा दुर्मीळ आहेत.

या देशात अशा बाईचा शोध घेणो वनवासाला निघण्यासारखे आहे. वाटेत तिच्या वाटय़ाला काय काय भोग येतील त्यावरून तिची परीक्षा ठरते आणि विशेषणसुद्धा. ब्राझीलच्या नावामध्ये ब्रा हा शब्द आहे. इथे स्त्रिया अत्यंत सेक्सी कपडे घालतात. पण म्हणून त्यावरून या स्त्रियांना लेबल्स लावण्याची गरज नाही. त्यांचेही काही सामाजिक प्रश्न आहेतच. इथल्या स्त्रियांचे जगासमोर आलेले रूप खूप दर्शनी आहे, हे मात्र खरे!

फक्त आणि फक्त बिकिनीमध्ये समुद्रकिना-यावर फिरणा-या सुडौल बांध्याच्या भरगच्च देहाच्या स्त्रिया थेट खजुराहोच्या शिल्पातून उतरून आपल्यासमोर उभ्या राहिल्यासारख्या दिसतात. म्हणजे हे चित्र शुक्रवारी

संध्याकाळपासून ते रविवारी संध्याकाळपर्यंत समुद्रकिनारी दिसतेच. कधीकधी तीच बिकिनी घालून यच्चयावत वयोगटातील स्त्रिया रस्त्याने फिरताना दिसतात. पाहणा-याला त्याचे काही वाटत नाही.

एखादा चुकलामाकला भारतीय जो त्याच्या बायकोला 'थ्री फोर्थ' घालण्यास मोठ्या मनाने परवानगी देतो, त्याची टिप्पणी सोडली तर बाकी सगळे ठीक असते. कुणी नैतिकतेचा बाऊ करीत नाही, की बलात्काराच्या घटना होताना दिसत नाहीत. समुद्रकिनारी खा-या शेंगदाण्याच्या जोडीला बिकिनी विकणारा, फुगेवाल्यासारख्या काठीवर तां ना पि हि रंगाच्या तलम बिकिन्या घेऊन मुक्त विहार करीत असतो. घेणारेसुद्धा रंग, पोत, फिटिंग, फील तिथल्या तिथे तपासून घेतात.

खरंतर एक वरचा भाग किमान 5 सेमी कपडय़ामध्ये बसतो परंतु खालचा भाग तर चिंधीपासूनच बनवला जात असावा यात शंका नाही.

तर अशा या मुक्त देशात बाईचा पाश्र्वभाग म्हणजे सौंदर्याचा निकष मानला जातो. इथे रिओत काही समुद्रकिनारे फक्त दिगंबर अवस्थेत फिरण्यासाठीच आहेत. देहाचे सगुण साकार रूप सजवून मिरवण्यापेक्षा जसे आहे तसे दाखवणो इथे महत्त्वाचे मानले जाते. यात कोणतीही दांभिकता नाही. ताकाला जाऊन भांडे लपविणे नाही.

'साडीतच बाई सुंदर दिसते' असे मानणारे आणि त्यातून समाधान शोधणारे माझे भारतीय मराठी मन ब्राझील देशी येऊन बरेचसे हलून गेलेय.

सतत काही ना काही इथे घडत असते, इतके धक्के बसतात. चिंधीपासून बनविलेल्या बिकीनीज कमी की काय म्हणून आता ही मिस बुम्बुम स्पर्धा. म्हणजे आज नाही सुरू झाली ही. अर्थात माझ्या ब्राझीलियन मैत्रिणी मला त्याबद्दल माहिती देत असतात. २७ परगण्यातील २७ सुंदर बुम्बुम असणा-या ललनांचा नामघोष केला जातो. यात एक पोर्नस्टारसुद्धा होती जी तिच्या भरभक्कम उरोजांसाठी प्रसिद्ध आहे. आणि इतर जणी त्यांच्या जन्मजात हत्त्यारांबद्दल खात्री बाळगून आहेत. प्रमोशनचा भाग म्हणून साओ पावलोमधील रस्त्यावर भर ट्रॅफिकमध्ये या बुम्बुम्स सिग्नल नियंत्रणाचे काम करीत होत्या, म्हणजे पाहा!

सौंदर्य स्पर्धा म्हटले की आपल्याला चेहरा दिसतो, फिगर दिसते. फार फार तर रंग. इथे स्पर्धेचे निकष अजून ठाशीव आहेत. म्हणजे या सर्वाबरोबर पाश्र्वभाग गोलाकार, मोठ्ठा, भरीव आणि शिल्पाप्रमाणो असला पाहिजे. असाध्य ते साध्य असा. याच्या जोडीला उरोजही तसेच असतील तर जिंकण्याची संधी मिळणारच!!

साधारण सहा वर्षापूर्वी ही स्पर्धा सुरू झाली. खूप गाजावाजा झाला. अनेक कारणांसाठी स्पर्धा गाजली. कधी परीक्षकांना लाच दिल्याचा आरोप झाला. कधी कुणी कौमार्य टिकविण्यासाठी सर्जरी केल्याचा दावा केला.

३९ वर्षीय स्पर्धक ही इथे विजेती ठरली आहे.

अन्द्रेसा नावाच्या एका स्पर्धक तरुणीची शोकांतिका इथे फार प्रसिद्ध आहे. अन्द्रेसाचे बुम्बुम दुस-या क्रमांकावर आले होते. २७ वर्षाची ही तरुणी एक महिनाभर आयसीयूमध्ये होती. कारण तिने तिच्या मांडय़ांमध्ये कॉस्मेटिक जेल फिलर्स इंजेक्ट केले होते. त्यामुळे तिच्या स्नायूवर त्याचा परिणाम झाला. हे हायड्रोजेल फिलर्स बाहेर काढल्यावर तिला सेप्टिक झाले.

विशिष्ट अवयवांना उठाव देण्यासाठी टोचलेल्या कृत्रीम रसायनांचा तिच्या शरीराने स्वीकार केला नाही आणि तिचा पाय कापून काढावा लागेल अशी वेळ आली. सुदैवाने थोडक्यात निभावले.

ब्राझीलला जगाची कॉस्मेटिक राजधानी म्हणतात. इथे सर्वात जास्त ब्रेस्ट इम्प्लांट आणि बटक ऑगमेन्टेशन्स केली जातात. कलिंगडाला इथे 'मेलन्सिया' म्हणतात आणि अशा स्त्रियांनासुद्धा. यावर एक गाणेसुद्धा प्रसिद्ध आहे. सांगण्याचा उद्देश, एकीकडे माझ्या मायदेशात पोर्नवर बंदी येत आहे आणि मी ज्या देशात राहतेय तिथे कित्ती काही घडतेय. जगाच्या शाळेत शिकणे काय असते हे असे समजते आहे मला. सौंदर्याचे आकार ऊकार जपणाऱ्या ह्या देशात माझी समज थोडी उपरीच ठरतेय.

# || लेख विभाग ||

## माई: एक सिंधुदुर्ग – किरण दहिवदकर

*(भावस्पर्शी व्यक्तिचित्र या लेखमालिकेतील हा चौथा भाग)*

माई ही सर्वांची आई. समस्त चार पिढ्यांसाठी गेले नव्वद वर्ष खंबीरपणे सर्वांच्या पाठीशी उभी असलेली माई. माई - एक सिंधुदुर्ग हे नाव या लेखाला देण्याचे कारणही तसेच आहे. कारण माईंचे मुळ नाव हे सिंधू आणि कोकणांतील बळकट आणि खंबीर अश्या सिंधुदुर्गाप्रमाणे माईसुध्दा अजुनही या वयात खंबीर आहेत.

आपल्या आयुष्यातील नव्वद दशक बघितलेल्या माईंची आज जगण्याची आणि लढण्याची जिद्द् तशीच कायम आहे. माईंचा जन्म हा जळगांव खान्देशातील एरंडोल या गावातला. वडिल पंढरीनाथ हे गणित विषयांचे शिक्षक होते. शिस्तीचे पक्के आणि गावांतील प्रतिष्ठीत व्यक्तिपैंकी एक होते. त्यांना सर्वजण आदरांने नाना असे म्हणायचे. आई कावेरीबाई स्वभावाने कणखर आणि उत्तम गृहिणी होत्या. माईंचा जन्म हा तीन फेब्रुवारी 1930 साली झाला. माई त्यांच्या भावंडांनामध्ये सर्वात मोठ्या होत्या माईंच्या पाठीवर पाच बहिणी आणि दोन भाऊ असा परिवार होता. माई सर्वांत मोठ्या असल्यांने त्यांनी लवकरच घराची जबाबदारी सांभाळली. आई आणि नानांना माईंचे त्यांच्या कामात खुप सहकार्य होत असे. लहान बहिण भावांना साभांळणे. त्यांच्या अभ्यासांकडे लक्ष देणे. घरात काही कमी जास्त लागत असल्यास त्याकडे लक्ष ठेवणे हे माईंचे नित्यांचे काम झाले होते आणि हो! हे सर्व करत असतांना स्वतःच्या अभ्यासांकडे लक्ष देणे. कारण वडिल शिक्षक असल्याने शिस्त आणि शिक्षण हे दोन्ही महत्त्वाचेच होते.

काळ आपल्या गतीने वाटचाल करीत होता. माई लग्नायोग्य झाल्यात. माईंचा विवाह हा अमळनेर येथील बाबुराव यांच्यासह झाला. बाबुराव हे सुवर्णअंलकार कारगीर होते. सुवर्णनगरी म्हणुन आजही प्रसिध्द असलेल्या जळगांवात या दोघांनी आपले बि-हाड थाटायचे ठरविले.

पूर्वाश्रमीच्या सिंधू आता लग्नानंतर प्रमिलाबाई झाल्यात. प्रमिलाबाई आणि बाबुराव यांनी जळगांवातील एका दोन खोल्यांच्या घरात गुण्यागोविंदाने आपल्या संसाराला सुरूवात केली. सुरूवातीला माई या कर्तव्यदक्ष गृहिणी म्हणुनच होत्या आणि बाबुराव हे एका सोनारांच्या दुकानांत नोकरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित असत.सगळ कस अगदी छान चाललं होत. असेच दिवसांमागून दिवस जात होते. हळुहळु माईंचा परिवार फुलत गेला, बहरत गेला. तीन मुलं आणि तीन मुंलीनी माईंचा परिवार पुर्ण केला होता. काही दिवस मुलांचे बालपण आणि कौतुक पहाण्यात गेले. सर्व मुलं हळुहळु मोठी होत होती तशी तशी जबाबदारीही वाढत होती. माईंनी आपल्या मुलाला दादाला माहेरी एरंडोल येथे वडिलांच्या देखरेखीखाली शिक्षण घेण्यास पाठविले होते. दादासुध्दा तिथे लवकरच मामा आणि मावश्यांसोबत छान रूळले. मात्र दादाची गट्टी ही समवयीन मामा आणि मावशीशी जास्त जमली. माईंची इतर मुले माईंच्या पंखाखाली वाढत होती. यानंतर मात्र परिस्थिती हळुहळु बिकट होत गेली. मासिक उत्पन्न आणि वाढता परिवार यांचा ताळमेळ बसेनासा झाला. माई मुळातच कर्तृत्वान आणि कार्यक्षम असल्याने, माई या परिस्थितीमुळे अस्वस्थ होत होत्या. फक्त गृहिणी म्हणुनच काम करत असतांना बैचेन होत होत्या. त्यांच्यात घर सांभाळुन, घराला आर्थिक हातभार लावण्यांची क्षमतासुध्दा होती.

कोणलाही मदत मांगणे त्यापेक्षा आपणच सामर्थवान होणे यावर त्यांचा विश्वास होता म्हणुन मग माईंसाठी नोकरीची शोधाशोध सुरू झाली.

आपल्या जवळपासच्या संपर्कांतुन त्यांना डॉ. ठुसे यांचा पत्ता नोकरीसंदर्भात मिळाला. श्री व सौ. ठुसे हे दोघेही डॉक्टर होते. ठुसेबाईंनी माईंना नर्सिंगचा कुठलाही पुर्वाअनुभव नसतांना, आपल्यासोबत मदतनीस म्हणुन कामावर घेतले. ठुसे बाईंनी माईंना सर्व मनापासुन शिकवले. माईंपण सर्व मेहनतीने शिकत होत्या. लवकरच माई त्यांच्या कामात तरबेज झाल्या. माईंचे काम व्यवस्थित चालु होते. संसाराची आर्थिक गाडीसुध्दा हळूहळू रूळावर येऊ लागली. माईंचा आर्थिकदृष्टया संसाराला हातभर लागू लागला. मुलंसुध्दा शाळेत शिकत होती. डॉ. ठुसेकडील काम सुरूळीत सुरू असंताना अचानक एक दिवस डॉ. श्री. ठुसे यांचे निधन झाले. सौ. ठुसेवर आभाळच कोसळले. दवाखांना आणि संसार यांची जबाबदारी त्यांच्यावर एकदम येऊन पडली. अश्या कठिण परिस्थितीत ठुसेबाईंना माईंचा खुप आधार मिळाला. माई जणु त्यांच्या घरातील एक सदस्यच झाल्यात. ठुसेबाईंनी डॉक्टरांच्यानंतर त्यांचा दवाखाना त्यांचेच एक मित्र डॉ. केळकर यांना चालविण्यास दिला. माईंनी डॉ. केळकरांसोबत काम करण्यास सुरूवात केली. आता माईंचा नर्सिंग क्षेत्रातील अनुभव खुपच चागंला झाला होता. अभाव होता फक्त अधिकृत नर्सिंग प्रमाणपत्राचा.

माईंना काही जाणकार लोकांनी अमळनेर येथे जाऊन नर्सिंगचा अधिकृत कोर्स करण्याचा सल्ला दिला. माईंनांही तो सल्ला योग्य वाटला. माईंची धडपड ही फक्त अधिकृत प्रमाणपत्रामुळे आर्थिक उत्पन्नात वाढ होण्यासाठी होती. माईंचे अमळनेर येथे प्रशिक्षण सुरू झाले. सर्व मुलांना जळगांवला सोडून माई आपले प्रशिक्षण पुर्ण करीत होत्या. तसे अधुन मधून माई जळगांवला मुलांना भेटणयास जात असत. ज्याप्रमाणे एखादा पक्षी उंच आकाशात उडत असला तरी त्याचे लक्ष आपल्या घरटयाकडे आणि घरटयातील पिलांकडे असते. अगदी तसेच माईंचे झाले होते.अमळनेरला जरी शिक्षण घेत असली तरी तीचे संपुर्ण लक्ष हे जळगांवला असणांरा आपल्या मुलांकडे असायचे.

*(**सुचना:** लेखांच्या या भागांपर्यंतची माहिती माईंनी स्वतः वाचली आहे आणि घटनाक्रम सुसंगत करण्यास सहकार्य केले आहे. पुढील सर्व प्रंसंग सागुंन ते लिहिण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे. दुर्दवाने माईंच्या हयातीत हा लेख पुर्ण करण्यास मला यश आले नाही. ही खंत माझ्या मनात कायम राहील.)*

माईंनी आपला नर्सिंगचा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पुर्ण केला आणि त्या परत आपल्या गावी आल्यात. माईंनी परत डॉ. केळकरांचा दवाखान्यात कामाला सुरूवात केली.आता सर्वकाही सुरुळीत चालु होते. माईंना आयुध निर्माणी वरणगांव येथिल सरकारी दवाखान्यात सहाय्यक परिचारिका म्हणुन सुध्दा नोकरीची संधी आली होती. पंरतू काही कारणास्तव त्यांना ती संधी सोडावी लागली. माईंच्या जीवनात अनेक आव्हांने येऊन गेलीत. परंतु प्रत्येक आव्हांनाला माई मोठ्या धैर्याने सामोरा जात होत्या. जेव्हा आर्थिकदृष्टया सर्व काही स्थिरस्थावर होत होते, त्या वेळेस त्यांच्या पतीचे अचानक निधन झाले. संपुर्ण परिवाराची जबाबदारी एकट्या माईंवर येऊन पडली. आपली नोकरी आणि घर साभाळूंन आपल्या मुलांचे शिक्षण, मुलांना त्यांच्या पायावर उभे करणे, त्यांचे लग्नकार्य आणि त्यांच्या संसाराची घडी बसवणे हे मोठे कार्य माईंवर येऊन पडले. या सर्व जबाबदारी पार पाडण्यात माईंच्या धाकट्या भावाचा सिहांचा वाटा होता. मुलांच्या डोक्यावरून पितृछत्र जाताच, या मामांनी आपल्या प्रेमाचे आणि आधारांचे एक भक्कम असे छत्र या मुलांवर धरले. आजसुध्दा मामाचा आधार आणि प्रेम या सर्वांना मिळत आहे. सर्व मुलांनाही त्या अडचणीच्या वेळी आपल्या मामांमध्ये वडीलांचा आधार मिळाला. मामा

काही दिवस जळगांवला आपल्या शिक्षणासाठी होते. त्यांनी आपले शिक्षण तर उत्तमरितीने पुर्ण केलेच पण या मुलांनाही शिक्षणासाठी प्रवृत्त केले. मामा शिक्षणांत खुप हुशार होते. आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर मामांना त्याकाळी अनेक सरकारी नोकरींच्या संधी उपलब्ध झाल्या होत्या. त्यातुनच एक आयुध्य निर्माणी वरणगांव येथिल नोकरी मामांनी स्विकारली आणि ते तिथेच स्थाईक झाले.

माईंच्या परिवारांची जबाबदारी स्वीकारली असल्यामुळे त्यांनी पहिली मोठी गोष्ट माईंसाठी केली असेल, ती अशी की माईंचे ज्येष्ठ चिरंजीव ज्यांना सर्व दादा असे म्हणायचे. त्यांच्या सरकारी नोकरीसाठी वरणगांव येथे प्रयत्न केलेत आणि त्यांनी दादांना सरकारी नोकरीत रूजू केले. त्याआधी दादा नुकतेच दहावी पास झालेले होते आणि दादा कुठेतरी छोटी मोठी नोकरी करून माईंना हातभार लावत होते. दादांची नोकरी माईंसाठी मैलाचा दगड ठरली. दादांना त्याकाळी सरकारी नोकरीमुळे सरकारी निवासस्थान सुध्दा मिळाले. माईंनी आपला संपुर्ण परिवार हा वरणगांव येथे दादांकडे स्थलांतरीत केला. माई आणि दादांची बहीणभावांड दादांकडे वरणगांव येथे राहायला आलीत. ती सर्व आपआपल्या परिने शिक्षण घेत होती आणि घरात हातभार लाऊ लागत होती. तो काळ ऐवढा प्रगत नव्हता.स्वयंपाकाचा स्टोव्ह हा सुध्दा प्रतिष्ठित लोकांनकडेच असायचा बाकीच्या सर्वसामान्यांचा वापर हा नेहमी चुलीवरच चालायचा. त्यासाठी लागणारा काड्या आणि छोटी लाकड ही भावंड जवळपासच्या जंगलात जाऊन आणत असत.

दादा आपली नोकरी नियमित आणि जबाबदारीनी करत होते. दादांची दोन लहान बंधू नवीन तयार होणारां इमारतीमध्ये रंगांचे काम आणि कंत्राटी पध्दतीचे कामे करून हातभार लावत होते. माई आणि दोन्ही बहिणींनी घराची आणि स्वयंपाकघराची जबाबदारी सांभाळली होती. सर्वात लहान बहिणीचे शिक्षणांचे वय असल्याने ती शिक्षण घेत होती. माईची ही सर्व मुले आपली परिस्थिती ओळखून एकमेकांना सांभाळून घेत होती माईंच्या मायेने आणि मामांच्या मार्गदर्शनाखाली गुण्यागोविंदाने राहात होती. या काळात माईंना आपल्या आईचा म्हणजे कावेरी आजीचापण भक्कम असा आधार मिळाला होता. माईं आणि माईंच्या माहेरीची मंडळी हे जणू एकत्रच कुंटुंब असल्यासारखे वाटायचे. अश्यातच मामांचाही विवाह झाला आणि मामांच्या कार्यात आणि जबाबदारीमध्ये साथ देण्यासाठी एक साथीदार मांमाना मिळाला. मामांच्या बरोबरीने मामीनीसुध्दा या परिवारास चांगली साथ दिली. माईंना आता मुलांच्या लग्नांची चिंता लागली होती. मोठ्या मुलीचे लग्न आनंदात पार पडले आणि ती आपल्या सासरी निघुन गेली. माईंची एक जबाबदारी पार पडली होती. आता माईंना वेध लागले होते दादाच्या लग्नाचे. दादासाठी स्थळे पाहण्यास सुरूवात झाली आणि पहाता पहाता दादाचे पण दोनांचे चार हात झाले. माईंच्या या परिवारात आता जावाई आणि सुनसुध्दा सामील झाले होते. माईंनी आता आपल्या घरांची जबाबदारी नवीन आलेल्या सुनेवर सोपवली आणि जळगांवला वैद्यकीय सेवेसाठी परत आल्या.

काही दिवस आपल्या जुन्याच घरात राहिल्या. माई ठुसे बाईंना जाऊन नोकरीसंदर्भात भेटल्या. पंरतू दवाखाना चालवण्यास बाईंना अवघड जात असल्याने तो त्यांनी बंद करण्याचा निर्णय माई येण्यापुर्वीच घेतला होता. पंरतू माईंची परिस्थितीची जाणिव असल्यांने त्यांनी आधीच माईंच्या नोकरीची व्यवस्था डॉ.आठवले यांच्याकडे केली होती. डॉ. आठवले दांपत्य हे दोघेही व्यवसायाने डॉक्टर होते. माई या जिथे राहात होत्या तिथुन आठवलेंचा दवाखाना अतिशय दुर असल्यांने सुमनताईंनी आपल्या दवाखान्यालगतचीच एक खोली माईंना राहण्यास दिली. खरा अर्थांने माईंच्या आयुष्यांतील आठवले पर्वाला येथुन सुरूवात झाली. माईंची खोली फार छान होती. चोकोनी आकाराची, एका कोनात छोटे बाथरूम तर दुसरा कोनात स्वयंपाकाची जागा, तिसरा कोनात दारा आडचे सोयीचे कपाट तर चौथ्या कोनात एक चारखानी टेबल ज्यामध्ये माईचे सर्व सामान आणि

वस्तू असायच्या. खोली जरी लहान असले तरी समोरील अंगण खुप मोठे होते. बाजुला पाण्याचा एक मोठा हौद होता. अंगाणात लिंबाची आणि नारळाची खुप झाडे होती. संध्याकाळी आठ वाजता गिरणीच्या भोंग्याचा आवाज नियमीत येत असे. घराजवळंच असणारां मेनरोडवरील वाहतुकीचा आवाज सतत येत असे.असो. सरकारी नोकरीत ज्याप्रमाणे एखादी व्यक्ती आपले संपुर्ण आयुष्य देऊन टाकते. अगदी तसेच माईंनी आपल्या आयुष्यातील चाळीस वर्ष डॉ. आठवले यांच्याकडील खाजगी नोकरीस दिले. माईंची वैद्यकीय सेवा ही 24/7 तास होती.

दवाखान्याजवळच राहात असल्यांने कुठल्याही अडीअडचणीच्या वेळी आणि वेळकाळ न पहाता माईं डॉक्टर आणि पेशंट यांच्या एका हाकेवर धाऊन जात. या त्यांच्या सेवाकार्यामुळे माईंनी फार कमी कालावधीत असंख्य लोक जोडली होती. माई या प्रसुतीसंदर्भातील वैद्यकीय सेवा देत असल्याकारणांना पेशंट आणि पेशंटचे नातेवाईक यांना माईंचा खुप मानसीक आधार वाटायचा. माई सर्वांना सढळ हाताने मदत करायच्या. आपले घर, वस्तू आणि स्वयंपाकघर इत्यादी सुविधा विनामुल्य उपलब्ध करून देत होत्या. डॉक्टर आणि पेशंटप्रमाणेच माईं या आठवलेंच्या दवाखान्यांतील स्टाफच्यासुध्दा आधारस्तंभ होत्या. स्टाफमधील सर्वात वरिष्ठ आणि सुमनताईंच्या खास मर्जीतल्या असल्याने स्टाफच्या व्यवस्थापनांची अतिरिक्त जबाबदारीसुध्दा माईं फार खुबीने पार पाडत असत. आठ तासांची एक शिफ्ट असा ड्युटीचा प्रकार होता आणि त्यातच नाईट शिफ्टपण येत असे. मग स्टाफमध्ये माईंच्या सहकारी असलेल्या रमाबाई, विमलबाई, सुशिलाबाई यांच्या आपल्या वैयक्तीक सोयीनुसार ड्युटी लावण्यांवरून सतत भुणभुण चाललेली असायची. आता मागे वळून पहातांना जरी या गोष्टी गंमतीदार वाटत असतील तरी तेव्हा मात्र माईंसाठी या गोष्टी फार कटकटीच्या असायच्या. पण त्यात फार गंमती जंमतीसुध्दा असायच्या. माई जेव्हा आपल्या घरी मोकळया वेळेत बसलेल्या असायच्या त्यावेळेस या सहकारी मैत्रिणी एकमेकांच्या नकळत एका मागोमाघ येऊन आपआपल्या पध्दतीने तक्रार मांडून जात आणि माईंकडून त्यानांच माईंचे सहकार्य मिळेल असे आश्वासन घेऊन जात. त्यावेळेस त्या सर्वांच्या समस्या ऐकून त्यांचे सर्वांचे समाधान करण्याचे कसब हे माईंकडे होते.

कालातंराने माईंच्या मधल्या मुलींचे लग्न वरणगांव येथे पार पडले होते. माईंच्या मोठ्या सुनेने आता माईंचा बराच भार हलका केला होता. लग्नकार्य, मुलींचे माहेरपण, पाहुण्यांचे स्वागत आणि येणारां जाणारांची सरबराई उत्तमरित्या सांभाळत होती. तसे माईंचे वरणगांवला अधूनमधून येणे चालू असायचे. माईंचे दोघेही धाकटे मुलं आपल्या उज्वल भविष्यांच्या शोधात मायानगरी मुंबई येथे संघर्ष करण्यासाठी दाखल झाले होते. मुंबई येथेसुध्दा माईंच्या लहान भावांनी आपल्या या भाच्यांना आधार दिला आणि मुबंई मध्ये स्थाईक होण्यास मदत केली आणि यथावकाश दोघेही सरकारी नोकरीत रूजू झालेत. माईंची तिनही मुले सरकारी नोकरीत स्थिरस्थावर झालीत. त्याकाळी तिनही मुले सरकारी नोकरीत असणे ही खुप मोठी भाग्याची आणि सामाजिकदृष्टा प्रतिष्ठेची बाब समजली जायची. एकंदरीत आता माईंच्या आयुष्याला एक नवीन वळण मिळाले होते. मुलं स्थाईक होऊन मुलंचे विवाह संपन्न झाले होते. पण म्हणतात ना सुखा पाठोपाठ दुःख ही माणसांच्या आयुष्यात पाठलाग करत असते. अश्यातच अभ्यासात अत्यंत हुशार असणारां माईंच्या सर्वात धाकट्या लेकीला एका दुर्दैवी आजारांने ग्रासले. त्या आजारांने अत्यंत हुशार असणारां मुलींचे आणि त्यासोबतच माईंचे संपुर्ण आयुष्यच बदलवुन टाकले. माईं स्वतः वैद्यकीय व्यवसायात असतांनाही आणि शहरातील मोठ मोठ्या डॉक्टरांची ओळख असतांनाही माईंना लेकीच्या आजाराला पराभुत करण्यास अपयश येत होते. माईंनी आपल्या या लेकीला जळगांव येथे आपल्यासोबत उपचारासांठी ठेऊन घेतले. आजार इतका भंयकर होता की त्यामुळे तिला आपले शिक्षण अर्धवटच सोडावे लागले परंतू अभ्यासाबद्दल असणारी गोडी आणि प्रंचड इच्छा या मुलींचे अभ्यासावरील प्रेम कमी करू शकली नाही.

कारण जरी शाळा सुटली असली तरी तिची शिकण्याची जिद्द, तिचे आजारपण कमी करू शकली नाही. तिचे शाळेचे दफ्तर, वह्या, पुस्तकं, खोडरबर, पेन्सिल आणि कंम्पास हेच तिचे आता सोबती बनले होते. त्याकाळची रोज संध्याकाळी पाढे म्हणायची पद्धत, शुभंकरोती आणि रामरक्षा हा तिच्या जीवनाचा अविभाज्य घटक ठरला होता. आता माई इतर मुलांच्या काळजीतून मुक्त झाल्या होत्या. पंरतु या मुलींच्या काळजीने माईंना ग्रासले होते. पंरतु हरणे हे माईच्या स्वभावातच नव्हते. माईंना कधीही रडतांना पाहील्यांचे आठवत नाही पंरतु लढतांना नेहमी पाहीले. माईंचे जीवन हे खुप संघर्षमय होते आणि माईंनी जीवनाचा हा संघर्ष खुप जिद्दीनी आणि हिमंतींने लढला. आता माईंची ही लेकच माईंच्या जगण्याचे कारण झाली होती. माईंनी आता आपले पुर्ण लक्ष तिच्यावर केंद्रित केले होते. तिच्यावरील औषधौ-उपचार सतत चालले असायचे.

परदेशातून येणारे डॉक्टरांनासुध्दा, माईची मुलीला उपाचारांसाठी दाखवण्याची धडपड चाललेली असायची. माईंचा आपल्या कर्मावर आणि कर्तृवावर जास्त विश्वास होता. माईंनी कधीही फक्त देव देव केले नाही, कर्म हाच माईंचा देव होता. पण याचा अर्थ असा नाही की माई या नास्तिक होत्या. माईंकडेपण स्वतःचे असे एक छोटेखानी देवघर होते. त्या देवघरांत माईंच्याच शब्दात.. लंगडा बाळकृष्ण, महादेवांची पिंड, स्वामी समर्थ आणि श्री दत्तगुरू विराजमान होते. माईंनी आधुनिक उपचारांसोबतच दैवधर्म, व्रतवैकल्ये, उपासनासुध्दा आपल्या लेकीच्या आरोग्यासाठी केली. पंरतु त्यात अपेक्षित असे यश माईंना येत नव्हते. वैद्यकीय क्षेत्रात असल्याने माईंना हे आधीच कळून चुकले होते की या आजारावर जगात कुठेही उपचार नाही पंरतु माईंमध्ये असणारी आई, माईंना स्वस्थ बसू देत नव्हती आणि लेकीवरील उपचार हा माईंच्या जीवनाचां नित्याचा भाग बनून गेला होता. पण एका अर्थाने माईंनी लेकीचे आजारपण स्विकारले होते. लेकीला लागणारां सर्व सुख सुविधा देण्याचा त्यानी अखेरपर्यंत प्रयत्न केला आणि तिला खुपच सुखांत ठेवण्याचा प्रयत्न केला.

माईंनी आपल्या मुलांनप्रमाणेच इतरांच्या मुलांवर सारखेच प्रेम केले. माईंच्या नात्यागोत्यातील मुलेसुध्दा माईंला आपल्या आईप्रमाणेच मानत असत. माईंपण त्या सर्वांचे जातीने लाड पुरवायच्या. माईंची सर्वात धाकटी भावंड ही माईंच्या मोठ्या मुलांच्याच बरोबरीची असल्याने त्या भावंडांसाठीसुध्दा माई, आईच्याच जागेवर होत्या. माईं या सर्व परिवारासाठी धन्वंतरीच होत्या. तशा त्या इतरांसाठीसुध्दा होत्याच. आरोग्यासंदर्भात कोणालाही कोणतीही समस्या असो पहिला संपर्क हा माईंना होत असे. माईंच्या दवाखान्यात समस्या सुटत असेल तर उत्तमच अथवा माईंच्या किंवा माईंच्या डॉक्टरांच्या ओळखीने इतर संबंधित डॉक्टरांचा संपर्क केला जाऊन समस्या सोडविल्या जात असतं. स्त्रीरोग आणि लहांन मुलांच्या समस्या सोडविण्यात माईं आणि माईंच्या डॉक्टर तंज्ञ होत्या. अनेक निसंतान जोडप्यांना मार्गदर्शन करणे. त्या काळातील उपलब्ध उपचार पध्दतीचे माहिती देऊन, त्यांच्या आयुष्यात आनंद निर्माण केला होता. अनेक आईवडीलांनी आपल्या मुलांच्या व्याधीने त्रस्त होऊ त्यांच्या जीवनाबद्दलच्या आशा सोडल्या होत्या, त्यांनासुध्दा माईंनी मानसिक आधार देऊन, त्यांच्या मुलांना ओषधोपचार करून, आरोग्यदृष्ट्या संपन्न बनवून त्यांचा जीवनातील आंनद परत मिळवुन देण्याचे पुण्यकर्म केले होते. अनेकांना मृत्युच्या दाढेतुन खेचुन आणले होते. अशा अनेक जवळच्या, दुरच्या नातेसंबंधातील, ओळखीचे आणि अनोळखी लोकांच्या मदतीला माई नेहमी धाऊन गेल्यात. माईंनी किती जणांना, कश्या स्वरूपात मदत केली असेल हे माईंसुध्दा आठवत नाही. काही जाणिव आणि संवेदनाक्षम असलेले लोक

आजही माईंचे नाव घेतात आणि मनोमन आभार व्यक्त करतात. माईंचा सामाजिक कार्यात सहभाग होता. आपल्या माहेर असो वा सासर या परिवारातील सुख, दुख, समस्या आणि अडीअडचणींच्या काळात माई त्यांच्या सदैव सोबत असायच्या. माई जिथं राहायच्या ते एक जिल्हांचे ठिकाण होते. तेथे आजुबाजुच्या गावातील नातेवाईक आणि ओळखीचे लोक नेहमी आपल्या नोकरीनिमित्त, सरकारी कामानिमित्त यायचे. त्या सर्वांचासुध्दा माईंच्या घरी एक चक्कर असायचा. माईचे घरसुध्दा कचेरीच्या ऑफिससारखेच होते. तिथे लोक आपआपल्या समस्या सुख दुःख माईंना सांगत असत आणि माईसुध्दा त्यांच्या समस्या माईच्या परिने सोडवण्याचा प्रयत्न करत असायच्या. त्यात आरोग्यासंदर्भात तर असायच्या, परंतु त्या व्यतिरिक्त लग्न जुळवणे, लग्नांतील विघ्न, वधु वरांकडील समस्या, घरगुती समस्या, कोंटुबिक वादविवाद, शिक्षण या सर्व समस्या असायच्या. माईं ज्या वैद्यकीय व्यवसायात होत्या त्यात माईंच्या पेशंटमध्ये मोठे मोठे अधिकारी, शिक्षक, मोठे व्यापारी आणि पोलीस अधिकारीही होते. त्या सर्वांना माईंनी नेहमीप्रमाणेच मदत केली असल्याने ते सर्व मोठे लोक माईंना माईमावशी म्हणुन आदराने सन्मान देत असत. माईंच्या शब्दालासुध्दा त्यांच्याकडे मान असे. या सर्व गोष्टीचां फायदा माईंना आपल्या लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी होत होता. जळगांवतील मोठ मोठे सोन्यांचे व्यापारीसुध्दा माईंना, त्यांच्या कार्यामुळे आदरांने ओळखत असतं. तसाच माईंना आपल्या घराजवळच राहणारां चुलतभावाचा आणि त्यांच्या परिवाराचा खूप आधार होता.

माईंच्या प्रत्येक अडीअडचणींच्या वेळी हा भाऊ आणि त्यांची मुले पुढच्या क्षणाला माईंच्या मदतीस धाऊन येत असत. माईंच्या या भावाच्या उल्लेखाशिवाय माईंचा हा लेख अपुर्ण राहिला असता. माईंचा हा जीवनप्रवास असाच सुरू राहिला. माईंचा परिवार हळूहळू वाढत गेला. इतर मुलांची लग्ने झालीत.जवळपास सगळीच नातवंडे ही माईंच्याच दवाखान्यात माईंच्याच देखरेखीत जन्माला आली. माईंनी इतके वर्ष आपली सेवा या क्षेत्रात दिली की नातवंड तर नातवंड, माईंचा एक पंन्तूसुध्दा माईंच्याच दवाखान्यात जन्माला आला होता. आता नातवांचीसुध्दा लग्न कार्य होऊ लागली होती. माईं शारिरीकदृष्ट्या थकत चालल्या होत्या. माईंची धाकटी मुलगीच आता पंन्नाशीच्या जवळ आली होती. त्यावरून माईंच्या वयाचा अंदाज येत होता.

माईंच्या नोकरींच्या ठिकाणीही बराच झपाट्याने बदल होत होता. सुमनताई ज्याच्यासोबत माईंनी आपली नोकरीतील वाटचाल सुरू केली होती, त्यांनीही आपली सेवा आता कमी केली होती आणि निवृतीचा विचार केला होता. जसा काळ कोणासाठी थाबंत नाही तसा येथेही थांबला नाही. नव्या पिढीनी जुन्या पिढीची जागा घेण्यास सुरूवात केली. सुमनताईंनी निवृती घेऊन आपला दवाखाना आपल्या चिल्ड्रंन स्पेशलिस्ट असलेल्या आपल्या सुनेच्या स्वाधीन केला होता. प्रसृती केंद्र हळूहळू बंदच केले. आता फक्त लहांन मुलांचा दवाखाना मोठ्या प्रमाणात सुरू झाला होता. नवीन डॉक्टरांना नवीन लोकंच सहाय्यक म्हणुन लागू लागली. माईंच्या बरोबरीचे सहाय्यक कमी करण्यात आले किंवा त्याना इतरत्र दवाखान्यात स्थलांतरीत करण्यात आले. परंतू माईंची एकनिष्ठ सेवा आणि सेवेची दखल घेऊन त्यांना नवीन लोकांमध्ये आदरांने आणि सन्मानाने सामील करून घेण्यात आले होते. परंतु माईंनासुध्दा नवीन पिढीचा वेग आणि पध्दत जळवून घेणे कठिण जात होते. माई हे सर्व याही वयात फक्त ऐवढ्याचसाठी करत होत्या की त्यांची आणि त्यांच्या मुलीची जबाबदारी आणि भार कोणावरही पडू नये. तसे मुलं आपल्या आईचे कष्ट पाहुन अधुन मधुन आपल्या आईला नोकरी सोडून आपल्या घरी बोलवण्यासंदर्भात बोलत असत. पण माईं म्हणायच्या माझ्याकडून होईल तोपर्यंत मी काम करेल आणि नाही जमेल, तेव्हाच

तुमच्याकडे येईल. माईंचे मुलांकडे जाणे त्यांच्या दृष्टीने तेवढे सोपे नव्हते. कारण माईंसोबत त्यांची मुलगीपण होती आणि तिच्यासह माईंना मुलांकडे जाणे योग्य वाटत नव्हते. तसे माईंच्या मुलांना माईंच्या कष्टांची जाणिव असल्याने, ते आपआपले संसार सांभाळून, आपल्या आईकडे लक्ष देतच होते.आता माईंचे नातूसुध्दा शिक्षण संपवून नोकरीला लागले होते, म्हणजे माईंची तिसरी पिढी आता नोकरीला लागली होती. नातंवंड लग्नांची झाली होती. तरी आजी आपली नोकरी करत होती. माईंचा मुलगासुध्दा आता निवृत्तीच्या वयाला येऊन पोहचला होता.आता सर्व नातवंडांनासुध्दा आजीने नोकरी सोडवी असे वाटू लागले होते. तसा आग्रह ते तिच्याजवळ करत असत. अखेर तिने ते मान्य केले आणि मुलांनीसुध्दा बहिणीसह आईला आहे त्या परिस्थितीत साभांळयांचे मान्य केले.

माईंना आपली कर्मभुमी, आपली जोडलेली जीवाभावाची लोक सोडून, आपल्या मुलांकडे जायचे होते तिच्यासाठी हे सोपे नव्हते. पण असे म्हणतात वृध्दपकाळ हा सर्वांसाठीच कठीण असतो. त्याला माई तरी कश्या बरा चुकणार. उतारवयातील कमी जास्त सुख दुःख ही माईंच्या वाट्यालासुध्दा आलीत. अश्यातच आपल्या लेकीचा आजार बळावला आणि ती माईंना सोडून या जगातुन निघुन गेली. तीच खरा अर्थाने माईंच्या जगण्याचा आधार आणि कारण होती. माईंना तिची कमी खुप दिवस जाणवत होती.परंतू लोकांच्या म्हणण्यानुसार माई आता खरा अर्थाने आता मोकळया झाल्या होत्या. पंरतू त्या मातेचे दुःखं तीच जाणो.

माईंनी आयुष्यभर सर्वांना विना अपेक्षा मदत केली होती. भरभरून दिले होते आणि परतीची कुठलीही अपेक्षा ठेवली नव्हती. आता आयुष्याच्या या वळणांवर वेळ होती त्या प्रत्येक व्यक्तीची ज्यांना ज्यांना तिने भरभरून दिले होते. तिने कोणाकडे कधीही काहीही मागितले नाही. परंतु ही त्या प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी नव्हती का? की आपण जाणिव ठेऊन या व्यक्तीचे काहीतरी देणे लागतो. असो. यापैकी कुठलीही अपेक्षा तिने आपल्या आयुष्यात ठेवली नाही आणि व्यक्त केली नाही. प्रत्येक व्यक्ति ही गुणदोषांचा पुतळा आहे असे संत महात्मा सांगून गेले आहेत. त्याला माई तरी कसा अपवाद असणार. त्यांच्यावर ओढवलेली परिस्थिती, मुलांचा सांभाळ, त्यांच्यावरील संस्कार आणि आयुष्यातील सततचा संघर्ष यातुन त्या घडल्या आणि स्वभावातील गुण दोष त्यांनाही लागू होते. माझे एक स्पष्ट म्हणणे आहे. त्याच लोकांनी इतरांचे दोष दाखववे, ज्याच्यामध्ये फक्त गुणंच गुंण आहेत आणि एकही दोष नाहीत. हा नियम सर्वांनाच लागू होतो. माई आयुष्याच्या ज्या वळणावरती होत्या त्या वळणावरून आपल्यालाही कधी ना कधी वळण घेऊन जायचेच आहे नां. आयुष्याचा हा टप्पा आपणा सर्वांनाही कधी ना कधी पार करायचाच आहे. असो.

माईंचा जीव आपल्या सर्व लोकांसाठी शेवटपर्यंत तुटतच राहिला. हे जे लोक त्यांच्या जवळ शेवटपर्यंत राहिले तेच चांगल्याप्रकारे जाणु शकतात. असे म्हणतात आईला आपल्या मुलांवर प्रेम आणि माया व्यक्त करण्यासाठी कुठलेही वय आडवे येत नाही. प्रंचड पाऊस पडल्यानंतर आपल्या 72 वर्षाच्या मुलांला पावसात बाहेर पडू नको हे सांगणारी हीच 90 वर्षाची आई असते. आपल्या आधीच आजारांने अंथरूणाला खिळलेल्या, आपल्या 68 वर्ष वयाच्या मुलीला पुन्हा आजारातुन उठवण्यासाठी प्रयत्न करणारी हीच 90 वर्षाची आई असते. सुनांच्या आजारपणात काळजी करणारी हीच ती 90 वर्षाची सासु असते. इतक्या सर्व नातवंडांनाच्या गोकुळांत, प्रत्येकांची नावानिशी काळजी आणि चौकशी करणारी हीच ती 90 वर्षाची आजी असते. या वयात आपल्या

पंणतूची शाळेतुंन येण्याची वाट पहाणारी, त्याला गरम वरण भात देऊन त्यांच्यासोबतच जेवणाचा आंनद घेणारी हीच ती 90 वर्षाची पणजी असते. भाऊबीज आणि रक्षाबंन्धनाला आपल्या 80 वर्षाच्या भावाला त्याच उत्साहाने ओवळणारी हीच ती 90 वर्षाची बहीण असते. माईंचे आयुष्य हे सुखां दुःखाचे संमिश्र मिश्रण होते.

माईंनी जसे दुःख पाहिले तसेच अलौकिक असे सुखही पाहीले. नातवंड, पंतू आणि पणती यांचा आनंद मनमुराद लुटला. ती आपल्या पंणतूंमध्ये खुप रमायची. माईंनी आपल्या नातवांसोबत आणि त्यांच्या परिवारांसोबत आयुष्यातील खुप चांगला कालावधी घालवला. नातवासोबत हैद्राबाद येथे स्थलांतरीत होऊन तिथेल संस्कृतीचा आनंद लुटला. माई आपल्या तिन्ही मुलांकडे ठराविक कालावधीसाठी राहण्यास जात असतं. आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात त्यांनी आपल्या नातवाला स्पष्टपणे सांगितले होते की मी आता येथुन कुठेही जाणार नाही आणि जाईल तर येथुनच देवाघरी जाईल. माईंनी कधीही देवाजवळ मरण मागितले नाही किंवा मुक्ती मागितली नाही. कारण तिला चांगले जीवन जगण्याची प्रेरणा मिळाली होती. सतत कार्यमग्न राहणे आणि विनातक्रार मिळालेले आयुष्य जगणे हाच तिचा उंदड आयुष्याचा मंत्र होता. तिने आपल्या आयुष्यात ऐवढे कठिण दिवस पाहिले होते, त्यांना किंवा नशिबाला ती कधी दोष देत बसली नाही आणि आयुष्यातील प्रत्येक क्षण ती आनंदाने जगली तिच्या अश्या पध्दतीने जीवन जगण्याने, कुठलाही रोग तिला स्पर्श करू शकला नाही किंवा कुठलीही गोळी तिला लागली नाही.

स्वतःची घरगुती पध्द्तीने काळजी घेत तिने आपल्या शरीरांची आणि आपल्या मनांची काळजी घेतली. यासोबतच नवनवीन गोष्टी शिकण्यासाठी तीचा उत्साह असायचा. आपल्या पंतूकडून मोबाईल आणि कंम्प्युटर शिकणे. फुलांची झाडे लावणे, त्याची काळजी घेणे, पंतू, नातवासोबत अभ्यास करणे हे सर्व तिचे चालेले असायचे. तिने शिकलेली आधुनिक कला म्हणजे लिफ्टचा स्वंतत्रपणे वापर करणे आणि सेल्फी घेणे. तिने स्वतःच्या हाताने अनेक सेल्फी आपल्या नातंवडासोबत घेतल्या. नातवाच्या कारमध्ये पुण्यात फेरफटका मारला, कारमध्ये जाऊन आपली कर्मभुमी जळगांवला भेट देऊन झाली. फक्त विमानप्रवास बाकी होता तोही जवळपास निश्चितच झाला होता. परंतु नियतीला माईंची एकतरी इच्छा बाकी ठेवायची असेल. कारण देवाची आणि माईंची जीवन जगण्याबद्दलची जणू स्पर्धाच लागली होती. पण म्हणतांत ना शेवटी तोच जिकंतो.

दसऱ्याचा सण उजाडला. माईंची सकाळपासून लगबग सुरू होती. सणाला माई आवर्जुन नवीन पातळ घालायच्या, मोत्याची माळ आणि दागिने घालायच्या, छान तयारी करायच्या, आपलासोबतच इतरांनाही तयार होण्यास सांगायच्या. माईंमुळे सगळया घरात आनंदाचे आणि सणांचे वातावरण निर्मिती व्हायची. दसराला सर्व तयारी करून सणांच्या जेवणाचा यथेच्छ आनंद घेतला. तीने त्या दिवशी पुरणपोळीचा मनमुराद आनंद घेतला. नातसुनेचे जेवण उत्तम झाल्याचे कौतुक केले.

दुपारी बसल्या बसल्या आराम केला. सध्याकाळी पुन्हा तयारी केली. मला नमस्कारांसाठी येणारां लहान मुलांसाठी खाऊ मागितला आणि आपल्या जागेवर जाऊन मुलांची आणि येणारा जाणारांची वाट पाहू लागली. मी, माझा मुलगा आणि माझे वडील सीमोलंघनासाठी जाऊन आलो. आल्यावर विधीवत पुजा झाली. प्रथेप्रमाणे

मोठ्यांच्या आशिर्वादाने सणाची सुरूवात झाली. आम्ही सर्वानी माईला साष्टांग नमस्कार केला. तिने आम्हाला भरभरुन आशिर्वाद आणि खाऊ दिला आणि तिच्यासोबत तिने एक गृप फोटो काढण्यासाठी सांगितले आणि बोलता बोलता असेही बोलुन गेली की पुढच्या दसराला मी असेन, नसेन माझ्यासोबत एक फोटो काढा. आम्ही सर्वांनी छान फोटो काढला.

ती थोड्यावेळ आमच्याशी हसत खेळत बोलली आणि आपले कपडे बदलुन आरामास जाते असे सांगून गेली. आज ती दुपारी झोपली नव्हती. म्हणुन तीला पडताच क्षणी गाढ झोप लागली. आम्ही सर्व आपआपल्या कामास निघुन गेलो.

रात्र झाली सर्वजण झोपी गेलो.

माईंची नातसून सकाळी नित्यनेमाने पाच वाजता उठली आणि सवयीने माईंच्या खोलीत डोकावली.

तिला रोजच्यासारख नाही वाटले, ती माईंजवळ गेली.

माईंना आवाज देऊन बघितले पण माईंनी कुठलाही प्रतिसाद दिला नाही.

माझे वडील आलेत.

त्यांनीसुध्दा माईला आवाज देऊन पाहिला.

मला माईंचे शरीर थंड जाणवले आणि तेव्हाच मला कळले की माई झोपतेच आम्हाला सोडून पुढच्या प्रवासाला निघुन गेल्यात.

अगदी त्यांना हव तसंच कोणालाही त्रास न देता आणि नातवाच्याच घरून, हे जग सोडून ही सर्वांची आई सर्वांना पोरकं करून गेली....

कायमची!!!!

# स्वा. वि.दा. सावरकर: एक धगधगते यज्ञकुंड – वंदना मत्रे

सावरकरांचा जन्म 28 मे 1883 या दिवशी नाशिक जिल्ह्यातील भगूर ह्या गावी झाला. रँडच्या जुलुम जबरदस्तीमुळे चाफेकर बंधूंनी रँडची हत्या केली. अन त्यांना फाशी झाली. तेव्हाच देशभक्तीची पहिली ठिणगी विद्यार्थी वयात असलेल्या सावरकरांच्या मनात प्रफुल्लित झाली. ह्याला प्रेरित होऊन सावरकरांनी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारण्याची प्रतिज्ञा कुलदेवतेपुढे त्यांनी विद्यार्थी अवस्थेत असताना घेतली . तरूणपणी छत्रपती शिवाजी महाराज आदर्श होते.

"माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी मी ह्या सशस्त्र युद्धात शत्रुस मारुन चाफेकरांप्रमाणे मरेन किंवा शिवरायांप्रमाणे विजयी होऊन माझ्या मरेन किंवा शिवरायांप्रमाणे विजयी होऊन माझ्या मातृभूमीच्या मस्तकी स्वराज्याच्या राज्यभिषेक करेन " अशी प्रतिज्ञा केली.

सावरकरांचे स्फुर्तिस्थान होते इटालियन जोसेफ मेझिनी . त्यांचा उद्देशच होता " सशस्त्र क्रांती " हा अग्नी सावरकरांनी कधीही विझू दिला नाही. तर ह्या क्रांतीमुळे क्रांतीकारकांची मने त्यांनी पेटुन उठवली. व ते सशस्त्र क्रांतीचे अग्निहोत्री ठरले.

१९०२ साली त्यांनी "अभिनव भारत" ह्या सशस्त्र क्रांतीकारी संस्थेचे नामकरण करून त्या संस्थेला आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळवुन दिले. तुझ्यासाठी "मरण ते जनन" तुझ्याविना "जनन ते मरण" ही फक्त त्यांच्यासाठी कविता नव्हती तर ही कविता सावरकर जगले. हिंदुराष्ट्राचा सामाजिक विचार हा तत्वज्ञानाशी जोडला जावा हे ते सदैव सांगत राहिले.

शिवरायांची आग्र्याहुन सुटका ह्याचा आदर्श त्यांनी समोर ठेवला. अन् बोटीतून उडी समुद्रात मारली. त्यांची ही उडी जगभर गाजली . परंतु त्यांनी सगळयांना बजावून सांगितले. "एकवेळ तुम्ही मी समुद्रात मारलेली उडी विसरलात तरी चालेल पण माझा सामाजिक विचार आणि तत्त्वज्ञान कधीही विसरू नका कारण मी म्हणजे स्वतंत्र हिंदू राष्ट्राची किंकाळी आहे"

ब्रिटिश साम्राज्याच्या विरोधात त्यांनी सशस्त्र क्रांतीचा उठाव केला. उठावाचे ते विचारवंत सेनानी झाले. हा वणवा फक्त भारतीय क्रांतिकारकांना पुरताच मर्यादित नव्हता तर त्यात इजिप्त, आयलँड या देशातील नेते आणि क्रांतिकारक फक्त स्वातंत्र्यासाठी लढले नाहीत तर त्यांनी भारतात समाविष्ट असलेले चुकीचे राजकारण, चुकीची जीवनसरणी, धर्म, तत्त्वज्ञान आणि अस्पृश्यता यांच्याविरुद्ध सुद्धा लढा दिला. कारण त्यांच्यासाठी हा देश म्हणजे एखादी जमीन नव्हती तर ती एक भावना होती. हा भारत म्हणजे त्यांची माता होती.

तिला त्यांना ब्रिटीशांच्या बेडीतुन सोडवायचे होते. इंग्रजांच्या शत्रूंचे सहाय्य घेऊन त्यांनी स्वदेशी बंड पुकारले. तेथील सैन्यांमध्ये सुद्धा राजद्रोह पेटवला. ह्या सशस्त्र क्रांतीच्या उठावाचा वनवा त्यांनी जगभर एवढा पेटवला की पुस्तकांबरोबर पुस्तकांच्या पानांमध्ये त्यांनी भारतात शस्त्रे आणि बॉम्बची विद्याही पोचवली.

त्यांचे सहकारी मदनलाल धिंग्रा ,लाला हरदयाळ, वीरेंद्र चटोपाध्याय, मॅडम कामा व व्ही. व्ही.अय्यर हे होते. १९११ जून मध्ये महाराजा बोटीने त्यांना काळयापाण्याच्या शिक्षेसाठी अंदमानात सेल्युलर जेलमध्ये आणले गेलदंडा मृत्यूच्या जबड्यात त्यांनी प्रवेश केला. "अनादि मी अवध्य मी" हे मृत्युंजय कवच त्यांनी धारण केले व तेथील यमयातना भारत मातेच्या संरक्षणासाठी सहन करण्यासाठी ते पुन्हा सुसज्ज झाले.

त्यांना तेलाच्या कोलुसाला जुंपले गेले दंडाबेडीत अडकवून टांगण्यात आले. फक्त भाकरी खाऊन त्यांनी दिवस काढले. कोणीही पाहू न शकणारे असे तेजपुंज सूर्यबिंब होते ते मग त्या सूर्यबिंबाला सूर्यकिरणांची काय गरज म्हणूनच एवढ्या मोठ्या अंधारकोठडीत त्यांना प्रत्यक्षात सरस्वती देवी प्रसन्न झाली. आणि पायात बोचणाऱ्या काट्यांची त्यांनी लेखणी केली आणि भिंतींचा कागद केला आणि मनात साठलेले काव्य त्यांनी कारावासाच्या भिंतीवर लिहून काढले.

जवळ काहीही लेखन सामग्री उपलब्ध नसतानाही अंधारकोठडीत साहित्याची निर्मिती करणारे पहिले आणि शेवटचे साहित्यिक म्हणजेच स्वातंत्र्यवीर सावरकर. ब्रिटिशांनी एवढे छळुन सुद्धा त्यांनी तेथील कैद्यांमध्ये हिंदी भाषेचा प्रचार केला स्वतःचे धोरणे त्यांच्या अंगीकृत केली बाबाराव सावरकर यांना मृत्यूशय्येवर पाहताच त्यांनी "स्वातंत्र्य लक्ष्मी की जय" ही क्रांती घोषणा केली.

अहिंसा व चरखा या मार्गाने स्वातंत्र्य संपादन करणाऱ्या मेंढ्यांच्या कळपात राहून स्वतःचा सदसदविवेकबुद्धीशी अप्रामाणिक राहण्यापेक्षा स्वतःच्या साहसी व्यक्तिमत्त्वाला साजेशी अशी त्यांची त्यांनी हिंदू महासभा निर्माण केली व ती एक स्वतंत्र राजकीय शक्ती आहे हे त्यांनी सिद्ध करून दाखवले. हा अखंड भारत म्हणजे माझी माता आहे त्यातले प्रांत आणि भाषा म्हणजे माझ्या भगिनी आहेत ह्या माझ्या देशाकडे कोणीही वाईट नजरेने पाहू नये त्यासाठी ह्या भारतमातेच्या संरक्षणासाठी एक मर्द मराठा पुरेसा आहे हे त्यांनी सिद्ध करून दाखवले.

देशभक्ती, स्वातंत्र्य, प्रीती, साहस, प्रतिभा, प्रज्ञा, पराक्रम, यज्ञ भावना , वकृत्व यांचे दुर्मिळ रसायन म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर पण एक गुण दुसऱ्या कुणाशी स्पर्धा करणारा आणि मुख्य म्हणजे कुठलाही गुण अपेक्षेने आणि हितसंबंध याने दूषित झाला नव्हता.
ह्या हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्यसंग्रामात अनेक ज्ञात आणि अज्ञात क्रांतिकारकांनी स्वतःच्या आयुष्याचा होम केला.

मातृभूमीसाठी सावरकरांनी स्वतःचे आयुष्य, वकृत्व, लेखन एवढेच समर्पित केले नाही तर संपूर्ण कुटुंबाच्या असीम त्यागाची आणि बलिदानाची आहुती धगधगत्या यज्ञकुंडात दिली. आणि त्या यज्ञकुंडाच्या

ज्वाळा  जगभर एवढ्या पसरल्या की स्वातंत्र्ययुद्धाचा वनवा पेटला यातून भारत माता बंधन मुक्त होताना दिसली.

एकदा  स्वातंत्र्यवीर सावरकर गर्वाने म्हटले होते, " माझे कान भरण्याचा अधिकार फक्त शिवाजी महाराजांना आहे"  माझे विचार लोकांना दहा वर्षांनी पटतील दहा वर्षे वाट पाहण्याची माझी सिद्धता आहे.

“झाले बहु, होतील बहु, परंतु या सम हा" या अर्थाने सिद्ध करणारा नरशार्दुल म्हणजेच स्वातंत्र्यवीर सावरकर!"

# सकारात्मक विचार - सविता कारंजकर

ईश्वराने मोराला रंगीबेरंगी पिसारा दिला..कोकिळेला कंठ दिला..मात्र बुद्धी आणि विचार करण्याची शक्ती फक्त माणसाला दिली.विचार माणसाच्या जीवनात फार महत्त्वाचे असतात.विचारांचा माणसाच्या जीवनावर प्रभाव पडत असतो. कारण विचार हे सतत मनात स्फुरत असतात.तुम्ही कामात गुंतलेले असा अथवा रिकामे असा..मन सतत विचार करत असते.मानसशास्त्र असे सांगते, दिवसभरात मानवी मनात साधारण साठ हजार विचार येतात.त्यातील काही विचार आपण जाणीवपूर्वक करतो..काही विचार संगतीनुसार तर काही संस्कारांमुळे येत असतात.

मन वढाय वढाय

उभ्या पिकातलं ढोर

किती हाकला हाकला

फिरी येती पिकावर...

बहिणाबाईनी केलेले हे मनाचे अत्यंत चपखल वर्णन.

या विचारांचा आपल्या जीवनावर परिणाम होत असतो.आपण चांगला विचार केला तर जीवन चांगल्या गोष्टींनी बहरून येते.वाईट विचार केला तर अर्थातच त्याचप्रमाणे जीवन घडत जाते.विचारांप्रमाणे माणसाचे जीवन घडत असेल तर माणसाने विचार करताना सतत सावध राहणे देखील फार गरजेचे आहे. वाईट, नकारात्मक विचार जीवनाला चुकीची कलाटणी देतात तर सकारात्मक विचार माणसाला जीवनात यशाच्या शिखरावर नेतात. मात्र विचारांबाबत सावध नसल्यामुळे आजकाल सगळीकडेच नकारात्मक विचारसरणी दिसून येते. मन आणि विचारांचे सामर्थ्य माहिती नसल्यामुळे कदाचित अनेक माणसे कळत-नकळत सतत नकारात्मक विचार करत असतात.

तुमचे मन प्रसन्न असते तेव्हा त्याचे सुपरिणाम तुमच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर दिसून येतात अगदी त्याचप्रमाणे मनातील दुःखद भावनांचे दुष्परिणामदेखील तुमच्या शरीरावर दिसून येतात. म्हणूनच निरोगी राहण्यासाठी सतत सकारात्मक विचार करणे फार गरजेचे आहे.

प्रत्येक माणसाला सकारात्मक विचार आणि मनाचे सामर्थ्य माहिती असायलाच हवे. सतत प्रयत्नपूर्वक सकारात्मक विचार करून तुम्ही तुमच्या जीवनात नक्कीच यश मिळवू शकता. मात्र त्यासाठी नेहमी सकारात्मक विचार कसे करायचे हे तुम्हाला माहिती असायला हवे.

जी माणसे सकारात्मक विचार करतात ती माणसे सभोवताली आनंद पसरविण्याचे काम करतात म्हणून अशी माणसे सर्वांना हवीहवीशी असतात..इतरांना प्रभावित करतात.सकारात्मक विचारसरणीमुळे त्यांच्यात आत्मविश्वास ठासून भरलेला असतो त्यामुळे आपल्या आयुष्यात आपल्याला हवं तसं पोषक वातावरण ते निर्माण करू शकतात त्यामुळे त्यांचे जीवन नंदनवन बनते.

तुम्हाला जर सकारात्मक विचारसरणी अंगिकारायची असेल तर तुम्हाला तुमच्यामध्ये काही बदल करावे लागतील.

**१. संगत बदलणे -** तुम्ही ज्या संगतीत राहता त्याचा जीवनावर मोठा परिणाम होत असतो.म्हणून जाणीवपूर्वक आनंदी लोकांच्या संगतीत रहावे.

**२. व्यायाम -** सुदृढ शरीरात चांगले मन निवास करते.म्हणून आपल्या दिनचर्येमधील काही वेळ खास व्यायामासाठी राखीव ठेवा.दररोज किमान बारा सूर्यनमस्कार घालणे फायदेशीर.व्यायामाने शरीर सुदृढ बनते.हलकेपणा येतो.उत्साह वाढतो पर्यायाने आपली कार्यक्षमता वाढते.त्याचबरोबर नियमित प्राणायामाचा अभ्यास केल्यास रोगप्रतिकारशक्ती वाढते.आयुर्मान वाढते. मन प्रसन्न होते.दिवसाची सुरुवात प्रसन्न झाल्याने अर्थातच दिवस चांगला जातो.अर्थात व्यायाम प्राणायाम हे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करावा.

**३. वाचन -** उत्तमोत्तम पुस्तके चांगल्या विचारांचे वाचन केल्याखेरीज दिवस संपवू नये.पुस्तके आपले जीवन घडविता. माणसाला अंतर्बाह्य बदलवून टाकण्याची क्षमता ग्रंथांमध्ये असते.जगातील अनेक महान व्यक्तिमत्व ही त्यांच्या सकारात्मक विचारांमुळे जीवनात यशस्वी झालेली असतात. अशा लोकांनी त्यांच्या अनुभवातून लिहीलेल्या पुस्तकांच्या वाचनाने तुम्हाला नक्कीच प्रोत्साहन मिळू शकते. शिवाय तुमच्या विचारांना त्यामुळे योग्य दिशा मिळू शकते. दुसऱ्याच्या अनुभवातून शिकल्याचा माणसाला नेहमीच चांगला फायदा होतो.

**४. ताणतणाव विसरून जा -** ऑफिसमधला अथवा कामाचा ताण सतत असतोच. अशावेळी मन खंबीर असेल तर कोणत्याही परिस्थितीत न डगमगता समस्येला सामोरे जाण्याचे धैर्य मिळते.

**५. संगीत ऐका -** संगीताचा आपल्या शरीरावर आणि मनावर खूप चांगला परिणाम होत असतो.तेव्हा दिवसातील खास वेळ संगीत ऐकण्यासाठी राखीव ठेवा.

**६. निसर्गाच्या सान्निध्यात रहा -** रोजच्या धकाधकीच्या जीवनात चार क्षण निखळ आनंद मिळवण्यासाठी निसर्गाच्या सान्निध्यात राहणे म्हणजे एक प्रकारे शरीर आणि मन यांचे चार्जिंग होय.यासाठी खूप खर्च करून दूरवर सहलीलाच गेले पाहिजे असे काही नाही.आपल्या अवतीभवती निसर्गाने मुक्तहस्ते उधळण केली आहे त्यासाठी कलासक्त नजर हवी मात्र.निसर्गात संगीत भरलेले आहे ते ऐकण्याचा प्रयत्न करा.

**७. स्वसंवाद -** स्वतःशी संवाद साधणे यासारखा आत्मपरीक्षणाचा चांगला मार्ग नाही.

दिवसाच्या शेवटी आज दिवसभर आपण काय काय केले यावर एक नजर टाका.आजच्या चुका उद्या पुन्हा होणार नाहीत याची खूणगाठ बांधा स्वतःशीच.

दिवसभरात कोणालाही दुखावले असेल तर आवर्जून माफी मागा.मग बघा..किती हलके वाटते ते!

मित्रांनो, आपल्या आयुष्यात अनेक छोट्या छोट्या गोष्टीत आनंद भरला आहे.तो ओळखता आला पाहिजे.आनंदाचे क्षण चुटकीसरशी सरून जातात..योग्यवेळी त्यांचा उपभोग घेतला पाहिजे. घरचे काम, ऑफिसचे काम, झोप, जेवण, व्यायाम, वाचन, चिंतन, आरोग्य, कुटुंबाला पुरेसा वेळ देणं या सर्वच गोष्टी माणसाच्या जीवनात फार महत्वाच्या आहेत. यासाठी या सर्व कामांचे योग्य नियोजन करा. नियोजन केल्यामुळे तुम्ही प्रत्येक कामाला योग्य न्याय देऊ शकाल. सतत नवनवीन ज्ञान आत्मसात करा जीवन हे अनेक चांगल्या-चांगल्या गोष्टींनी भरलेले आहे. जगात अनेक सकारात्मक गोष्टी घडत असतात. मात्र माणसे स्वभावानुसार नकारात्मक गोष्टी, गॉसिप यामध्ये जीवनातील बराचसा वेळ वाया घालवतात. जर तुम्हाला जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर चांगल्या आणि सकारात्मक गोष्टींचे ज्ञान मिळवा. या ज्ञानामुळे तुमचे जीवन आनंदी आणि प्रफुल्लित होईल.

# मायमाखली नजर – प्रसाद वाखारे

चांदण्या रात्रीनंतराची सोनेरी पहाट, चिमण्यांचा चिवचिवाट ती कोंबड्याची बांग आणि नव्याने दिनचर्येला सुरुवात कुणाला आवडणार नाही. पण येणारी नवीन पहाट सोबत पूर्वेची लालीच नव्हे तर अनेक जबाबदाऱ्या सुद्धा आणते आणि त्यातलीच सर्वात मोठी जबाबदारी म्हणजे टिचभर पोटाची खळगी भरण्याची, कदाचित म्हणूनच गणेश ला नवी पहाट जणू ओझं वाटते. गणेश तसा कष्टाळू मुलगा, मिळेल ते काम करायचा, मिळेल ते खायचा अंगभर कपडे नव्हते पण शरीर झाकेल एवढा मस्त सदरा होता ज्याला भोकं पडलेली अगदी त्याच्या नशीबासारखीच! अंगावर पळीभर मास नाही पण स्वाभिमान कधी वेशीला टांगला नाही. उगवता सूर्य सोबत भूक पण आणायचा म्हणून पुन्हा नव्याने दोन पायांची गाडी चालवत गावभर भटकायचा आणि हाती आलेले काम एवढा चोख पणे पार पाडायचा की कुणी तरी त्याला शिळ्या पोळी ऐवजी गरम पोळी भाजी देईल. पण त्या कवळ्या बुद्धीला कुठे कल्पना की भावनाशून्य माणसांच्या गर्दीत हरवलाय तो! आणि असाच त्याचा रोजचा कार्यक्रम अगदी आनंदात पार पडायचा.

एके दिवशी पोट दुखीने दार ठोठावलं आणि गणेश आळयापिळया देऊ लागला. असह्य झालं दुखणं म्हणून नरड्यात बोटं घालून उलट्या करू लागला. काही वेळात थोडं बरं वाटलं आणि भुक लगेच मांडी घालून पुढ्यात बसलीच होती. निघाला रस्त्याच्या कडे कडेने पुन्हा टिचभर पोटासाठी. आज नशिबाने त्याच्यासाठी वेगळीच मेजवानी तयार केली असावी म्हणून एक म्हातारी त्याला दिसते. आई बाळाला जशी कुरवाळते जणू तसच म्हातारी शेणाने घर सारवत होती. गणेश अगदी कुतूहलाने ते सर्व बघत होता आणि कुठे तरी तो सुखावला असावा म्हणून अलगद हसू त्याच्या चेहऱ्यावर आले. पाटी भर शेण आणून आणून म्हातारी थकलेली आहे याची चाहूल गणेश ला लागली म्हणून त्यानेच पाटी उचलली आणि घरापाशी आणून ठेवली. म्हातारीने आशीर्वाद दिला तोच गणेश च्या डोळयातला पहिला थेंब तिच्या हातावर पडला. गणेश ने क्षणभर विचार न करता 'आई' म्हणून तिला हाक मारली आणि तोच म्हातारीच्या डोळयातून अश्रू टपकले. कदाचित म्हातारीलाही आई म्हणणारं कुणी नव्हतं आणि गणेश तर आईविना पोर, एक अनाथ!

आई पण मिळायलाही भाग्य लागतं म्हणे, पण आई म्हणायलाही खूप पुण्य लागत असावं. आज गणेश ची भूक त्या म्हातारीच्या मायमखल्या नजरेने शांत झाली. म्हातारीने जवळ घेऊन अगदी लाडाने गणेश ला कवटाळले आणि पुन्हा एकदा आई म्हणून हाक मारायला लावली. गणेश जणू माळच जपू लागला आई...आई...आई...आणि म्हातारीचे डोळे अगदी ओसंडून वाहत होते. डोळयासमोर सर्व कसं धूसर होऊन गेलेलं कारण आज अश्रुंचे मेघ दाटले होते. चातकाप्रमाणे वाट बघत असावं त्या म्हातारीचं मन आई हे शब्द ऐकण्यासाठी आणि पहिलाच पावसात पिसारा फुलवून नाचणारा मोर जणू आज गणेश बनून गेला. क्षणभर उशीर नाही केला आणि "बाळ भूक लागली का रे तुला?" असे उदगार म्हातारीच्या तोंडून निघालेत. गणेश आता अगदी शांत होता बस न्याहळत होता त्या मायमखल्या नजरेला. "आज कुठे पोट भरलं बघ आई" एवढं म्हणून गणेश ने म्हातारीच्या कुशीत डोकं ठेवलं. सायंकाळची वेळ झालेली देवा पुढे दिवा लावायचा म्हणून म्हातारीने पणती मध्ये तेल ओतले आणि प्रकाश चहू बाजू पसरला. आज म्हातारीच्या तेजोमयी चेहरा या दिव्याच्या प्रकशालाही लाजवत होता.

आज गणेश ला झोपही नव्हती आणि येणाऱ्या उद्याची चिंता देखील नव्हती, जणू स्वर्गच गवसला होता त्याला. रात्र भर गणेश म्हातारीच्या मांडीवर डोकं ठेवून निपचित पडला आणि म्हातारीही त्याच्या डोक्यावरून हात फिरवत होती. पहाटेला कोण बरे थांबवणार? आणि ती उगवलीच! आज गणेश साठी भूक हा प्रश्न मुळीच नव्हता बस ओढ होती ती त्याच मायमखल्या नजरेची. म्हातारीने गणेश ला आवाज दिला जवळ बोलावले आणि एक मुका घेतला. गणेश आज निशब्द होता. तेवढ्यात म्हातारी गणेश ला म्हटली "काय रे काट्या, किती वेळ बघणार अजून मलाच? कामाला लाग बघू, उचल ती पाटी आणि कर गोळा ते शेण". म्हातारीच्या या वाक्याने गणेश सुखावला आणि क्षणभर वाया न घालवता पाटी घेऊन म्हातारीच्या मागोमाग निघाला. शेणाने घर सारवून म्हातारी पोट भरायची आणि आता तिच्या हातांना बळ देणारा गणेश तिच्या सोबत होता. कदाचित म्हातारीने गणेश मध्ये आपलं पोटचं कुणी बघितलं असावं आणि गणेश ने म्हातारीत आई शोधली असावी. पुढे दोघी मिळून कामे करू लागलीत आणि गुण्यागोविंदाने राहू लागलीत. खरंच आईची किंमत काय असते हे एक अनाथ नक्कीच सांगू शकतो, तर आईपणाचं सुख काय असते हे देखील एक आईच सांगू शकते.

शेवटी निरोप घेतांना...

भूक त्या तुझ्या उबदार मायेची,
नाही त्या फाटक्या गुढघाभर चादरेची...
भूक तुझ्या त्या दोन गोड शब्दांची,
नाही त्या चित्र विचित्र भाषांची...
भूक तुझ्या हातच्या दोन घासांची,
नाही त्या शिळया कुजक्या तुकड्यांची...
भूक त्या मायमखल्या नजरेची,
नाही त्या तिरकस पेचाची..

# आमची माती, आमची मिसळ - नवनीत सोनार

जीवनातल्या काही गोष्टी आणि प्रसंग हे अविस्मरणीय ठरतात आणि असे प्रसंग बहुतेक वेळेस योगायोगाने घडतात. असाच एक प्रसंग जो आम्ही कधीच विसरू शकत नाही.

आमच्या कुटुंबातील आम्ही सहा सदस्य कधीकधी संसाराच्या रहाट गाडग्याचा कंटाळा आल्यानंतर बाहेर जेवायला जात असतो. असेच एकदा सुट्टीच्या दिवशी सार्वजन बाहेर जेवायला निघालो. जरा संध्याकाळी उशिरा आणि पायी निघालो.

**मी:** कोणत्या हॉटेलात जायचे?

**मुलगा:** इथून सरळ पुढे गेल्यावर एक छान हॉटेल आहे.

पत्नी, सून आणि नातवंडे अशा सर्वांच्या संमतीने आम्ही पुढे चालू लागलो. पण तेच हॉटेल नेमके त्या दिवशी बंद निघाले. रांगेने पुढे त्या रस्त्यावर अनेक हॉटेल होती मग आम्ही पुढे पुढे चालत राहिलो. एक पर्याय सापडला आपण तिथे मेनू बघितल्यावर बहुतेक पदार्थ नॉनव्हेज असल्याने ते टाळून पुढे गेलो. मग इथे जाऊ तिथे जाऊ करत करत अर्धा तास निघून गेला.

हिरमोड होऊ नये म्हणून पुन्हा घरी जाण्याऐवजी सर्वानुमते एका छोट्याशा उपहारगृहात जाण्याचे ठरवले. चुटे होते तरी छान उपहारगृह होते. गोल टेबलाभोवती छान खुर्च्या मांडलेल्या होत्या. पायी फिरून थकवा आल्याने बसल्यावर बरे वाटले. वेटरने थंडगार पाणी आणून दिले ते पिले आणि बरे वाटले.

मी वेटरला हाक मारली.

**मी:** जरा इकडे या बरं!

**वेटर:** काय साहेब?

**मी:** खायला काय काय आहे?

**वेटर:** पावभाजी, मिसळपाव, बटाटेवडे, सामोसे, दहीवडे, मेदूवडे ...

आणखी त्याने बऱ्याच पदार्थांची नावे सांगितली. क्जेवान करण्याऐवजी आम्ही नाश्याचेच पदार्थ पोटभर खाण्याचे ठरवले आणि सर्वांनी मिसळपाववर शिक्कामोर्तब केले आणि मी धान्य झालो!

**मी:** वेटर, पाच मिसळपाव आण

**वेटर**: आणतो सर थोडा वेळ लागेल

मिसळपाव बनत असतांना जो वास आला त्यात मला काहीतरी आठवले आणि हा वास आधी अनुभवल्यासारखा वाटला. त्याने थोड्या वेळाने मिसळ आणून दिली. दोन घास खाल्ल्यानंतर मी वेटरला बोलावून घेतले आणि विचारले, "मिसळची चव कशी खानदेशी वाटते!

**वेटर:** होय, सर!

**मी:** या उपाहारगृहाचे मालक कोण आहेत? त्यांना बोलावता का?

मालकाला बोलावल्यावर ते आले.

**मी:** आपण राहणारे कोठले? तुम्हाला यासाठी विचारले की मिसळची चव खानदेशी वाटते!

**मालक:** मी भुसावळचा! आणि माझ्या हाताखालची माणसंही तिकडचीच!

**मी:** म्हणूनच! कारण मला ही चव तिकडची वाटली, ओळखीची आणि आवडीची वाटली! माझे आयुष्य तिकडेच गेले त्यामुळे मिसळची अशी तिखट चव मी ओळखली!

मग मालकाशी भरपूर गप्पा झाल्या. संवादातून कशी आपली माणसे बरोबर जवळ येतात, याची प्रचीती आली. खूप बरे वाटले. हा योगायोग होता. त्या दिवशी जेवणापेक्षा छान मिसळपाववर ताव मारला. मला वाटले खरंच ज्ञानेंद्रिये सुद्धा एखाद्या पदार्थाची चव ओळखून साक्ष देतात. तेव्हापासून तो उपहारगृहाचा मालक आमचा मित्र झाला. जुन्या आठवणी ताज्या झाल्या. जीवनातील काही आठवणी चवीच्या रुपात ताज्या होऊन मनाला आनंद देऊन गेल्या.

# आम्ही मैत्रिणी - अनुष्का मेहेर

'बिनधास्त' नावाचा मराठी मूव्ही आठवतोय का? मी कॉलेजच्या फस्ट इयरला असताना रिलीज झाला होता. त्यात एक डायलॉग होता, दोन पुरुषांची मैत्री आयुष्यभर टिकते, पण अशी मैत्री मुलींची टिकत नाही'... मग त्यातल्या वैजू आणि मयू आणाभाका घेतात की लग्नानंतरही आपण आपली मैत्री टिकवायची...

माझा स्वभाव तसा एकलकोंडा, त्यामुळे माझ्या मैत्रिणी कमी होत्या. पण ज्या होत्या त्या मात्र फार जिवलग होत्या. मात्र आपले लंगोटीयार असतातच ना, अशी माझी मैत्रीण स्नेहल. आता अशा आणाभाका घ्यायचा फिल्मी प्रकार काही आम्ही केला नव्हता... पण आमची मैत्री टिकली, नव्हे तर बहरली.

एकतर आम्ही शाळेपासूनचे सोबती. मला तर आठवतही नाही की पहिल्यांदा आम्ही कधी भेटलो ते? दोघीही ज्युनिअर केजी पासून एकाच वर्गात... वसईमधल्या आगाशीतील 'काशिदास घेलाभाई' असं भारदस्त नाव असलेली आमची शाळा. स्नेहलबाई शाळेच्या जवळच रहायच्या... इतक्या की मी चाळपेठ नाक्यावर बसची वाट बघत असताना स्वारी घरी जाऊन, कपडे बदलून सायकल वरून फिरायची... मला फार हेवा वाटायचा तिचा तेव्हां. वाटायचं, आपलं घर का जवळ नाही असं?... असो... तर तिसरीत असतानाची गोष्ट, मला काहीही करून 'तीन पायाची शर्यत' अशा वियर्ड नाव असलेल्या एका रेस मध्ये भाग घ्यायचाच होता. एका मैत्रिणीने मला, पडल्यावर गुडघ्यातून वाटीभर रक्त निघतं असं सांगून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण ऐकेन ती मी कसली? मग मी स्नेहलला विचारलं, तर ती हो म्हणाली आणि आम्ही दोघी एकेका पायाला रुमाल बांधून अश्या धावलो म्हणता ना, की दोघीही पहिल्याच आलो.... करून दाखवलं!!

सातवीत असताना, आम्ही दोघी जणी एका बेंचवर बसायचो. मात्र, अखंड बडबड करत असल्यामुळे आमच्या बाईंनी माझी उचलबांगडी करून आमची युती फोडली. त्यादिवशी नेमकी मी शाळेत गेले नव्हते... आजच्या सारखे मोबाईल नसल्यामुळे ती ब्रेकिंग न्युज मला दुसऱ्या दिवशी मिळाली... आणि ती सांगताना, अजून एका मैत्रिणीने शेरा मारला, आता स्नेहलच्या मनाची स्थिती यावर एक निबंध लिहायला पाहिजे.

मात्र असं असलं तरी आम्ही काही तोपर्यंत एकमेकांच्या बेस्ट फ्रेंड, ट्रू फ्रेंड वगैरे नव्हतो... तिचं वेगळं विश्व होतं, माझं वेगळं होतं. आमची मैत्री जास्त बहरली जेव्हा आम्हांला एकाच कॉलेजात ऍडमिशन मिळाली...

बांद्रा ईस्टला, आमचं इंजिनीअरिंग कॉलेज होतं... १९९९-२००० मधलं बांद्रा ईस्ट आणि वेस्ट म्हणजे लॉरेल आणि हार्डीची वेगवेगळी रूपं... ग्लॅमरस बांद्रा वेस्टला गावठी ईस्ट अगदी खेटून होतं... त्यावेळी अजून BKCची भुताटकी अवतरली नव्हती. आमच्या दुर्दैवाने आमचं कॉलेज नॉन-ग्लॅमरस ईस्टला होतं. खरंतर वयाने आम्ही तशा लहानच पण, तेव्हापासून ट्रेनचा प्रवास आमचा सुरू झाला... आजही इतकी वर्षे झाली तरी मला अजूनही बांद्रा- विरार ट्रेनच्या वेळा मात्र लक्षात आहेत.

शाळेत आमच्याबरोबर बऱ्याच मैत्रिणी होत्या... को-एड शाळा असतानाही मुलांशी मात्र आमची मैत्री नव्हती... आम्ही चक्क लाजायचो तेव्हा... तेच कॉलेजमध्येही सुरू झालं. खरंतर 'कोणीतरी' आहे याच एका पॉईंटवर तिथे ऍडमिशन झाली होती. घरच्यांना वाटायचं की आधार आहे चला... मात्र आम्ही दोघीजणी खरंच एकमेकांचा आधार झालो... आमचे कॉलेज मधले तर इतके किस्से आहेत ना... शेवटपर्यंत तशा दोघीच राहिलो... अजूनही शाळेतले कित्येकजण चांगल्या संपर्कात आहेत मात्र कॉलेजमधले कोणीही नाहीत... आणि त्याची गरजही वाटत नाही.

सकाळची आमची ८:२९ची चर्चगेट ट्रेन असायची... या मॅडम, आठ पासून विरार स्टेशनवर असायच्या. आणि मी धावत पळत ८:२० नंतर यायचे. कधी कधी तर दोघींनी जीव खावून धावून ट्रेन पकडली आहे. पण मी आल्याशिवाय ती ट्रेनमध्ये बसायची नाही. मोबाईल नसताना असा आमचा संवाद कसा चालत असे असा मला कधी कधी प्रश्न पडतो. ठरलेल्या ठिकाणी आम्ही एकमेकींची वाट बघत बसायचो. बांद्रा स्टेशनवरून कॉलेजला जायला दोन रस्ते होते. एकूण वीस मिनिटांच्या अंतरावर कॉलेज होतं. मात्र गर्दीचं वावडं असल्याने शॉर्टकटवरून आम्ही कधीही गेलो नाही. वेस्टन एक्सप्रेस वे वरून चालत जायचो. मात्र कधीही रिक्षा केली नाही. तेव्हां रिक्षेचं कमीत कमी भाडं ७/८ रुपये होतं... आणि तेव्हा ती भलतीच उधळपट्टी वाटायची. भाईंदरवरून येणाऱ्या दोन मुली होत्या. ज्या नेहेमी फर्स्ट क्लास मधून यायच्या आणि दोन्ही वेळेला रिक्षेने प्रवास करायच्या... त्यांना बघून आम्ही आश्चर्य व्यक्त करायचो... पण त्यामुळे खरंच एक चांगली सवय लागली... कसलीच तक्रार न करता, असेल त्या परिस्थितीत रहायची. असं नाही, की घरी काही प्रॉब्लेम्स होते... पण पैसे जपून वापरण्याची सवय त्यावयात लागणं हे फार फार गरजेचं असतं. तोच टिनएज संपायचा काळ मुख्यतः तुमचं भविष्य घडवत असतो. व्यवहाराच्या बाबतीत सुद्धा आम्ही फार पर्टीक्यूलर होतो. अगदी चार आण्याचेही हिशोब केले आहेत आम्ही.

आमचं कॉलेज सकाळी दहा ते पाच असायचं. तेव्हाचं आमचं लक्ष्य असायचं ते म्हणजे ५:३५ ची डाऊन ट्रेन पकडणं. जी बांद्रा वरून दादरला जायची, आणि पाच मिनिटांनी तिच ट्रेन दादर- विरार होऊन परत विरारला जायची. कारण तेव्हा बांद्राला 'बांद्रा- विरार' ट्रेन पकडणं म्हणजे पायाच्या चवड्यांवर उभं राहून प्रवास करणं... त्यामुळे आम्ही जिवाच्या करारावर डाऊन ट्रेन सोडत नसू. एकदाची सीट मिळाल्यावर 'अडीच रुपयाचा' वडापाव आठवड्यातून एक/दोन वेळेला खाणं म्हणजे आमची सर्वोच्च चैन.

आमचं कॉलेज ईस्टला असल्याचा आम्हांला अगदी जळफळाट व्हायचा. एकदा आम्ही दोघी जणी बांद्रा वेस्टच्या बाहेर असलेल्या साईश्रद्धा नावाच्या रेस्टॉरंटमध्ये गेलो होतो. थोडेसे पैसे होते जवळ. पण तिथे गेलो आणि जास्त खायची चटक लागली... आणि आम्ही सत्तर रुपयाचं बिल केलं... तोपर्यंत आम्ही तिथेच राहून भांडी घासण्याचे वगैरे जोक केले. मात्र बिल आल्यावर आमची गाळण उडाली, दोघींच्या बॅगेचा कप्पा न कप्पा परत परत तपासून झाला. आणि हाताशी येतील तसे एकेक रुपया, दोन रुपये गोळा करून सत्तर रुपये वेटरला दिले. त्यानंतर आमच्याकडे मला विरार स्टेशन वरून घरी जायला रिक्षेचे तीन रुपये तर तिला घरी जायला पाच रुपये एवढेच उरले... वेटरने स्पष्ट शब्दात 'कौनसे स्टेशन पे बैठे थे' असं बोलून आमचा अपमानही केला. टोचून बोलण्याचा मक्ता काही फक्त पुणेकरांनी घेतला नाही आहे... उगा आम्हां पुणेकरांना नावं नका ठेवू यापुढे...

कॉलेजचं थर्ड इयर एक वेगळी जबाबदारी घेऊन आलं. आमचं प्रोजेक्ट चालू झालं. त्यासाठी आम्ही नेरुळला जायचो. मजा म्हणजे, तेव्हा नेरुळ आता सारखं अफाट मोठं झालं नव्हतं. त्यासाठी आम्हांला नेहेमी नेरुळला जावं लागायचं. तिथे रात्री अपरात्री फिरायलाही आम्हांला भीती नाही वाटली. एके दिवशी, प्रोजेक्टची फाईल आम्ही ट्रेनच्या वरच्या रॅकवर ठेवली आणि आम्ही विरार आल्यावर उतरून निघून गेलो. लक्षात आल्यावर आम्हांला स्वर्ग आठवला... मात्र मी लगेच माझ्या मावसभावाला फोन केला. तिच सेम ट्रेन परत दादर स्टेशनला जाणार होती. तो घाईघाईने दादरला आला. आम्ही ज्या ट्रेनच्या 'डब्यामध्ये' बसलो होतो तिथे तो येऊन पोहोचला. दादरला ट्रेन आल्याबरोबर डब्यातल्या लेडीज 'बायकांच्या' हातापाया पडून त्याने फाईल मिळवली. संध्याकाळच्या वेळी खच्चून भरलेल्या लेडीज डब्यात एखाद्या पुरुषाने चढणे म्हणजे काय आक्रीत त्याच्यावर ह्याची फक्त कल्पना करा. Anurag बंटी, आठवतेय का? त्या आमच्या प्रोजेक्टच्या निमित्ताने आमची नागपूरला सुद्धा वारी झाली. कॉलेजचा काळ खरंच आम्ही जगलो... जबाबदारी शिकवणारा... आमच्या पंखात बळ येण्याचा तो काळ होता...

आम्ही बऱ्याच वेळी एकमेकांकडे जायचो. क्वचितकधी रात्री पण राहायचो. त्यांच्याघरची 'वांगी-बटाट्याची' भाजी माझी विशेष आवडीची. तिची मोठी बहिण, माझी पण बेन झाली. तिचे आई- बाबा मला त्यांचीच मुलगी असल्याप्रमाणे वागवायचे. माझ्या घरी सुद्धा तिला तशीच ट्रीटमेंट मिळायची. त्यांचा लँडलाईन नंबरसुद्धा अजूनही माझ्या लक्षात आहे. ****40 बरोबर ना गं स्नेहल? आणि तो प्लाझा ला जाऊन बघितलेला 'चिमणी पाखरं' आठवतोय का? काय रडलो होतो आपण. काय दिवस होते ते... निरागस... आता बघू का, तो चिमणी पाखरं परत?

कॉलेज नंतर आमच्या गाठीभेटी कमी झाल्या. फोन वरून कॉन्टॅक्ट व्हायला लागले. दोघी नंतर आपापल्या व्यापात व्यस्त झालो. यथावकाश आमची लग्नही झाली... मुलं झाली. मात्र तिच्या सासूबाईंबद्दल मला सांगावसं वाटतं, त्यांचा माझ्यावर फार जीव. त्या मूळच्या कोल्हापूरच्या. एकदा मी स्नेहलकडे गेले होते, तेव्हां चविष्ट अशी कोल्हापूरी मिसळ त्यांनी माझ्यासाठी केली होती. फोनवर सुद्धा त्या नेहेमी बोलतात. त्यांना खास माझं घर बघायचं होतं. त्यासाठी त्या आमच्या पुण्याच्या घरीसुद्धा आल्या होत्या. निघताना माझ्या नवऱ्याला म्हणाल्या, 'रश्मी माझी मुलगी आहे. तिला जपा.'.... खरंच कोण कुठल्या त्या... तर कोण कुठली मी...मैत्रिणीची सासू... दोन- तीन वेळेला भेटले फक्त... पण कसे ऋणानुबंध असतात ना?

आमच्या भेटी आता जास्त होत नसल्या तरी आमची मैत्री ही निरंतर आहे... जसं कॉलेजच्या दिवसांमध्ये आमच्या घरातल्यांना वाटायचं की बरोबर 'कोणीतरी' आहे आज तीच फीलिंग आम्हांला एकमेकींबद्दल वाटते... अजूनही!!

# एक स्त्री – प्रिया भांबुरे

"आई, आज खूप कंटाळा येतोय ग काहीही करण्याचा" असं लग्नाआधी म्हणणारी मुलगी लग्नानंतर कितीही कंटाळा आला, थकवा आला तरीही मन लावून ते काम पूर्ण करत असते.सोपा नसतो तिचा हा प्रवास....

लहानपणीची आई-बाबाची लाडकी परी राणी, राजकन्या मोठी झाल्यावर कुण्या अनोळखी व्यक्तीच्या हातात हात देते, जन्मोजन्मीची गाठ बांधते, त्याच्या मनाची राणी होते आणि बदलत जाते एका परिपुर्ण स्त्री मध्ये!! जोपर्यंत ती लहान असते तोपर्यंत तिचे आयुष्य एका फुलाच्या कळीप्रमाणे असते. लग्न झाल्यानंतर फुलाच्या पाकळया प्रमाणे तिचे वेगवेगळे नाते फुलू लागतात. पत्नी, सून, आई, वहिनी, काकू आणि कितीतरी! प्रसंगी काही झालं तर केविलपणे रडणारी ती खंबीर व्हायला शिकते, कठीण वेळी मार्ग शोधण्याचा प्रयत्न करते. लग्नानंतर स्वतःचे घर,नाते मागे ठेवून ती नवीन घरात प्रवेश करते त्यामुळे तडजोड हा नैसर्गिक गुण तिच्यामध्ये असतोच असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. नवीन नात्यामध्ये सगळयांची मन जिंकून घेण्याची जबाबदारी ही तिची असते. जमेल का मला सगळं अशी धाकधूक तिच्या मनात असते. मग हळूहळू नवीन लावलेल्या रोपट्याप्रमाणे तिच्या आपुलकीची मुळे सासरच्या घरामध्ये खोलवर रुजू लागतात अन् तिचे स्वतंत्र असे अस्तित्व तयार होऊ लागते. मग तीसुद्धा आपली मतं मांडायला शिकते,चूक-बरोबर गोष्टींची पारख करून व्यक्त करायला शिकते. बऱ्याच वेळा परिस्थिती अशी येते की तिला राग येतो ,स्वाभाविक आहे ते मात्र तेंव्हाही ती राग नियंत्रित करून शांत राहते. नवीन घरचे रीति-रिवाज, संस्कृती, व्रतवैकल्ये सगळं कसं समरसून करते. कलह, मतभेद हे घरामध्ये होतातच मात्र त्यातूनही जी ते कुशलतेने हाताळते ती निश्चितच लाडकी होऊन राहते. घर एकसंध ठेवण्यात यश आले की मिळणारे समाधान निराळेच! निसर्गाने मातृत्व बहाल केल्यावर तर ती अजून उजळते, तिच्यातील सुप्त गुण, स्वभावाचा निराळा पैलू बाहेर येतो. तोपर्यंत असणारी राणी आता समजदार झाली असते किंबहुना राणीपेक्षा पूर्णवेळेची माता झालेली असते. वयानुसार अनुभवाची शिदोरी वाढत जाते, स्थैर्यता येत जाते .घरातील सगळे नकळत तिच्यावर विसंबून राहू लागतात. छोटी छोटी कामही मग तिच्यावाचून अडायला लागतात. घरात जणू काही जादूची कांडी फिरवल्यागत तिचे कार्य सुरू असते. कधी नवीन खाण्याचा पदार्थ करायचा असो वा कधी घरात नवीन प्रकारची सजावट करायची असो ती ते करण्यास उत्सुक असते ,तत्पर असते. वर्षे सरत गेली की घरच्यांशी ती खूप एकरुप झालेली असते. संसाररूपी मुकुटावर समाधानाचा, सुखाचा हिरा विराजमान झालेला असतो.अन् एके दिवशी तो सहज म्हणतो, काय आजीबाईसारखी वागतेस ग!!! मग ती खुदकन गालातल्या गालात हसते कारण ती आता परिपुर्ण स्त्री झालेली असते.

# वृध्दाश्रम: गरज की अपरिहार्यता – नीला पाटणकर

वृध्दाश्रम गरज की अपरिहार्यता ? हा एक गहन विषय आहे.वृध्दाश्रम हा वृध्दासाठी शाप की वरदान न म्हणतां ती एक काळाची सोय,गरज कांहीही म्हणू शकता.कांहींना ती खरोखर निकडीची गरज असते.मुनष्या पासून प्राण्यां पर्यंत प्रत्येकालाच आपले स्वत:चे असे व्यक्ती स्वातंत्र्य हवे असते.जो तो आपापल्या परीने जगत असतो.विचार,वागणे,राहणे यासाठी स्वतंत्र पेस हवी असते.कालानुरूप ते योग्य ही आहे.पूर्वी एकत्र कुटुंब पध्दती होती.त्यामुळे एक दोन तरी वयस्कर वृध्द व्यक्ती घरात असायची.त्यांचे अनुभव,मत विचारात घेऊन,शिरसावंद्य मानले जायचे.त्याच्या विषयी आदरयुक्त दरारा ठेऊन त्यांना मानाने वागवले जायचे.त्याच्या आधाराची घरातील प्रक्येकाला जरूर वाटायची.त्यांची सर्व आनंदाने सेवा शुश्रुषा करायचे.त्यात कुणाला वावगे वाटायचे नाही.आता विभक्त कुटुंब पध्दतीत तरूणांना वेळ नसतो.आपली मत मांडण्याचा आधिकार आपल्याला आहे असे त्यांना वाटू लागले आहे.पूर्वी वृध्दांच्या अनुभवच्या शिदोरीचा तरूण पिढी वापर करून घ्यायची.आता तरूणांना विचार वेगळया मार्गाने मांडण्याची कला म्हणा सामर्थ्य आले आहे.आत्मसन्मान आत्मसात करण्याची प्रवृत्ती जागी झाली आहे.अशावेळी रूणानुबंध कुठे तरी विस्मृतीत हरवून गेलेत की काय अस कधीतरी मनाला चाटुन जात.

मोबाईल,फोन,इंटरनेट,विमानसेवा यामुळे जग इतक जवळ आलय.की आपण अनेक कोसावर असलेल्या व्यक्तींशी बोलूं,व पाहूं शकतो.पण एकत्र राहुन जे एकमेकांचे प्रेम लागत,हवंहवंस वाटते ते ओघानेच कमी झालय.नकळत दुरावा निर्माण झालाय.आस्था,आपुलकी हे शब्द कालबाह्य झाल्यात जमा आहेत.जे घडतच नाही तिथे मनाची ओढ कशी काय वाटणार ? कुठेतरी ते शोधण्याचा प्रयत्न मात्र न कळत चालूं असतो,ते कुणालाच कळत नाही.नवे विचार,नवी विचारसरणी,दोन पिढ्यांतील अंतर वगैरे बोलले जाते पण खरच हे असे आहे कां? याचा खोलवर विचार करायला सुध्दा तरूणपिढीला वेळ नाही.

जग यांत्रिक होत चाललंय ,नवे तंत्रज्ञान झेप घेऊ लागलेय ही नक्कीच चांगली गोष्ट आहे. यातून माणूस दूर कुठे तरी जाऊ लागलाय.नवीन महागड्या गोष्टींचे आकर्षण निर्माण झालय.यात दोष कुणाचाच नाही.ना जुन्या पिठीचा ना नव्या पिढीचा.तरूण व वृध्दांनी समन्वय घडुन आणला तर कांहीच कठीण नाही.सामंजशाने प्रश्न सोडवणे सुलभ असल तरी या धकाधकीच्या व धावपळीच्या स्पर्धेच्या जगात तो विचार करायला सुध्दा तरूणांना वेळ नाही.याची प्रकर्षाने खंत वाटते.हे मात्र तितकेचं खरे आहे.तरूणांची जीवाच्या आकांताने ध्येय गाठण्याची मनीषा चालूं असते.कायम टिकुन राहण्याची सतत धडपड व मेहनत सुरूं असल्यामुळे घराकडे स्रि व पुरूष दोघांनांही बघायला वेळ नसतो.त्यांचा दृष्टीकोन बदललाय यांत गैर मानावे की नाही हा ज्यांचा त्यांचा प्रश्न आहे.त्यापेक्षा प्रत्येकाने आपले आयुष्य कसे समृध्द करून जगायचं त्याचे अगोदरच नियोजन करणे क्रमप्राप्त होईल.

अशावेळी वृध्दांना वृध्दाश्रमाची नितांत आवश्यकता असते.कोणती ही नवी संकल्पना अमलात यायला वेळ हा लागतोच.ती रूजायला समाजाकडून मान्यता मिळायला थोडा कालावधी जातो.जो तो आपापल्या ठिकाणावर योग्य असतो.त्यासाठी आपला मार्ग सुलभ व्हायला वृध्दांनी चार पावलं पुढे व तरूणांनी चार पावलं मागे जावे.आणि दोघांचे ही मार्ग सुकर करावे.हे सांगणे जितके सोपे आहे तितके

भावनिक पातळीवर अमलांत आणणे कठीण आहे.परदेशात हा विचार जोमाने रूजलेला आहे.परदेशीयांचे नको ते विचार व नकोत्या इतर अयोग्य गोष्टींचे आपण अंधानुकरण करतो.पण ही गोष्ट मान्य करायला मन धजत नाही.जिव्हाळा व आपुलकीचे बंध आपले इतके खोलवर रूजलेले असतात की ते आपल्याला तस करू देत नाही.आजी-आजोबांचा जीव नातवंडात अडकलेला असतो.तस म्हटल तर चहुंबाजुनी झालेली ती कोंडी असते.त्यातून मार्ग काढण एक दिव्यच अाहे.नातवंडांना ही आजी-आजोबांची छत्रछाया हवी हवीशी असते.

पूर्वापार आपल्या भारतीयांची चालत आलेली एकत्र कुटुंब व्यवस्था संस्कृती व लहानपणा पासून मनावर घडलेले चांगले संस्कार याला कारणीभूत आहेत.आपल्या माणसाला दूर लोटायला मन कबूल नसत भारतीय माणूस कुटुंबवत्सल व समाज प्रिय आहे.आता ती कांही अंशी न राहील्याने प्रश्न निर्माण झालाय. पोटापाण्या साठी गावोगाव बदल्या होणे.नोकरी निमित्त व शिक्षणा साठी परदेशागमन होणे.यामुळे प्रेम संबंध दुरावले जाऊ लागलेत.जास्त काळ एकत्र राहील्याने जिव्हाळयाचे संबंध आपोआप निर्माण होतात.
हीच गोष्ट परदेशी सहज मान्य करून आचरणात आणतात.कारण त्यांची संस्कृती व मानसिकता त्याला पोषक असते.तरी पण " वारा येईल तशी पाठ फिरवणे " हे सामोपचाराचे वाटते." कालाय तस्मैय नम: " हेच बरोबर आहे.

दोन पिढीच्या विचारांच्या तफावतीत वृध्दांनी आपले पुढील आयुष्य आपल्या वैचारिक निष्ठा बाळगुन भावनीक न होता योग्य वेळी बाजुला होऊन,आपल्या आवडी-निवडी,सोयीनुसार जपून,आनंदी राहण्याचा प्रयत्न करावा.आर्थिक बळ कमी असेल तर त्याचे साह्य गरजेनुसार नक्कीच घ्यावे.वैचारिक पातळींवर झुंज देत बसण्यापेक्षा ही समृध्द तडजोड केव्हांही बळकट आहे.

कांही स्वाभिमानी वृध्दांना लादलेले बांडगुळ होऊन ओझे होणे,पसंत नसत. अशावेळी वृध्दाश्रमाची योजना रास्त वाटते.व पुढच्या पिढीला स्वातंत्र्य दिल्याच समाधान मिळेल.आणि त्यांना ही स्वातंत्र्याच व्यक्ती स्वातंत्र मोकळेपणाने उपभोगता येईल.या मागे ही एकमेव विचार व संकल्पना आहे.

आजकाल सर्रास घरटी एक तरी मुल परदेशात स्थायिक झालेल असत.( कांही वेळा दोन्ही ही ) जीवनांत दोघा जोडीदारा पैकी कुणी तरी आधि जाणार हा निसर्ग नियम आहे. तो तर आपण बदलु शकत नाही.आयुष्याच्या उतरंडीवर साथीदार जाण्याच दु:ख एकलेपणाच असत.अशावेळी मागे राहणारा वृध्दत्वाच्या व्याधीसह हे कटुसत्य काल्पनिक साखरेत घोळुन पचवत असतो.तरी हरकत नाही, अशी मनोधारणा व मनोधैर्य कष्टाने ठेवावे लागते.विचारांची प्रगल्भता व समतोल ठेऊन, जन निंदेकडे दुर्लक्ष करून पुढील वाट सुखकर करण्यास वृध्दाश्रम हा एकमेव मार्ग आहे. त्यात गैर काय आहे ?फक्त पुढील दृष्टिकोनातून आजारपणा विषयीच्या सुख सोयी पाहुनच पाऊल ठेवण्याच्या निर्णय घ्यावा.आणि आपल उर्वरीत आयुष्य चिंतामुक्त जगण्याचा प्रयत्न केला असे मनाला समजवावे.मानसिकता व निकड याचा ताळमेळ साधुन यावा लागतो.जग काय म्हणेल याचा विचार करण्यापेक्षा मी काय करतोय हे जगाला दाखवून द्यावे यातच सर्वांचे भले आहे.आपल्याला हितकर व काय सोयीचे आणि योग्य आहे ते बघावे.त्यात स्वत: सकट सर्वांचा आनंद दडलेला आहे असे वाटते.

|| कथा ||

# आगंतुक – सविता कारंजकर

शेखर पुन्हा पुन्हा दोन्ही मुलांना कुशीत घेत होता.नीताच्या नजरेला नजर भिडवणे त्याला आज जड जात होते.नीताही सकाळपासून भरल्या  डोळ्यांनी कामं करत होती.
सगळी आवराआवर करून झाली.

चार वर्षांचा सोनू आईजवळ घुटमळत होता.रोजपेक्षा काहीतरी वेगळेपण त्याला जाणवत होते आई मध्ये...पण कळत नव्हते.त्याचे वयतरी कुठं होतं एवढं?

आठ वर्षांच्या मनूला वातावरणातील गांभीर्य समजलं होतं पण नक्की काय होणार आहे याचा तिला अंदाजही येईना आणि आईबाबांना विचारायचं धाडसही होईना.ती हिरमुसली होती.आईच्या डोळ्यातले अश्रू आणि बाबांची हतबलता तिला समजत होती.

संध्याकाळचे साडेसहा वाजले होते.नेहमी देवासमोर समई लावून शुभंकरोती म्हणण्यासाठी गडबड करणारी आई आज कसलीही धावपळ करत का नाही?

असा विचार मनू करत होती.कसं बरं आईबाबांना मदत करता येईल मला? या प्रश्नावर ते चिमुकलं मन उत्तर शोधत होते.तेवढ्यात त्या बालमनात एक विचार चमकला...

येस्स्स्...बस्..आता मी माझ्या आईबाबांना खूश करू शकते...

मनू उठली..शेखरजवळ गेली हलकेच एक पापी घेतली आणि म्हणाली..

"बाबा, तुम्ही अजिबात काळजी करू नका..मला नवा फ्रॉक नको..खाऊ नको आणि कोणतीच पुस्तकंही  नकोत..मी शाळेतही नाही जाणार..मी आई सोबत कामाला जाईन आणि  भरपूर पैसे मिळवेन हं..."

मनूचे हे बोलणे ऐकून नीताचा संयम संपला .ती ढसढसा रडू लागली. तिचं सांत्वन करण्याइतपतही धैर्य शेखरकडे नव्हते. त्याला स्वतःच्या निष्क्रियतेची लाज वाटत होती आणि त्याने घेतलेल्या निर्णयाची भीती वाटत होती त्यालाच.

पण त्याच्यासमोर पर्यायच उरला नव्हता.त्याच्या एका चुकीच्या निर्णयामुळे तो स्वतःची आजवरची पुंजी आणि वाडवडिलार्जित सगळी इस्टेट गमावून बसला होता...

आणि म्हणूनच त्याने  नीता आणि मुलांसह आज रात्री आत्महत्या करायचे ठरवले होते.

नीताचे रडणे संपले..हळूहळू तिला राग अनावर होऊ लागला.

ती शेखरवर तोंडसुख घेऊ लागली. तिचा आवाज टिपेला पोचला होता.डोळे आग ओकत होते..तोंडातून जणू आगीचे लोळ बाहेर पडत होते.

इतक्यात..दारावर टकटक झाली.सुरुवातीला दोघांनीही कानाडोळा केला..पण काही क्षणातच टकटक वाढली.शेखर चमकला.नीता बडबडू लागली..बघा, असेल कुणीतरी मागतकरी..कुणाकुणाकडून किती कर्ज घेतलंय देव जाणे! बघा...उघडा दार..

शेखर अत्यंत जड अंतःकरणाने उठला..दार उघडलं..दारात एक जख्ख म्हातारी उभी होती.अंगावरचे कपडे फाटलेले, मळलेले होते.आणि हातात फक्त एक कळकट कापडी पिशवी होती.ती शेखरला न जुमानता घरात शिरली . तशी नीता तिच्या अंगावर धावून गेली...

कोण आहात तुम्ही? अशाकशा घरात घुसलात?

आजी म्हणाली..अगं..मी तुमच्याकडे काही दिवसांसाठी पाहुणी म्हणून आलेय..बाई गं..माझे थोडेच दिवस राहिलेत..मला या घरात आसरा द्या..मी तुमचे उपकार विसरणार नाही ..म्हातारीच्या आवाजात कंप होता. ती कुणाच्याही परवानगी वाट न पाहता एका कोप-यात जाऊन पडली.

नीता आणखी भडकली..आम्हाला इथं जगणं मुश्किल झालंय आणि ही कोण आगंतुक पाहुणी?

तिने शेखरकडे पाहिलं..तो मनाने कधीचा मेला होता..आता या आगंतुक पाहुणीची जगण्यासाठीची धडपड पाहून तो गलबलून गेला होता. त्याच्या केविलवाण्या चेह-याकडे पाहून नीतालाही कसंनुसं झालं.ती वरमली.

पाण्याचा तांब्या घेऊन ती आजीजवळ आली.घोटभर पाणी प्यायलावर आजीला तरतरी आली.

"आजी,तू आलीस आमच्याकडे पाहुणी...पण बाई गं आमचंच जगणं मुश्किल झालंय आम्हाला..आम्ही तुला काय सांभाळणार. गं?" नीता म्हणाली..

यावर आजी केविलवाणी हसली आणि म्हणाली..बाळांनो, मी असं किती जगणार? पोटच्या पोरांनी संपत्तीच्या पायी मला संपवायचं कटकारस्थान केलं..त्या नराधमांच्या तावडीतून सुटून मी जीव मुठीत धरून इथं आले..दुपारपासून तुमच्याकडे बघतेय..का कोण जाणे..असं वाटतंय..आपले काही ऋणानुबंध आहेत..म्हणून मग शिरले तुमच्या घरात..मला उबदार वाटतंय रे या तुमच्या घरट्यात!"

आजी एवढंच कसंबसं बोलली...तिची ताकतच संपली आणि ती तिथेच कलंडली.. तिच्या हातातली ती कळकट पिशवी मात्र तिने घट्ट पकडून ठेवली होती क्षीण अवस्थेत त्या आजीला बघून शेखर आणि नीता क्षणभर आपले दुःख विसरून गेली.होतं नव्हतं तेवढं दूध नीताने गरम केलं आणि चमच्याने आजीला पाजले.आजी प्रसन्न हसली आणि चेह-यावर प्रसन्नता समाधान घेऊन लगेचच निजली. अति विचाराने नीताशेखरचा मेंदूही शिणला होताच.घाबरून निद्रादेवीच्या कुशीत शिरलेल्या मुलांना जवळ ओढत ते दोघेही निद्राधीन झाले.

दुसरा दिवस उजाडला..शेखर नीता आता आजीच्या सेवेत मग्न झाले.आहे त्या परिस्थितीत आपण आपली आई समजून आजीची सेवा करू..तिला बरं करू आणि मग बघू तिचं काय करायचं ते..असं ठरवून ते कामाला लागले.

नीताने भाताची गरमागरम पेज आजीला दिली..कढत पाण्याने तिला अंघोळ घातली.आपला स्वेटर तिला घालायला दिला.ऊब आल्यावर आजी फ्रेश दिसू लागली.

असे करत करत आठवडा उलटला.नीता आणि शेखर आजीच्या सेवेत दंग होते.आजीही छान प्रतिसाद देत होती. "आता पुढे काय?" नीताच्या या प्रश्नाने शेखर दचकला..

" मी बोलतो आजीशी...उद्या तिला तिची सोय करायला सांगू आणि.... "

"आणि?..आणि काय?" नीता म्हणाली .

"आपल्या समोर आहे का दुसरा पर्याय?"....शेखर नकळत खेकसला तिच्यावर .खरंतर तो आतून पूर्ण खचलेला होता..मुलंही दबावाखाली वावरत होती.कुणीच कुणाशी काही बोललं नाही ..

सूर्याने उधळलेली शतरंगी किरणं शेखरनीताच्या घरात शिरली.नीताला जाग आली..तिने डोळे किलकिले करून पाहिलं..शेखर शांत झोपला होता. मृत्यूच्या भयाची किंचीत छटासुद्धा त्याच्या चेह-यावर दिसत नव्हती.तिने मुलांकडे पाहिलं..मुलं बाबांच्या कुशी सुरक्षित होती आणि सोनेरी भविष्याची सोनेरी स्वप्नं पाहत होती.

नीताने आजीकडे पाहिलं .

आजी शांत झोपली होती..मंद स्मित आणि एका अनोख्या तेजाने आजीचा चेहरा उजळला होता .

नीताने आजीकडे निरखून पाहिले..आणि एक कळ तिच्या काळजात उठली..नीताने शेखरला हलवून जागं केलं..

आजीचा निष्प्राण देह शांत समईसारखा भासला त्याला.

दोघांनीही अर्थपूर्ण नजरेने एकमेकांकडे पाहिले.शेखर उठला..थरथरत्या हाताने त्याने आजीची पिशवी उघडली..

त्यात प्लास्टिकच्या चारपाच पिशव्यांमध्ये अगदी जपून ठेवलेली काही कागदपत्रे होती.त्या कागदपत्रावर एका प्रथितयश वकील साहेबांचे नाव आणि फोन नंबर होता.शेखरने त्या नंबरवर फोन करून आजीबद्दल सांगितले...आणि आजीचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात द्यावा अशी विनंती केली.

शेखर नीता अंतर्बाह्य हादरले होते.आठवडाभरापूर्वी ते ज्या मृत्यूला कवटाळणार होते तोच मृत्यू त्यांच्या घरात येऊन त्यांच्या आगंतुक पाहुणीला घेऊन गेला होता. जीवाचा थरकाप उडाला होता त्या दोघांच्या...

अर्धा पाऊण तास उलटला असेल तोच वकील महाशय शेखरच्या घरी आले.त्यांनी स्वतःची ओळख सांगितली. आजीचे अंत्यदर्शन घेतले आणि शेखरला ते म्हणाले..

या लक्ष्मीबाई माझ्या क्लायंट होत्या..तीन मूलं सुना नातवंडं असा मोठा परिवार असूनही यांना कोणी सांभाळायला तयार नव्हते. गेले काही दिवस त्या स्वतंत्र एक खोली घेऊन राहत होत्या.या आजीबाई करोडोच्या संपत्तीच्या मालकीण आहेत..पण मुलांना फक्त संपत्ती हवी आहे आई नको.

गेल्याच महिन्यात त्या माझ्या ऑफिस मध्ये आल्या होत्या आणि त्यांनी मृत्यू पत्र करून घेतले.त्यात त्यांनी असं लिहलंय...माझ्या शेवटच्या दिवसात जो मला सांभाळेल तो माझ्या संपत्तीचा वारस असेल.

आणि या त्यांच्या इच्छेनुसार ही सगळी संपत्ती तुमच्या मालकीची झाली.."

नीता आणि शेखरचा पुतळा झाला होता.

त्यांना भानावर आणत वकीलसाहेब म्हणाले..." हे घ्या माझं व्हिजीटींग कार्ड..काही फाॅर्म्यॅलिटीज् पूर्ण कराव्या लागतील. ..

"हे कसं शक्य आहे वकीलसाहेब?"

शेखर इतकंच बोलू शकला.

वकीलसाहेब म्हणाले,आजी तुमच्या कडे आगंतुक पाहुणी म्हणून आली आणि तुमचं आयुष्य बदलवून गेली.... आभार माना...

बघता काय नुसते?

# || कविता विभाग ||

## तरीही माझं जीवन सुखाचं होतं – अविनाश हळबे

माझं घर तसं तीन खोल्यांचच होतं
आजोबांपासून नातवापर्यंत भरलेल होतं,
पोपट, कुत्रा, मांजरांनाही मुक्तद्वार होतं
घरादाराला कधीही 'लॉक' नव्हतं..
तरीही माझ् जीवन सुखाचं होतं ||१||

आजोबांच स्थान घरात सर्वोच्च होतं
स्वयंपाकघर आजीच्या ताब्यात होतं,
पाहुण्यांचे येणे-जाणे नित्याचच होतं
आई-बाबांना एकमेकांशी बोलताही येत नव्हतं..
तरीही माझं जीवन सुखाचं होतं ||२||

घरासमोर छोटंसं अंगण होतं
तुळस, प्राजक्ताला तिथे फुलता येत होतं,
दारात रांगोळी काढणं अनिर्वाय होतं
विहिरीवरून पाणी भरण कष्टाचं होतं,
तरीही माझं जीवन सुखाचं होतं || ३ ||

आंघोळीला लाईफ़बॉय साबण असायचा,
माणसापासून म्हशीपर्यंत सगळयांनाच चालायचा,
दात घासायला कडुलिंबाचा फ़ाटा लागायचा-
दगडाने अंग घासणं फ़ारसं सुसह्य नव्हतं
तरीही माझं जीवन सुखाचं होतं || ४ ॥

पायात चप्पल असणं सक्तीच नव्हतं
हाफपॅट बनियनवर फ़िरणं जगन्मान्य होतं
शाळेसाठी मैलभर चालण्याचं अप्रूप नव्हतं
मोठ्यांना सायकलशिवाय दुसरं वाहन नव्हतं..
तरीही माझं जीवन सुखाचं होतं || ५ ॥

शाळेत गुरुजनांप्रती आदर होता
घोकंपट्टीला दुसरा पर्यायच नव्हता,
पाढे पाठांतराचा आग्रह सर्वत्र होता
छडी हे शिक्षकाचं लाडकं शस्त्र होतं..
तरीही माझं जीवन सुखाचं होतं || ६ ॥

शाळेत गरीब श्रीमंत हा भेदभाव नव्हता,
नादारी सांगण्यात काही संकोच नव्हता,
वारावर जेऊन  शिकणाराही एक वर्ग होता
कलांना "भिकेचे डोहाळे" असंच नाव होतं,
तरीही माझं जीवन सुखाचं होतं || ७ ॥

नव्या कपड्यांचा लाभ लग्न-मुंजीतच व्हायचा
पाटाखालच्या इस्त्रीला पर्याय नसायचा,
शाळेचा युनिफोर्म थोरल्याकडूनच मिळायचा
तिन्हीसांजेला घरी परतणं सक्तीच होतं,
तरीही माझं जीवन सुखाचं होतं || ८ ||

वळचणीत चिमण्यांच्या पिढ्या नांदायाच्या
पोपटांचा थवा झाडावर विसावायचा,
कुत्रा, मांजर, डुकरानी गाव भरलेला असायचा -
उंदीर, डास, ढेकुण यांचे सार्वभौम्य राज्य होतं..
तरीही माझं जीवन सुखाचं होतं || ९ ||

पुस्तकातले प्राणी अचानक रानात दिसायचे
घाबरगुंडी उडाली तरी ते आपलेच वाटायचे,
उरलेले प्राणी नंतर पेशवेपार्कात भेटायचे -
नॉनवेज खाणं हे तर माहितीच नव्हतं,
तरीही माझं जीवन सुखाचं होतं || १० ||

शाळेत अभ्यासाला खूप महत्व होतं
नंबरावर बक्षीस/छड्या यांचं प्रमाण ठरत होतं,
कॉपी, गाईड, क्लासेसना तिथे स्थानही नव्हतं
वशिल्याने पास होणं माहितीच नव्हतं,
तरीही माझं जीवन सुखाचं होतं || ११ ||

गावची जत्रा  हीच एक करमणूक असायची -
चक्र-पाळण्यात फिरण्यात मजा मिळायची,
बुढ्ढीके बाल, गाठीशेवेची तोंडलावणी व्हायची
विमानातला फोटो काढणं चमत्कारिक होतं,
तरीही माझं जीवन सुखाचं होतं || १२ ||

गावाबाहेरच जग हिरवागार असायचं
सगळया नद्यांचे पाणी स्वच्छच असायचं,
पावसाळयात ढगांनी आकाश भरायचं,
प्रदूषण, पर्यावरण वगैरे माहितीच नव्हतं,
तरीही माझं जीवन सुखाचं होतं || १३ ||

हुतुतू आट्यापाट्याचा खेळ गल्लीत चालायचा
क्रिकेटच्या मॅचेस चाळीत व्हायच्या,
बापू नाडकर्णी, चंदू बोर्डेच्या गोष्टी रंगायच्या
डे-नाईट, ट्वेंटी- २० चं नावही नव्हतं,
तरीही माझं जीवन सुखाचं होतं || १४ ||

प्रवास झालाच तर एस्टीनेच व्हायचा
गचके, ठेचकाळणे याला अंत नसायचा,
होल्डाॅल सोबत फिरकीचा तांब्याही लागायचा
लक्झरी, फर्स्टक्लास एसीचं नावही नव्हतं,
तरीही माझं जीवन सुखाचं होतं || १५ ||

दिवाळी खऱ्या अर्थाने दिवाळी होती
चमनचिडी, पानपट्टी, भुईनळया यांची रात्र होती,
रंगीत तेल, उटणे, मोती साबणाची ऐश होती
लाडू, चकल्या, करंज्या यांचे दर्शन वार्षिकच होतं..
तरीही माझं जीवन सुखाचं होतं || १६ ||

जुनाट रेडिओतून आकाशवाणी बरसायाची
बिनाका गीतामालेने बुधवारची रात्र सजायची,
रेडीओ सिलोनने तारुण्याची लज्जत वाढायची
ताई, नाना हरबा यांच्या इतकच बालोद्यान होतं,
तरीही माझं जीवन सुखाचं होतं || १७ ||

खाण्याच्या बाबतीत भेदभाव केला जायचा
दादाच्या ताटात जास्त शिरा पडायचा,
पानात टाकणाऱ्याच्या पाठीत रट्टा बसायचा
हॉटेलात जाणं तर पूर्ण निषिद्ध होतं,
तरीही माझं जीवन सुखाचं होतं || १८ ||

मामाच्या गावाला कधी जाणं-येण होतं
धिंगामस्ती करायला तिथं  नॅशनल परमिट होतं,
विहिरीत पोहायला तिथेच मिळत होतं
भाऊबिजेला आईच्या ताटात फारस पडत नव्हतं,
तरीही माझं जीवन सुखाचं होतं || १९ ||

घरातले पुरुष कर्तेसवरते असायचे
बायांना दुपारी झोपणे माहिती नसायचे,
पोराबाळाना गोडधोड सणावारीच मिळायचं
प्रायव्हसीला तिथे काडीचंही स्थान नव्हतं,
तरीही माझं जीवन सुखाचं होतं || २० ||

पाव्हणे रावळे इ.चा घरात राबता असायचा
सख्खा, चुलत, मावस असा भेदभाव नसायचा,
गाववाल्यानाही पंक्तीत सन्मान असायचा
पंक्तीत श्लोक म्हणणं मात्र सक्तीचं होतं,
तरीही माझं जीवन सुखाचं होतं || २१ ||

आज घराऐवजी लक्झुरीयस फ्लॅट आहे
मोपेड, स्कूटर, मोटारचा सूळसुळाट आहे,
टीव्हीवर शंभर वाहिन्यांचा दणदणाट आहे
फास्टफूड, पार्ट्या, ड्रिंक्स याना सन्मान आहे,
कौटुंबिक सुसंवादाची मात्र वानवा आहे || २२ ||

आज मुलांसाठी महागडी शाळा-कॉलेजेस आहेत
दूध, बूस्ट, का ॅम्प्लानचा भरपूर मारा आहे,
क्लास, गाईड, कॅल्क्यूलेटरची ऐशच ऐश आहे
कपडे, युनिफोर्म क्रीडासाहित्य हवे तितके आहे,
बालकांच्या नशिबी मात्र  पाळणाघर आहे || २३ ||

आज पतीला ऑफिसात मरेस्तोवर काम आहे
सुशिक्षित पत्नीला करियरचा हव्यास आहे,
एक्स्ट्रा ॲक्टीविटीजना घरात सन्मान आहे
छंद, संस्कार यांच्यासाठी क्लासेस उपलब्ध आहे,
आजीआजोबांना मात्र वृद्धाश्रमाचा रस्ता मोकळा आहे || २४ ||

आज घरात प्रचंड आर्थिक सुबत्ता आहे
मागेल ती वस्तू क्षणात हजार होते आहे,
इन्स्टालमेंट, क्रेडीट कार्डचा सूळसुळाट आहे
सध्या बाय वन गेट वनचा जमाना आहे..
म्हणून

पैशांवर  समाधान फ्री मिळण्याची मी वाट पहात आहे....

पैशांवर  समाधान फ्री मिळण्याची मी वाट पहात आहे. || २५ ||

# भाव अंतरीचा – छाया पवार

भाव तुझ्या अंतरीचा

कधी जाणला नाही

नजरेतले कारुण्य तुझ्या

कधी उमगलंच नाही II

मनात दडवलेले शब्द

ओठावर आलेच नाही

समोरच्याला जाणण्याचा प्रयत्न

कधी केलाच नाही II

हृदयातील स्पंदने तुझ्या

मनाला सांगू पहातात

मनातल्या गाभाऱ्यातले शब्द

आज मुक्त होवू इच्छितात II

# स्वप्नीच्या फुला – योगेश खालकर

फुला माझ्या स्वप्नीच्या,

उमलू नकोस सत्यात,

तुझ्या उमलण्याकडे सर्व,

ठेवून आहेत लक्ष।।

कधी मारतील डंख,

कधी घालतील घाव,

सोसणार नाही तुला,

आता अधिक दुःख।।

म्हणूनच माझ्या फुला,

उमलू नकोस आता,

वारा गातो गाणी,

पक्षांची मंजूळ वाणी।।

फसवी आहेत बाळा,

उमलू नकोस फुला।।

# आई कुठे काय करते ? – विलास गायकवाड

सोसूनी असह्य यातना ,
हास्य चेहऱ्यावरी फुलविते .
प्रेमाची करूनी उधळण ,
दु:ख आपुले हृदयी ठेवते .

संसारासाठी होऊनी पणती,
सदैव ती तेवत राहते .
तिमिर जाळूनी विरहाचा ,
वाट ती सुखाची दावते .

साऱ्यांसाठी जगता जगता अशी ती,
सर्वस्व आपुलेच विसरूनी जाते.
स्वप्नांना देवूनी आपुल्या मुठमाती,
तीच आपुल्या रक्तांचे स्वप्न होते .

चंदनापरी झिजवूनी आयुष्य ,
ती स्वत:च गंधहीन होते .
बळ पंखास मिळताच ऊडूनी जाती पाखरे,
सारे आपुलेच म्हणता म्हणता शेवटी एकटीच ती घरट्यात राहते.

साऱ्या सुख दु:खांचा मांडीत हिशोब,
आसवांत ती पुरतीच बुडूनु जाते.
तुटलेली स्वप्ने कवठाळूनी ऊराशी जीवनास पाहते,
- - - तरीही आई कुठे काय करते?

# सून माझी लाडाची – नीला पाटणकर

सून माझी लाडाची,ग बाई लाडाची
कधी न मला दुखवायची,  बाई दुखवायची. ॥१॥

सून माझी प्रेमाची,ग बाई प्रेमाची
कधी न मला बोलायची, बाई बोलायची  ॥२॥

सून माझी कष्टाची,ग बाई कष्टाची
कधी न मला काम सांगायची, बाई सांगायची  ॥३॥

सून माझी सुगरण,ग बाई सुगरण,
कधी मला पंचपक्कान्न खिलवायची, बाई खिलवायची ॥४॥

सून माझी गोडाची,ग बाई गोडाची
नेहमी माझी स्तुती गायची, बाई गायची.  ॥५॥

सून माझी हौसीची,ग बाई हौसीची,
कधी ही माझी हौस पुरवायची, बाई पुरवायची  ॥६॥

सून माझी शिस्तीची,ग बाई शिस्तीची,
रोज माझे शिस्तीचे धडे गिरवायची, बाई गिरवायची  ॥७॥

सून माझी वळणाची,ग बाई वळणाची,
नेमेची मला वळण लावायची, बाई लावायची.  ॥८॥

सून माझी कित्ती छान,ग बाई छानच,
सदा मला आवडायची, बाई आवडायची. ॥९॥

सून माझ्या प्रितीची,ग बाई प्रितीची,
कधी ना माझी व्हायची नावडती, बाई नावडती. ॥१०॥

# शोध – मंगल बिरारी

काय आहे मी माझी मलाच सापडत नाही,
कशी आहे मी माझी मलाच कळत नाही.
प्रयत्न नेहमीच होता आदर्श मुलगी होण्याचा,
इंतजार अजून आहे त्या आदर्श प्रशस्तीपत्राचा.

विद्यार्थी दशेत मान मोडून अभ्यास खूप केला,
तिन्ही त्रिकाळ घरकाम होतेच खनपटीला.
ओल्या मातीला मात्र आकार प्राप्त झाला,
पण गवसले नाही मी "माझीच मला".

उंबरठ्याचे माप ओलांडून सृजनाचा प्रारंभ झाला,
आनंदाने सर्वस्व अर्पियले त्या घरकुलाला.
सात्विकता जपली कुटुंब एकत्र गुंफण्याला ,
पण सापडेना मी त्या नात्यांच्या मेळयाला?

आईपण निभावण्यात कधी कुसूर नाही केली,
संस्कारांच्या शिदोरीची कधी कमी नाही पडली.
गृहिणी व आईपण ठरले का पात्र कौतुकाला?
विचारले कित्येक प्रश्न मी माझ्याच वेड्या मनाला

नात्यांचा तर गुंता क्वचितच असेल झाला
कधी मोठं नाही होऊ दिलं माझ्यातील" मी" ला.
तरी प्रश्न आहे मनात मोठा आज या घडीला,
द्याल का कोणी शोधून "माझ्यातल्याच मला"?

सापडले जर मी कळवा नक्की मला,
तुमच्या कसोटीवर पारखून घेईन स्वतःला.
गुणांचे करीन संवर्धन, दोषांची करीन वजाबाकी,
तुमच्या मनातील मंगलला  प्रतिबिंबित करा की
तूमच्या मनातील मंगलला प्रतिबिंबित करा की......

# लिखाणाचे सूत्र – दिपाली साळेकर / खामकर

मला नाही कळत लिखाणाचे सूत्र
काय गद्य अन् काय पद्य
लेखणी हातात घेऊन
मनाला बोचलेले थेट लिहून काढते
त्यातच मगं राग द्वेष प्रेम विरह
सगळं सगळं ओळीतच मांडते

विचारांचे डोंगर मग
डोक्यावर नाचत असतात
लिहिता लिहिता कोऱ्या पानावर
पडत असतात
सोसलेल्या त्या वेदना
उगाच सलत राहतात
पानांवर मांडताना मात्र
हृदयाला टोचतात

रात्रीच्या कातरवेळी सगळ्याच जखमा
उघड्या पडतात
त्यातूनच मग नव्या नव्या रचना
उदयाला येतात
अर्धे अधिक विचार स्वप्नातच
विरघळून जातात
हृदयस्पर्शी दुःख मात्र नेहमी
आठवणीतच राहतात

# सुख – भरत उपासनी

शिणला रे देह
शिणले रे मन
किती ही परीक्षा
देवराया //
रंजले गांजले
आयुष्य गंजले
कशासाठी घेतो
परीक्षा ही //
कोण तुझ्यावर
ठेवील विश्वास
छळशील जर
अतिरेकी //
तुझ्या नावाने मी
बोलतो कुणाशी
माझाच माझ्याशी
लपंडाव //
पुरे झाले आता
वृथा कष्टविणे
दे रे सारी सुखे
जीवनात //

# || आरंभचे लेखक आणि आरंभच्या टीमचा परिचय ||

**अविनाश ब. हळबे, शिवतीर्थनगर, पुणे.**

मोबाईल: 9011068472 ईमेल: avinash.halbe21@gmail.com

(लेखक टाटा मोटर्स मधील निवृत्त डिव्हिजनल मॅनेजर असून ते लेखक, प्रवचनकार, कथाकथन कार, व्याखाते, भारुड सम्राट आहेत आणि या सर्व क्षेत्रांत त्यांनी अनेक पारितोषिके प्राप्त केली आहेत)

---

**अभिषेक ठमके , डोंबिवली**

मोबाईल: 9768650098 ईमेल: abhishek.thamke@gmail.com

(लेखक साय-फाय विषयाचे अभ्यासक आणि ई-पुस्तक प्रकाशक आहेत. ते आरंभ चे संस्थापक आहेत. आणि त्यांनी आतापर्यंत विविध वर्तमानपत्रे आणि मराठी वाहिन्यांसाठी आणि चित्रपटांसाठी कला दिग्दर्शन केले आहे. त्यांच्या आतापर्यंत अग्निपुत्र, मैत्र जीवांचे, टेरर अ‍ॅटॅक अ‍ॅट डोंबिवली स्टेशन, पुन्हा नव्याने सुरुवात यासारख्या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत.)

---

**श्री. हेमंत बेटावदकर, जळगांव**

मोबाईल: 9403570268

(लेखक रिटायर्ड SBI कर्मचारी असून वाचन, लेखन आणि चित्रकला हे त्यांचे आवडते छंद आहेत. ते सकाळ आणि लोकमत वर्तमानपत्र तसेच अनेक दिवाळी अंकांमधून सातत्याने लिखाण करत असतात. तसेच त्यांनी "काळ सुखाचा" आणि "माझं काय चुकलं?" ही दोन प्रसिद्ध पुस्तके लिहिली आहेत)

---

**आशिष अरुण कर्ले.**

मोबाईल: 9765262926 ईमेल: ashishkarle101@gmail.com

(मूळ गाव 32 शिराळा सध्या शिक्षणानिमित्त पनवेल राहतात. गेहलोत इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कोपरखैरणे नवी मुंबई येथे बी फार्मसी औषधनिर्माणशास्त्र फायनल इयर ला आहेत.ई साहित्य प्रतिष्ठाण प्रकाशिततर्फे फार्मासिस्ट तुमच्या आरोग्यासाठी या पुस्तकाचे प्रकाशन, आरंभ मध्ये कार्यकारी संपादक पदावर काम करतात)

---

**मीना झाल्टे, औरंगाबाद**

मोबाईल: 9860610547 ईमेल: meenazalte@gmail.com

(या उद्योजिका असून आरंभ मासिकाच्या मुद्रित शोधक आहेत)

---

**मैत्रेयी पंडित**

मोबाईल : 7507881587 ई-मेल : ek.koparamanatala@gmail.com

(प्रोडक्शन इंजिनीअर, दीड वर्ष क्रॉम्प्टन ग्रिव्ज येथे डिझाईन इंजिनिअर म्हणून कामाचा अनुभव, संपादक म्हणून दोन वर्षे महाविद्यालयीन नियतकालिकासाठी कामाचा पूर्वानुभव, महाराष्ट्र टाईम्स, पुणे सकाळ इत्यादी वृत्तपत्रांमधून समयोचित लेखन, "एक कोपरा मनातला..." हा वैयक्तिक ब्लॉग, तसेच लेखन, वाचन व चित्रकलेचा (विशेषतः वारली पेंटिंगमध्ये हातखंडा) छंद सध्या आरंभ मध्ये सह संपादक म्हणतात कार्यरत आहेत)

---

**वंदना मत्रे**

मोबाईल – 9833343481 ईमेल- vandanamatre3135@gmail.com

(नवी मुंबई येथे रहातात सध्या नवी मुंबई साहित्य परिषदेत कार्यान्वित असून पत्रकाराच्या प्रवेशाच्या तयारीत आहे. कथा, कादंबरी, नाटक लेखन, सवांद लेखन, प्रवास वर्णन, काव्यलेखन, विडंबनगीत असे साहित्य लिहण्याची आवड असून साहित्य क्षेत्रात अनेक कथा, कविता आणि नाटकाला राज्यस्तरीय , राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त. कथासंग्रह प्रकाशनाच्या मार्गावर. आपल्या आरंभ मध्ये मुद्रित शोधक (प्रूफ रीडर) पदावर कार्यरत आहेत)

---

**विश्वास पाटील, टिटवाळा**

मोबाईल: 9765841700 ईमेल: vishwaspatil4@gmail.com

(हे शिक्षक असून आरंभ मासिकाचे मुद्रित शोधक आहेत)

---

**मंजुषा सोनार, पुणे (ज्योतिष प्राज्ञ)**

मोबाईल: 9767676972 ईमेल: sonar.manjusha@gmail.com

(लेखिका अर्थशास्त्र विषयाच्या अभ्यासक असून त्या ज्योतिष विषयातील पदवीधारक तसेच अंकशास्त्र प्रवीण आहेत)

**किशोर बळीराम चलाख, चंद्रपूर**

ईमेल: kishor.chalakh@gmail.com  फोन: 9405900987

**वैष्णवी कारंजकर, सातारा**

आईचा ईमेल: karanjkar.savita@gmail.com

लेखिका Mass communication and journalism च्या विद्यार्थिनी आहेत तसेच आकाशवाणी पुणे, युवावावी कार्यक्रम संचालक असून त्यांनी अनेक नाटकांत काम केले आहे.

---

**अजित मुठे, नाशिक**

ईमेल: ajitmuthe@yahoo.com

(लेखक हौशी प्रवासी आणि जळगाव शहर महानगरपालिका उपायुक्त आहेत)

---

**निखिल शेलार**

मोबाईल: 9987959084

ईमेल: shelar.nikhil@gmail.com

---

**अक्षता दिवटे, बंगलोर**

मोबाईल: 7483619155  ईमेल: adivate484@gmail.com

(लेखिका एका खासगी कंपनीत काम करतात)

---

**सविता कारंजकर, सातारा**

मोबाईल: 9922814183  ईमेल: karanjkar.savita@gmail.com

(लेखिका प्रसिद्ध निवेदिका आणि कथा लेखक तसेच पाककला निपुण आहेत. त्यांनी अनेक नाटकांमध्ये भाग घेतला आहे.)

---

**सिद्धेश प्रभुगावकर पुणे**

मोबाईल: 9405952001 ईमेल: siddheshpg@gmail.com

(लेखक आयटी कंपनीत काम करतात आणि ई-पुस्तक प्रकाशक आहेत. बुक स्ट्रक या ऑनलाईन पुस्तक प्रकाशन संस्थेचे ते मालक आहेत)

---

**उदय सुधाकर जडिये, पिंपरी, पुणे**

मोबाईल: 9552626496 ईमेल: udayjadiye2006@rediffmail.com

(लेखक हे पिंपरी येथील सुप्रसिद्ध कवी आहेत आणि ते खासगी कंपनीत काम करतात)

---

**सुभाष कि. देशपांडे**

मोबाईल: 9421576069, 8830770906

बी. 603, आराध्य टॉवर्स, न्यू पाईपलाईन रोड?

लोकमान्य टिळक टर्मिनस जवळ, घाटकोपर पूर्व, मुंबई 400077

(लेखक गीतेचे अभ्यासक आहेत)

---

**प्रकाश रामचंद्र क्षीरसागर, कुर्डुवाडी**

ईमेल: kshirsagarprakash@gmail.com

---

**सिद्धेश देवधर, गोवा**

मोबाईल: 9420161525 ईमेल: siddhesh.deodhar@gmail.com

(लेखक खासगी कंपनीत काम करतात आणि ते प्रसिद्ध व्यंगचित्रकार आणि कलाकार आहेत)

http://siddheshcreations.blogspot.com/

http://ittoons.blogspot.com/

---

**डॉ. केतन हरिभाऊ दांगट**

ईमेल: vdketandangat@gmail.com

एम.डी. आयुर्वेद

महेश्वर क्लिनिक, तुकाई टेकडी चौक,

हडपसर, पुणे - 411028

---

**अक्षर प्रभू देसाई**

**मोबाईल:** +1 (408) 881-2287 **ईमेल:** akshar@akshar.co.in / akshar100@gmail.com

(लेखक कॅलिफोर्नियात खासगी कंपनीत काम करतात. त्यांनी IIT मुंबईत M. Tech. केले आहे.)

http://akshar100.wordpress.com/

---

**सरिता सावंत भोसले**

ईमेल: saritasawant27@gmail.com

---

**निमिष सोनार, पुणे**

मोबाईल: 8805042502 ईमेल: sonar.nimish@gmail.com

(लेखक B.E. (Etc), PMP, ITIL, ISO27K certified आहेत. ते एका खासगी कंपनीत काम करत असून लिखाण, वाचन, चित्रकला आणि व्यंगचित्रे हा त्यांचा छंद असून आतापर्यंत त्यांच्या अनेक लघुकथा आणि तीन कादंबऱ्या विश्वरचनेचे अज्ञात भविष्य, वलय, जलजीवा या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. ते सध्या आरंभ चे संपादक आणि मजकूर आयोजक आहेत)

---

**मयुरी विजय घाग**

ईमेल: ghagmayuri2000@gmail.com

---

**सुवर्णा कांबळे / कसबे**

मोबाईल. 9960354673 ईमेल: suvrnakamble474@gmail.com

रूम न.25 सेक्टर.12 साई ओमकार सोसायटी, कलंबोली

**विलास गायकवाड, लातूर**

मोबाईल: 8605026835 ई मेल: vilasdgaik668@gmail.com

(ऑन लाईन स्पर्धेत जवळपास 70 पारितोषके मिळाली आहेत.जगातल्या सर्वात मोठ्या काव्य संग्रहात "अस्थिर जगात" या कवितेचा समावेश .काव्यसंग्रहाचे "कोहिनूर" नांव असून त्याचे प्रकाशन पुणे येथे झाले होते. अनेक सामाजिक लेख दैनिक पुण्यनगरी मध्ये प्रकाशित झाले आहेत.विद्रोही आणि बंडखोरी हिंदी आणि मराठी काव्यलेखन)

---

**भरत राधाकृष्ण उपासनी**

मोबाईल 8055852978 ई मेल:br1957u@gmail.com

(लेखक कवि मुक्त पत्रकार शिक्षण : एम ए बी एड ( मराठी )

परिचय : नाशिक आकाशवाणीचे लोकप्रिय लेखक .नाशिक आकाशवाणी वरून प्रसारित झालेल्या घरकुल, कीर्तनरंग ,नाशिकचा मंदिर वारसा ह्या मालिका विशेष प्रमाणात गाजल्या.काही वृत्तपत्रात नोकरी.लेखन कविता नाट्य कीर्तन वाचन लेखन धर्म अध्यात्म तत्वज्ञान संस्कार वारसा आई वडील मातुल आजोबा आजी ह्यांच्या कडून मिळाला.)

---

**सुलक्षणा वऱ्हाडकर**

(एमए (राज्यशास्त्र) कायदा, एमबीए (एसएचआरएम) विजेते विद्यापीठ.शंघाईच्या टोंजी विद्यापीठातून मँडारिनमध्ये १ वर्ष पदवी.कार्यशाळांमध्ये आणि भाषणातून भारतीय पौराणिक कथा, पाककृती आणि सामाजिक विविधता याबद्दल व्याख्याने देतात.क्रॉस सांस्कृतिक समाजशास्त्र हे यांचे आवडते विषय आहे.इंडियन शॅलोट्सचा मालक.)

---

**रोहन केदारे**

ईमेल: vickair2011@gmail.com

पत्ता: CGS कॉलनी ,

सेक्टर - A/93 BLG - 05

भांडूप ईस्ट, मुंबई-42

---

**जुईली अतितकर**

मोबाईल: 8655778845  ईमेल: juilyatitkar@yahoo.in

301, श्री रिद्धी सिद्धी धाम, प्लॉट नं – 210/217,

सेक्टर नं – 10, नवीन पनवेल.

असिस्टंट टीचर, न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली

त्या आधी ACTREC मध्ये काम केले

---

**योगेश रामनाथ खालकर**

पंचवटी - नाशिक

मोबाईल: 7498400485  ईमेल: ykhalkar@gmail.com

---

**नीला पाटणकर, शिकागो**

अमेरिका

मोबाईल +1(847) 8403286  ईमेल: patankarneela@gmail.com

---

**प्रा. विलास गायकवाड, लातूर**

मोबाईल: 8605026835  ईमेल: vilasdgaik668@gmail.com

---

**स्वप्नील प्रकाश धने**

वैजापूर (औरंगाबाद)

ईमेल: swapnildhane1@gmail.com

---

**राहुल दवे, कॅलिफोर्निया**

मोबाईल: +1-734-720-2744

(लेखक खासगी कंपनीत असून ते सध्या कॅलिफोर्निया येथे राहतात. ते कॅलगरी (कॅनडा) येथे स्थायिक आहेत)

---

**शरण्या गिरजापुरे**

(वय ११, जैन बांथिया इंग्लिश मेडियम स्कूल, चिंचवड)

वडील ईमेल: nileshgirjapure@gmail.com

---

**अमृता देसर्डा**

(लेखिका पुणे येथे रहातात व आयएलएस लॉ कॉलेज येथे शिक्षण पूर्ण केले आहे व डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था येथे कार्यरत आहेत.

---

**मिलिंद कोलटकर**

मोबाईल 8197241934 ई मेल: milind.kolatkar@gmail.com

(जन्म: 1970 (वालचंदनगर). B.Sc., M.Sc. (संख्याशास्त्र): पुणे विद्यापीठ. १९९३ पासून बंगळुरात वास्तव्य. 'भारतीय विज्ञान संस्था' (Indian Institute of Science) येथे उत्क्रांती अभ्यासकाकडे नोकरी करताना वाचनाची जोपासलेली आवड आज साडेआठशेहून अधिक पुस्तक संग्रहात परावर्तीत. भारतीय शास्त्रीय संगीताची, मराठी उपशास्त्रीय संगीत, चित्रपट यांची आवड.)

---

**किरण श्रीकांत दहिवदकर, पुणे**

मोबाईल: 07757025122 ई-मेल: kirand.personal@gmail.com

(शिक्षण M.C.M, M.B.A(IT) आहे. मी TCS, पुणे या कंपनीमध्ये IT Departmentला मॅनेजर या पदावर कार्यरत आहे. मला संगित, गायन, लेखन, वाचन, फोटोग्राफी आणि चित्रपट या माध्यमाची विशेष आवड आहे. लिखाणात लघुकथा, चित्रपट, टि. व्ही. मालिका या वरील परिक्षण लिहीण्याची आवड आहे. भावस्पर्शी व्यक्तिचित्रचे लेखन आणि संकलन करून भविष्यात एक छोटया पुस्तकाच्या स्वरूपात निर्मिती करण्याचा मानस आहे. धन्यवाद.)

---

**निखिल शेलार**

मोबाईल: 9987959084 ई मेल shelar.nikhil@gmail.com

(लेखकांचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झाले असून सिवूड्स नवी मुंबई येथे राहतात व स्टॉक अँड सिक्युरिटीज या कंपनीत नोकरी करततात)

---

**मंगल रत्नाकर बिरारी**

मोबाईल: 9665291900 ई मेल: mangal.birari@gmail.com

बी.ए ( स्पेशल -राज्यशास्त्र)

गृहिणी . पिंपळे सौदागर. पुणे

---

**योगेश रामनाथ खालकर**

ई मेल: ykhalkar@gmail.com

(नाशिक येथे राहतात, ते पेशाने एक विद्युत अभियंता आहे. लिखाण, वाचन तसेच भाषण करणे हे त्यांचे छंद आहेत. समाजपयोगी कार्यक्रमात पुढाकार घेणे त्यांची विशेष आवड आहे. लेखणीतून मनातील भावनांना तसेच सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी प्रयत्न नेहमी कार्यरत असतात)

---

**नाव - दिपाली शिरीष खामकर**

मोबाईल नं. 9930036081 ई मेल - khamkardips88@gmail.com

(शिक्षण - M.Com राहण्याचे ठिकाण - हडपसर पुणे सध्या बँकेत कार्यरत असून कविता लिहिण्याचा छंद वेळ काढून जोपासतात.)

---

**नवनीत सोनार**

मोबाईल 9421974648

(लेखक पुणे येथे राहतात व निवृत्त शिक्षक आहेत)

---

**नाव:सौ प्रिया गौरव भांबुरे**

priyanikum@gmail.com

तळेगाव दाभाडे पुणे

---

**छाया पवार**

(लेखिका नाशिक येथे राहतात)

---

**अनुष्का मेहेर**

(लेखिका पुणे येथे राहतात)

---

**मयुरी विजय घाग**

फोन नंबर : 9890941051 ई मेल:ghagmayuri2000@gmail.com

---